**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये तीन प्रस्ताव आलेले आहेत. त्यापैकी पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि इतर सन्माननीय सदस्यांचा आहे. दुसरा प्रस्ताव सनमाननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार आणि इतर सन्माननीय सदस्यांचा आहे. तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आपल्या प्रस्तावासंबंधी एक मिनिटामध्ये थोडक्यात म्हणणे मांडावे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुरधा आणि राई या दोन गावात होळीच्या संदर्भात काही तरी अप्रिय घटना घडली आणि एका व्यक्तिला गुंड समजून काही लोकांनी मारहाण केल्याचे प्रकरण उघडकीस आले. त्याचा परिणाम असा झाला की, गेल्या दोन दिवसांपासून त्या दोन गावातील वातावरण अत्यंत स्फोटक आणि गंभीर स्वरुपाचे झालेले आहे. परवा या दोन गावामध्ये 400 ते 500 पोलिसांचा ताफा घुसला. कोणत्याही प्रकारची नोटीस न देता त्यांनी लोकांच्या घराघरामध्ये जाऊन पडताळणी केली आणि लोकांची धरपकड केली. त्या ठिकाणी फार गंभीर स्वरुपाचे वातावरण निर्माण झालेले आहे. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. दरारा निर्माण झालेला आहे. दूरदर्शनवर हा प्रकार सारखा दाखविला जात होता. ते आम्ही पाहिलेले आहे. त्या ठिकाणी अत्यंत संतापजनक वातावरण होते. महिला नागरिकांना सुध्दा अत्यंत बेजबाबदारपणे आणि अमानुषपणे मारहाण करण्याचा प्रकार पहावयास मिळाला. महिलांच्या केसाला धरुन खेचून पोलीस अधिकारी त्यांना गाडीत कोंबत होते. महिलांनी काही प्रतिकार करण्याचा किंवा बोलण्याचा प्रयत्न केला असता महिला पोलीस अधिकारी त्या महिलांना जोराजोरात मारत होत्या. असा प्रकार त्या ठिकाणी घडलेला आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. तेथील सर्वसामान्य नागरिकांच्या मनामध्ये निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी तातडीने या विषयावर चर्चा व्हावी अशी मी या प्रस्तावाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, राई, मुरधा आणि मारवा गावात मी गेलो होतो. मागच्या वर्षी त्या ठिकाणी दरोडा पडला होता आणि एकाची हत्या झाली होती. 29 मे, 2007 ला दरोडा पडला आणि एका महिलेची हत्या झाली. त्या ठिकाणी लाखो रुपयांचे सामान चोरीला गेले. 2004 मध्ये सुध्दा त्या ठिकाणी अशाच प्रकारचे दोन दरोडे पडले होते. दरोडा टाकणारे दरोडेखोर सापडले नाहीत तसेच पोलीस कुमक कमी होती त्यामुळे गावातील लोकांनी स्वत: अशी पथके तयार केली की, जेणेकरुन त्या ठिकाणी दरोडा टाकावयास आलेले लोक दिसले किंवा कोणी अज्ञात इसम दिसला तर आपल्याला कारवाई करता येईल. गस्त घालण्याच्या दृष्टीने आणि पोलिसांना मदत करण्याच्या दृष्टीने त्यांनी पथके तयार केली होती. होळीच्या दिवशी अशी घटना घडली की, त्या ठिकाणी एका अज्ञात इसमाला मारहाण झाली. पोलीस निरीक्षकाने तीन-चार हॉस्पिटलमध्ये फिरुन त्याला ॲडमिट करुन वाचविण्याचा प्रयत्न केला. तो आय.सी.यू.मध्ये आहे. नंतरच्या काळामध्ये पोलिसांनी ज्या पध्दतीने दडपशाही केली त्यामध्ये घराघरामध्ये घुसून लोकांना खेचून बाहेर काढले

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

मी काल त्या महिलेला भेटलो आहे. त्या महिलेच्या केसांना धरुन तिला गाडीत कोंबण्यात आले. सामान्य लोक, ग्रामस्थ भयभीत वातावरणात जगत आहेत. पोलिसांनी अशाप्रकारे कायदा हातामध्ये घेण्याचे प्रकार सुरु आहेत. ठाणे जिल्हयात आणि राज्यात असे अनेक प्रकार झालेले आहेत. रत्नागिरी जिल्हयामध्ये उपोषणाला बसलेल्या लोकांना सुध्दा पोलिसांनी खेचत नेले आहे. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. पोलीस मोठया मॉबने गावाला घेराव घालतात आणि घराघरामध्ये घुसून आरोपी कोण आहेत हे माहीत नसताना लोकांना पकडून नेतात आणि त्यांच्यावर केस करतात. त्यामुळे तेथील वातावरण असुरक्षिततेचे आहे. राई, मुरधा व मोर्वा या गावांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या विषयावर चर्चा करण्यासाठी आम्ही हा प्रस्ताव दिलेला आहे, आपण तो स्वीकारावा अशी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व इतर सन्माननीय सदस्य यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत मी माझा निर्णय देत आहे. या प्रस्तावातील विषय आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर समाविष्ट नसल्यामुळे मी या प्रस्तावाला अनुमती नाकरीत आहे. सन्माननीय सदस्यांनी माझ्या दालनामध्ये येऊन मला भेटावे. या प्रश्नाबाबत मी जरुर आपल्याला मदत करीन.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, श्री.अरविंद सावंत यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एखाद्या विषयाशी संबंधित असलेल्या मंत्रिमहोदयांमुळे या राज्यात अत्यंत गंभीर परिस्थती निर्माण व्हावी आणि त्याच्यातून एखाद्याच्या जीविताचा प्रश्न निर्माण व्हावा अशाप्रकारची घटना मी विदित करीत आहे आणि त्याबाबत सभागृहात चर्चा व्हावी अशी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, गेले वर्षभर महसूल खात्यामार्फत माननीय महसूल मंत्र्यांकडून खाजगी विकासकांना जमिनी देण्याचे काम चालले आहे. यासंबंधी कोर्टात याचिका दाखल झाल्यानंतर

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोर्टाने ती दाखल करुन घेतली आहे. या याचिकेचा कोर्टात निर्णय होईल त्याबाबत मी येथे भाष्य करु इच्छित नाही. उद्या कोर्टाने त्या याचिकेवर निर्णय देताना माननीय महसूल मंत्र्यांविरुध्द रिमार्क्स पास केले तर आपल्या पध्दतीनुसार मंत्रिमहोदयांना घरी जावे लागेल. परंतु याचिका कोर्टात दाखल केल्यानंतर कोर्टाने ती मान्य केल्यावर न्यायप्रविष्ट प्रकरणाबाबत सभागृहात चर्चा करता येत नाही. परंतु याचिकाकर्त्यांच्या घरी जाऊन त्यांना दमदाटी करणे, त्यांच्यावर दबाव आणणे आणि विविध माध्यमातून धाकदपटशा निर्माण करुन ही याचिका मागे घ्यावी असे सांगितल्यामुळे त्यांच्यात घबराट निर्माण झाली आहे. श्री.चेतन कांबळे यांनी संभाजी नगर येथे याप्रकरणी तक्रार दाखल केल्यानंतर, गोरेगाव येथे श्री.देवरुखकर यांच्या घरी चॉपर घेऊन जाण्याचा प्रकार झाला...

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मी सांगू इच्छितो की, हा विषय नियम 289 च्या निकषामध्ये कसा बसतो याच्या मर्यादेपर्यंत आपण बोलणे गरजेचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या अनुषंगाने अनेक मुद्दे चर्चेच्या वेळी उपस्थित करता येतील. परंतु एखाद्या नागरिकाने या शासनामध्ये चाललेला भ्रष्टाचार बाहेर काढण्यासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब केल्यानंतर गुंडगिरीच्या मार्गाने त्यांच्यावर दबाव निर्माण केला जात असेल तर भविष्यामध्ये महाराष्ट्रात सामान्य नागरिकांसमोर प्रश्न निर्माण होईल. बेदरकारपणे गुंडगिरीच्या नावावर, बेकायदेशीर व भ्रष्ट मार्गाने हे सरकार चालणार असेल तर ते लोकांनी का सहन करावयाचे हा प्रश्न आहे. अशाप्रकारची दहशत निर्माण होत असताना संबंधित लोकांना संरक्षण मिळणार नसेल, केवळ मंत्रिमंडळातील एक मंत्री हे करीत आहेत म्हणून सरकार कोणत्याही प्रकारची दखल घेणार नसेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. यापूर्वीच्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लोकांमध्ये धाकदपटशा निर्माण केला जात आहे तसेच या विषयामुळे सुध्दा लोकांमध्ये दहशत, धाक या माध्यमातून हे सर्व प्रकार चालणार असतील तर ते अयोग्य आहेत. श्री.अण्णा हजारे यांनी लोकांना माहितीचा अधिकार मिळवून दिला त्या अधिकाराच्या माध्यमातून हे भ्रष्टाचार चव्हाटयावर येत असतील तर या लोकांना शासन कशाप्रकारे वागविणार आहे, त्यांना

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

संरक्षण देणार आहे की नाही, देणार असेल तर कोणत्या प्रकारे देणार आहे ? हा सर्व खुलासा होण्यासाठी आजचे सर्व कामकाज बाजूला ठेवणे आवश्यक आहे. एखाद्या सदस्यावर, त्याच्या आईवर, कुटुंबियावर एवढया मोठया प्रमाणात धाकदपटशा निर्माण करणे हे या सरकारला शोभाणारे आहे का असा प्रश्न निर्माण झाल्यामुळे सरकारनेच या चर्चेला मान्यता द्यावी अशाप्रकारची आपल्या माध्यमातून विनंती करतो आणि ही तातडीची बाब आहे, महाराष्ट्रात हा चर्चेचा विषय झालेला आहे, सर्व वर्तमानपत्रांनी सर्व्हे नंबरसहित जाहीर केलेले आहे. हा भ्रष्टाचार आहे की नाही हे कोर्ट ठरविल, मी त्यावर भाष्य करीत नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

परंतु त्या माध्यमातून दडपशाही आणि गुंडगिरी निर्माण झालेली आहे. अधिवेशन चालू असताना हे सर्व प्रकार घडत आहेत.ही अतिशय गंभीर बाब आहे. सरकार कोणाला जुमानत नाही का ? म्हणून या विषयावर तातडीने चचर्चा व्हावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून आम्ही हा जो प्रस्ताव आणलेला आहे तो अतिशय गंभीर आहे. राज्यकर्त्यांनी जनतेसाठी आदर्श निर्माण करावयाचा असतो. परंतु राज्य शासनातलेच एक मंत्री बेफाम होऊन वागत आहेत. त्यांचे नाव सातत्याने चर्चेत येत आहे. मुकुंद आयर्न आणि अशाच प्रकारच्या अनेक बाबतीतील गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी चेतन कांबळे सारखा कार्यकर्ता उभा रहात आहे. या देशातील पेट्रोल पंपाच्या गैरव्यवहाराबाबत ज्याने सुप्रिम कोर्टात जाऊन विजय मिळविला त्याचे गलिच्छपध्दतीने चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देवरुखकर यांच्या घरी माणसे चॉपर घेऊन गेली, असे प्रकार अधिवेशन सुरु असताना होत आहेत. मंत्र्यांचे सरळ सरळ नाव घेतले जाते तरी देखील हे शासन गप्प आहे, ढिम्म आहे. हा विषय फार गंभीर असून या विषयावर नियम 289 अन्वयेच्या माध्यमातून चर्चा व्हावी जेणेकरुन हा विषय आम्हाला विस्तृतपणे मांडता येईल. अधिवेशन काळात अशा प्रकारच्या गंभीर घटना घडत असल्यामुळे 289 च्या प्रस्तावावरील चर्चेला अनुमती द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाला मान्यता द्यावी अशी विनंती केलेली आहे. या राज्यामध्ये हे अधिवेशन चालू असताना अशा प्रकारे जुलूमशाही, दडपशाही चालू आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री या सदनामध्ये उपस्थित आहे. त्यांनी या विषयावर भाष्य करण्याची गरज आहे. या विषयावर चर्चा होणे अत्यंत आवश्यक आहे. कोर्टाचा निर्णय जो काही व्हायचा असेल तो होईल. सभापती महोदय,। चेतन कांबळे यांनी संरक्षण मांगितले असता त्यांनी पैसे भरुन संरक्षण घ्यावे असे माननीय हायकोर्टाने सांगितले. तेव्हा या सर्वोच्च सभागृहामध्ये अशा गंभीर विषयावर चर्चा होणार नसेल तर

..2..

(डॉ. दीपक सावंत...

मग ती कोणत्या विषयावर होणार ? या विषयावर आमच्या सर्वांच्या भावना प्रक्षुब्ध आहेत. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या गंभीर विषयावर प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून चर्चा घडवून आणावी.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, राजकीय संघर्ष तसेच वेगवेगळया प्रकारच्या कामकाजाबद्दल जनहितार्थ याचिका वगैरे हे सर्व मुद्दे येणारच. मुद्दा असा आहे की, चेतन कांबळे यांची आई नंदिनी कांबळे मला येऊन भेटल्या होत्या...

**सभापती** : हा नियम 289चा विषय कसा होतो ते सन्माननीय सदस्यांनी सांगावे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, तुपसुंदर यांनी श्री. चेतन कांबळे यांना "अरे म्हारड्या तुझी लायकी काय?" अशी भाषा वापरली. याबाबतीत ॲट्रॉसिटी ॲक्टखाली कोर्टाचे दरवाजे ठोठावले जाणार आहेत. हे विधिमंडळ महिला, दलित, उपेक्षित यांची प्रतिष्ठा राखणारे आहे काय ? यासंदर्भात न्याय पाहिजे. म्हणून 289 अन्वयेच्या प्रस्तावास मान्यता देऊन सदनामध्ये चर्चा घडवून आणावी. मी सांगू इच्छिते की, या ठिकाणी बसून केवळ फुसके बार करु नका, तुमची हिंमत असेल तर या विषयावर चर्चा व्हावी. सभापती महोदय, आपण प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, मला एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, चेतन कांबळे हा कोणी संन्याशी नाही. त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत...

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागेवर बसावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कोर्टामध्ये कोणी एखादी केस दाखल केली आणि ती केस त्याने न्यायालयातून परत घ्यावयाचे ठरविले तर त्यासाठी न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते. न्यायालयाच्या परवानगी शिवाय कोणालाही केस परत घेता येऊ शकत नाही. यासंदर्भातील एक केस नोंद झालेली असून त्याबाबतीत पोलीस तपास सुरु आहे. त्या तपासामध्ये खरे काय आहे आणि खोटे काय आहे हे सगळेच बाहेर येईल. परंतु या केसचा तपास अद्याप पूर्ण झालेला नाही. अशी परिस्थिती असताना सरकारमधील एका मंत्र्यावर टीका केली जात आहे. सरकारवर आणि सरकारमधील मंत्र्यांवर टीका करण्याचे स्वातंत्र विरोधी पक्षाच्या सदस्यांना आहे. परंतु या केसच्या बाबतीत दुस-या बाजुच्या सदस्यांना मत मांडण्याचे स्वातंत्र्य मात्र दिले जात नाही. अशा हुकुमशाही पध्दतीने कसे काय काम चालेल ? ज्याप्रमाणे विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे, तसा दुस-या बाजुच्या सन्माननीय सदस्यांना देखील मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. सभापती महोदय, आम्ही विरोधी पक्ष सदस्यांचे म्हणणे अतिशय शांतपणे ऐकून घेतले. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांना आपण संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांचे म्हणणे देखील रेकॉर्डवर येऊ द्यावे अन्यथा मंत्र्यांच्या बाबतीत जे रेकॉर्डवर आणले गेले आहे ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे. न्यायप्रविष्ट बाबीबर सभागृहात कसे काय बोलता येईल?एक मंत्र्यांच्या बाबतीत जे बोलले गेले ते सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकले पाहिजे. नाही तर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांची देखील बाजू रेकॉर्डवर घेतली गेली पाहिजे. माननीय सभापती महोदय, याबाबतीत कृपया आपण निर्णय द्यावा.

( गोंधळ )

**सभापती** : या बाबतीत मी निर्णय देत आहे. म.वि.स.नियम 289 अन्वये या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रस्ताव मांडला आहे व त्या प्रस्तावास काही सन्माननीय सदस्यांनी अनुमोदनपर आपापली मते व्यक्त केली आहेत. या विषयाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी दुसरी बाजू सांगण्याचा प्रयत्न केला. या विषयाच्या बाबतीत या सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री यांनी वस्तुस्थिती विशद करण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात मी माझा निर्णय देण्यास सुरुवात केलेली आहे, कृपया सन्माननीय सदस्यांनी माझा निर्णय ऐकून घ्यावा. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे या विषयासंबंधी आपले मत मांडत

**सभापती** ......

होते, त्यावेळी त्यांनी सांगितले की, या बाबतीत एक फिर्यादही दाखल झालेली आहे. याचा अर्थ असा होतो की, ही बाब न्यायप्रविष्ट आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी देखील सांगितले की, ही बाब न्यायप्रविष्ट आहे. आजच्या सभागृहासमोरील कामकाजात हा विषय नसल्यामुळे हा प्रस्ताव मी नाकारतो. ही बाब न्यायप्रविष्ट असल्यामुळे दोन्ही बाजुच्या सदस्यांकडून जी काही चर्चा केली गेली आहे, ती सर्व चर्चा मी कामकाजातून काढून टाकतो.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

( शिवेसना पक्षाचे सदस्य सभात्याग करतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी म.वि.स.नियम 289 अन्वये प्रस्ताव माझ्याकडे दिला आहे. त्या प्रस्तावातील विषय नियम 289 चा कसा होतो, याबाबती त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 13:15

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, म.वि.स.नियम 289 च्या प्रस्तावान्वये मी एका गोष्टीकडे या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. माणसाला अपंग, निराश्रीत, परावलंबी, दयनीय बनविणा-या पोलिओने महाराष्ट्रात जाळे पसरविण्यास सुरुवात केली आहे. गोवंडी येथे एक पोलिओची केस आढळून आली आहे. गेल्यावर्षी देशामध्ये 471 रुग्ण आढळून आले होते. त्यातील 3 रुग्ण महाराष्ट्रातील होते. या वर्षी मुंबईतील गोवंडी येथे एक पोलिओची केस सापडली आहे. ही पी-3 ची केस आहे. या मुलाला गेल्या दहा महिन्यापासून डोस मिळत होते. अशी परिस्थिती असताना त्या मुलास पोलिओचा आजार झाला. त्यामुळे यात यंत्रणेचा दोष समोर आलेला आहे. प्रश्न एका केसचा नाही. परंतु माणसाला अपंग, निराश्रीत, परावलंबी,दयनीय बनविणा-या आणि संबंध देशाने ज्याचे आव्हान स्वीकारले आहे अशा पोलिओच्या आजाराबद्दल प्रश्न नाही. जनतेच्या एकूण आरोग्याबद्दलचा प्रश्न आहे. नागरी सुविधांचाही प्रश्न आहे. या रोगाला बळी पडू नये म्हणून शासनाला जी व्यवस्था निर्माण केलेली आहे, त्या महानगरपालिका प्रशासनास आणि शासनास अपयश आलेले आहे. या भयानक रोगाच्या बाबतीत तसेच जनतेच्या आरोग्याच्या बाबतीत सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे म्हणून या प्रस्तावास संमती द्यावी अशी माझी नम्र विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला विषय अतिशय महत्वाचा आहे. परंतु सभागृहासमोरील आजच्या कामकाजपत्रिकेत हा विषय नसल्यामुळे हा प्रस्ताव मी नाकारतो. आपण माझ्या दालनात यावे. हा विषय कशा पध्दतीने हा चर्चेला घेता येईल यादृष्टीने निश्चितपणे विचार करु. प्रश्नोत्तराच्या तासातील 20 मिनिटे या प्रस्तावावरील चर्चेसाठी गेली असल्यामुळे प्रश्नोत्तराचा तासाची वेळ मी 20 मिनिटे वाढवून देत आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ 13:20

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण आताच सांगितल्याप्रमाणे प्रश्नोत्तराची वेळ 20 मिनिटांनी वाढवून देण्यात येणार आहे. आज विधानसभेमध्ये गृहखात्याच्या मागण्यांवर चर्चा आहे. एकाच विभागाच्या मागण्या आहेत. याठिकाणी मी थांबून राहिलो तर खालच्या सभागृहात मंत्री उपस्थित नाहीत म्हणून सन्माननीय सदस्य मुद्दा उपस्थित करतील.

**सभापती** : 40 मिनिटे झाल्यानंतर आपण खालच्या सभागृहात जाऊ शकता. पुढील 20 मिनिटे काही अडचण आली तर मी त्याबाबत काळजी घेईन.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

**कोकण किनारपट्टीवर बहुउद्देशीय सागरी महामार्ग**

**(१) * ३७८०४ श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दिपक सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३५१५५ ला दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण किनारपट्टीवर बहुउद्देशीय सागरी महामार्ग संदर्भातील तांत्रिक सर्वेक्षण व आर्थिक सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, या कामाला प्रत्यक्ष सुरुवात केव्हापासून करण्यात येणार आहे, व सदर काम किती कालावधीत पूर्ण होण्याचे अपेक्षित आहे,

(३) अहवाल तयार झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविशेठ पाटीलल, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) व (२) कोकण किनारपट्टीवर बहुउद्देशीय सागरी महामार्गाचा भाग, "चिंचोटी-कामण-मानकोली-अंजूरदिवे" या ३१ कि.मी. लांबीच्या रस्त्याच्या चौपदरीकरणास खाजगीकरणांतर्गत शासनाने मान्यता दिलेली आहे. उर्वरित लांबीच्या तांत्रिक व आर्थिक सुसाध्यतेच्या प्रस्तावाकरिता शासनाने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. सुसाध्यता प्रस्तावाचे काम प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की तांत्रिक व आर्थिक सुसाध्यतेच्या प्रस्तावाकरिता शासनाने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. बीओटी तत्वावर या प्रकल्पाचे काम देताना आर्थिक निकषात बसत नसल्यामुळे कामास विलंब होत आहे. हा सागरी महामार्ग केव्हा पूर्ण होणार आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, कोकण किनारपट्टीवरील या सागरी मार्गाचे तांत्रिक सर्वेक्षण तसेच आर्थिक सुसाध्यतेचे काम प्रगतीपथावर आहे. एकूण चार जिल्हयातून हा रस्ता जात असून रस्त्याची एकूण लांबी ७५० कि.मी.आहे. संपूर्ण रस्ता नागमोडी वळणाचा आणि डोंगराळ भागातून जात असून हा राज्य महामार्ग क्र. ४ मधून जात आहे. जवळजवळ ६९५ कि.मी.चे बांधकाम झालेले आहे. उर्वरित ५५ कि.मी.बांधकाम शिल्लक आहे. यारस्त्याच्या बांधकामासाठी जवळजवळ १२५० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. पूल आणि जेट्टीच्या कामासाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे. रस्त्याच्या सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर असून ते जून २००८ पर्यंत पूर्ण होईल्.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या रस्त्याचे काम केव्हा पूर्ण होणार आहे असा माझा प्रश्न होता. परंतु मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले आहे की जून २००८ पर्यंत सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईल.

......२





ता.प्र.क्र. ३७८०४ पुढे सुरु....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उत्तरात सांगितले आहे की, तांत्रिक सर्वेक्षण आणि आर्थिक सुसाध्यतेच्या प्रस्तावाकरिता सल्लागाराची नेमूणक केलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की नेमके तांत्रिक काम कधीपर्यंत पूर्ण होईल आणि प्रत्यक्षात रस्त्याच्या बांधकामाला केव्हा सुरुवात होईल ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, सर्वेक्षणाचे काम जून २००८ पर्यंत पूर्ण होईल. या रस्त्याचे काम खाजगीकरणातून करावयाचे आहे. पहिल्या टप्प्याच्या कामाला २३.२.०७ रोजी मंजुरी दिलेली आहे. पहिला टप्पा चिंचोटी-कामण-मानकोली-अंजूरदिवे या ३१ कि.मी. रस्त्याच्या चौपदीकरणाच्या कामाला मंजुरी दिलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या महामार्गासाठी १२५० कोटी रुपये एकूण खर्च येणार आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. १२५० कोटी रुपयांपैकी अर्थसंकल्पामध्ये किती रकमेची तरतूद करण्यात आली आहे ?

श्री. रविशेठ पाटील : सभापती महोदय, या महामार्गाच्या कामामध्ये एकूण ९ पूल येत आहेत. त्यासाठी ३ वर्षात जवळजवळ १८२ कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## गुहागर तालुक्यातील चिखली पांगारी हवेली या रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण करण्याबाबत

**(२) * ३८४३५ श्री.भास्कर जाधव** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर तालुक्यातील चिखली पांगारी हवेली या रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरण व्हावे अशी मागणी येथील ग्रामस्थांनी व लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,
(२) सदर रस्त्यावरून बारमाही वाहतूक असते व या मार्गावरुन सुमारे १५ गावांचा दळणवळण करण्याचा एकमेव मार्ग आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.
(२) होय.
(३) सदर रस्त्याच्या एकूण १९.०० कि.मी. लांबीपैकी ४.५३० लांबीमध्ये डांबरी नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.
३.५० कि.मी. लांबीत खड्डे दुरूस्तीच्या कामाची निविदा प्रक्रीया सुरू आहे.
तसेच ९.०० कि.मी.लांबी सुस्थितीत असून उर्वरित २.०० कि.मी. (कि.मी. १६.० ते १८.०) लांबीतील नुतनीकरणाचे काम निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे प्रयत्न राहतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, हा रस्ता 15 गावांच्या दळणवळणाचा रस्ता असल्याचे व एकूण 15 कि.मी.लांबीचा असल्याचे मंत्रीमहोदयांनी मान्य केले आहे. 4.530 कि.मी.रस्त्याच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण झाल्याचे उत्तरात म्हटले आहे. हे काम केव्हा पूर्ण करण्यात आले? 3.50 कि.मी.लांबीच्या खड्डे दुरुस्तीच्या कामाची निविदा प्रक्रिया केव्हा पूर्ण होईल आणि काम केव्हा पूर्ण होईल? शेवटचा 2.00 कि.मी.रस्ता हा पूर्णपणे कच्चा रस्ता असून 15 गावांच्या दळणवळणाची परिस्थिती लक्षात घेऊन या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम यावर्षी पूर्ण करण्यात येईल का?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, चिखली-पांगारी हा रस्ता अनेक गावांना वेढलेला रस्ता आहे. 3.50 कि.मी.रस्त्याच्या खड्डे भरण्याच्या कामासाठी रु.1 लाखाच्या खर्चास मंजुरी दिलेली आहे. येत्या 15 दिवसात हे काम पूर्ण केले जाईल. 5.50 कि.मी.रस्त्याचे बीबीएम व नुतनीकरणासाठी 75 लाखाचा खर्च येणार असून एस.आर.कार्यक्रमातून 3.00 कि.मी.रस्त्याच्या नुतनीकरणाचे काम प्रायॉरिटीमध्ये पूर्ण करु.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38435..............

श्री.भास्कर जाधव : पुढील 2 कि.मी.चा रस्ता आहे तो झालेला नाही. त्यामुळे त्याचे नुतनीकरण करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तो पूर्णपणे कच्चा रस्ता आहे. त्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम यावर्षी करण्यात येईल काय?

श्री.रविशेठ पाटील : पावसाळ्यापूर्वी 2 कि.मी.चा रस्ता केला जाईल.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**इस्लामपूर (ता.परभणी) येथे निवडणूकीत मतदान न केल्याच्या कारणावरुन महिलेला जिवंत जाळल्याबाबत**

**(३) * ३७९८५ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इस्लामपूर (ता.परभणी) येथे निवडणूकीत मतदान न केल्याच्या कारणावरुन दिनांक १५ जानेवारी,२००८ रोजी महिलेला जिवंत जाळले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी असणाऱ्या व्यक्तीवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) निवडणुकीत पराभूत झाल्याच्या कारणावरुन महिलेस जिवंत जाळण्यात आले हे खरे आहे. मात्र सदरचे गाव इस्लामपूर नसून इटलापूर आहे.

(२) व (३) याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून दिनांक १५ जानेवारी, २००८ रोजी दैठणा पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. ६/२००८, भा.दं.वि.स. कलम ३०७,३०२,१४७,१४८,१४९, मु.पो.का. कलम १३५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील निष्पन्न १० आरोपींना अटक करण्यात आली असुन गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

----------

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, 10 आरोपींना अटक करण्यात आली आहे. परंतु स्थानिक माहितीनुसार आरोपींची संख्या जास्त आहे. उर्वरित फरारी आरोपींना अटक करण्यात आली आहे का? महिलेस जिवंत जाळण्यात आले असून तिचे घर सुध्दा जाळून टाकले. अशा आपद्ग्रस्त कुटुंबाला शासनातर्फे आर्थिक मदत देण्यात आली आहे का?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, एकूण 10 आरोपींना अटक करण्यात आली. ज्यांचे नावे निष्पन्न झाली त्यांना अटक करण्यात आली आहे. ज्यांचे घर जाळण्यात आले त्यांना अद्याप आर्थिक मदत देण्यात आलेली नसून प्रस्ताव विचाराधीन आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, अतिशय गंभीर घटना आहे. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत मतदान केले नाही म्हणून एका राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी या महिलेला अंगावर पेट्रोल टाकून जिवंत जाळले, तिचे घर जाळले. तरी देखील शासनाकडून दखल घेतली गेली नाही. 10 आरोपींना अटक केली परंतु फरारी आरोपी आहेत त्यांच्याविरुध्द शासनाने काय कारवाई केली? या आपद्ग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत का दिली नाही? या कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत दिली जाईल का? फरार आरोपींवर कारवाई करणार का? ज्यांना अटक करण्यात आली ते कोणत्या राजकीय पक्षाचे आहेत हे मंत्रीमहोदय सांगतील काय?

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37985.............

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : कोणतेही आरोपी फरारी नाहीत. जेवढे आरोपी होते त्या सर्वांना अटक करण्यात आली आहे. शासनाच्या नियमानुसार जी शक्य असेल ती मदत शासन देईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील लोकांची मानसिकता कशी बदलत आहे याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. मतदान केले नाही म्हणून महिलेला जिवंत जाळण्यात आले, तिचे घर जाळण्यात आले. परंतु अद्याप शासनाने या कुटुंबाला आर्थिक मदत दिली नाही. या आपद्ग्रस्त कुटुंबाला किती दिवसात मदत दिली जाईल?

(नंतर श्री.खर्चे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. भोगले.... 13:30

ता. प्र. क्र. 37985......

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्या गावात पुंड नांवाची एक फॅमिली असून त्या फॅमिलीतील एक व्यक्ती पाच वर्षे सरपंच होती आणि त्यांची पत्नी पाच वर्षे सरपंच होती. तसेच रेंगे नावाची एक विरोधक फॅमिली होती. त्यांनी यांच्या विरोधात या फॅमिलीने एक पॅनल तयार केले आणि त्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. तसेच दोन वर्षे या दोन फॅमिलीत जमिनीवरुन देखील वाद सुरु होता. अशा प्रकारे त्यांच्यात गावात दोन गट आणि पार्टीशन होते. यातून चिडून त्यांनी श्री. रेंगे यांच्या पत्नीचा जाळून निर्घृण खून केला. या प्रकरणात 10 प्रमुख आरोपी असल्याचे निष्पन्न झाले असून त्यांना तातडीने अरेस्ट करण्यात आले. तसेच या कुटुंबाला मदतीची आवश्यकता असेल तर तपासून निश्चितपणे मदत केली जाईल.

श्री. सुरेश देशमुख : महोदय, माझ्या तालुक्यातीलच हे प्रकरण असून त्यासंबंधीची वस्तुस्थिती थोडीशी वेगळी आहे. मी या प्रश्नाबाबत आपल्याबरोबर चर्चा देखील केली आहे. यातील वस्तुस्थिती अशी आहे की, या प्रकरणात 10 आरोपींना त्याच दिवशी अटक करण्यात आली असून पोलीस तपास सुरु आहे. यातून वेगळे निष्पन्न होणार आहे काय ? याप्रकरणी जो तपास सुरु आहे तो गरज पडल्यास वेगळया प्रकारे करावा, असे मला वाटते व त्या अनुषंगाने शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, वेगळया प्रकारे तपास करण्याची गरज भासली तर तसा तपासही करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : महोदय, हाविषय ज्यावेळी सभागृहासमोर आला त्यावेळी माझ्या समोर एक प्रश्नचिन्ह उभे राहिले. एक स्त्री म्हणून राजकारणात वावरत असताना पुरुषप्रधान देशात जर अशा प्रकारचे वातावरण निर्माण करुन तिचा खून करण्यात येत असेल तर आपण कुठे तरी संरक्षण करण्यासाठी कमी पडलो आहोत की काय ? अशा प्रकारची शंका येते. या स्त्रीच्या कुटुंबियांना मदत करण्याची गरज भासली तर ती करण्यात येईल इथपर्यंत विचार करुन चालणार नाही तर ही मदत किती दिवसात करणार आहे ? तसेच पुन्हा अशा घटना घडल्या तर त्यावर शासनाच्या वतीने कायमस्वरुपी कोणती उपायोजना करण्यात येणार आहे ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37985......

श्री. आर.आर.पाटील : महोदय, तेच तेच प्रश्न विचारलेज जातात....अडथळा....यामध्ये आरोपी व फिर्यादी हे कोणत्या पक्षाचे आहेत, त्याच्याशी आपला काही संबंध नाही, तो आमचा इंटरनल प्रश्न आहे. ज्या रेंगे नावाच्या महिलेला जाळले ती राष्ट्रवादी पक्षाची आणि आरोपी काँग्रेस पक्षाचे आहेत.

--------------

**<u>तारांकित प्रश्न क्रमांक : 41480</u>**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )**

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.पो. ता. जि. रत्नागिरी येथील फिनोलेक्स कंपनीच्या हायड्रोजन व क्लोरीन या ज्वलनशील वायूचे प्लँट असलेल्या परिसरात अज्ञात इसमांनी आगीचे गोळे फेकल्याबाबत.**

**(5) * 37425 श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दि.1.1.2008 रोजी रात्री 8.30 वाजता वा त्या सुमारास मु.पो. ता. जि. रत्नागिरी येथील फिनोलेक्स कंपनीच्या हायड्रोजन व क्लोरीन या ज्वलनशील वायूचे प्लँट असलेल्या विभागाच्या दिशेने आगीचे काही गोळे अज्ञात इसमांनी फेकल्याने 320 फूट/190 फूट व 100 फूट/120 फूट असे दोन प्लँट व परिसरातील निलगिरी, सोनखैराची झाडे व गवत नष्ट झाले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर आग लावण्याच्या प्रकाराची तक्रार रत्नागिरी, ग्रामीण पोलीसांकडे कंपनीच्या सुरक्षा अधिकारी श्री. सुर्यकांत कृष्णाजी सपकाळ यांनी त्वरीत दिली,हे खरे आहे काय,

(3) सदरप्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय, असल्यास तपासाचे निष्कर्ष काय आहेत,

(4) असल्यास, त्यामध्ये दोषी आढळून आलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर पाटील यांच्याकरिता** : (1) अंशत: खरे आहे.

प्लँटच्या दिशेने फेकलेल्या आगीच्या गोळयांमुळे 320 फूट ते 190 फूट व 105 फूट ते 210 फूट अशा दोन प्लॉटमधील गवत, निलगिरी व सोनेखैराची झाडे असलेला भाग जळून अंदाजे रु. 5000/- चे नुकसान झाले हे खरे अहे.

(2) होय.

(3), (4) व (5) या प्रकरणी रत्नागिरी ग्रामीण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.1 / 2008 भां.दं.वि.सं.क 435,436, व 34 अनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून 9 व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे. प्रकणाचा तपास चालू आहे.

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, प्रश्न इतकाच आहे की, यामध्ये 9 आरोपींना अटक केली असून त्यांनी अशा प्रकारे कारखाना जाळून टाकण्याचे प्रयत्न का केले ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, आरोपी जबाबात काहीच सांगण्यास तयार नाहीत. पण पोलिसांची माहिती अशी आहे की, फिनोलेक्स वीज प्रकल्प होणार आहे त्याला स्थानिक आंदोलन समितीचा विरोध आहे. त्यात या 9 लोकांना अटक करण्यात आली आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, स्थानिक लोकांचा या प्रकल्पाला विरोध आहे. पण गेले 17 दिवस तेथे उपोषण सुरु आहे. त्या उपोषणाचा सुध्दा या प्रकाराशी संबंध आहे काय यासंबंधीची माहिती शासनाने घेतली आहे काय ? तसेच त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी शासन पुढाकार घेणार आहे काय ?

(नंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. खर्चे 13.35

ता.प्र.क्र. 37425....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या संदर्भात पुढाकार घेण्यात येईल. परंतु अवाजवी मागण्या मान्य करण्यात येणार नाही. आपल्या राज्याला विजेची गरज आहे .तसेच या संबंधित गावाचे नुकसान होणार नाही याची पूर्ण दक्षता घेण्याच्या सूचना सबंधितांना देण्यात येतील आणि उपोषणकर्त्याबरोबर वरिष्ठ अधिकारी चर्चा करुन सलोख्याने मार्ग काढण्याचा प्रयत्न करतील.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे दवाखान्यामध्ये उपोषण सुरु करण्यात आलेले आहे. मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन उपपोषणकर्त्याची भेट घेतली होती. त्यांचे असे म्हणणे आहे की, माननीय मंत्री महोदयांनी त्यांना असे आश्वासन दिले होते की, हाय पॉवर कमिटीची बैठक जोपर्यंत होत नाही तोपर्यंत काम सुरु होणार नाही. पाच ते सात हजार लोकांच्या उपस्थितीमध्ये दिनांक 23 ऑगस्ट 2007 रोजी माननीय मंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते. परंतु अजूनही हायपॉवर कमिटीची बैठक झालेली नाही व काम सुरु करण्यात आले आहे. तेथे उपोषणकर्त्याचे उपोषणही सुरु आहे आणि काम देखील सुरु करण्यात आलेले आहे. सरकारने तेथील लोकांना जे आश्वासन दिले होते ते रेकॉर्डवर आलेले आहे. मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की माननीय मंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते हे खरे आहे काय आणि हाय पॉवर कमिटीची बैठक केव्हा आयोजित करण्यात येणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी काय अश्वचासन दिले होते याची माहिती सध्या माझ्याकडे नाही. परंतु त्यांनी जर अशा प्रकारचे आश्वासन दिले असेल तर त्या आश्वासनाचे पालन निश्चितपणे केले जाईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वैध/अवैध वाहनचालक रस्त्यावर वाहने उभी ठेवत**
**असल्याने रहदारीस निर्माण होणारे अडथळे**

**(६) * ३७३६९ श्री. व्ही. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्ह्यात ऑक्टोबर, २००७ मध्ये वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ४२८ वाहन धारकांवर कारवाई करुन सुमारे रुपये ३३ हजार दंड वसूल करण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) शहरातील बजाज चौक, आर्वी नाका चौक व धुनिवाले मठ चौकांत वैध/अवैध वाहन चालक रस्त्यावर वाहने उभी करीत असल्यामुळे सर्व सामान्य रहदारीस अडथळे निर्माण होतात हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने काय कारवाई केलेली आहे,
(४) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री सिध्दाराम म्हेत्रे,आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (१) वर्धा जिल्ह्यामध्ये माहे ऑक्टोबर, २००७ मध्ये वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या एकूण १,८६२ वाहनधारकांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येऊन एकूण रु. १,६७,४००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

वर्धा शहरातील बजाज चौक, आर्वी नाका व धुनीवाले मठ या चौकात वाहतूक कर्मचाऱ्यांची दररोज पिकेट ड्युटी लावण्यात आली असून त्याव्यतिरिक्त वाहतूक शाखेची सतत ट्रॅफिक पॉईंट ड्युटी व पेट्रोलिंग सुरु असते. सदर ठिकाणी नो पार्किंग झोनमध्ये वाहने उभी करणाऱ्या माहे ऑक्टोबर, २००७ मध्ये ४९६ वाहन धारकांवर कारवाई करुन रु.१०,८००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. त्यामुळे आता वाहतूक सुरळीत सुरु असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, अतिशय गंभीर प्रकरणासंबंधीचा हा प्रश्न आहे. दारुबंदी असलेल्या वर्धा जिल्हयाशी संबंधित हा प्रश्न असून वर्धा जिल्हा हा महात्मा गांधी यांचा जिल्हा असल्याचे मानले जाते. दिनांक २९.११.२००७ रोजी या सबंधी माननीय गृह मंत्र्यांनी उत्तर दिले होते त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे असे सांगितले होते की, वर्धा जिल्हयात आर्वी नाका चौक येथे नवीन चौकी बसविण्यात येईल.त्याचबरोबर तेथे सिग्नल लावण्यात आलेले आहे परंतु ते कार्यान्वित



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झालेले नाहीत हे सिग्नल्स कार्यान्वित करण्यात येईल अशा प्रकारे सकारात्मक उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिले होते परंतु त्याप्रमाणे अंमलबजावणी झालेली नाही तेव्हा या दोन्हीबाबीची अंमलजबजावणी करण्याच्या संदर्भात मी हा प्रश्न पुन्हा विचारलेला आहे. त्या प्रश्नाला उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे, की तेथील वाहतूक सुरु आहे. मला त्यांना असे सांगावयाचे आहे की," तेथे वाहतूक सुरु आहे परंतु ती सुरळीत सुरु नाही." मला या तीनही चौकातून नेहमी जावे यावे लागते. त्या ठिकाणी जे भाजी विक्रेते किंवा इतर फेरीवाले बसतात त्यांना तेथून हटविण्यात यावे असे माझे म्हणणे नाही परंतुत्यांना एका रांगेत बसविण्यात आले पाहिजे. तेथे पोलीस कर्मचारी खर्च्या टाकून बसतात तेव्हा या फेरीवाल्यांनी एका लाईनत बसविण्याचे काम त्यांनी केले पाहिजे. त्यानंतर मला दारुविक्रीच्या संदर्भात असे विचारावयाचे आहे की, वसंत प्राथमिक शाळा आर्वी चौकात असून त्या शाळेत दारु विक्रीसाठी ठेवण्यात येते आणि तेथून बाहेर विकली जाते. ही गोष्ट मी तेथून जातांना व येतांना नेहमीच पाहत असतो . वर्धा शहरातील या ठिकाणी दारु विकली जाते ती बंद करण्यात आली तर मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करीन तेव्हा तेथील दारु विक्री बंद करण्यात येणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बजाज चौक ते आर्वी नाका या भागात वाहतुकीची कोंडी होत असते . ही कोंडी होऊ नये यासाठी पोलिसांनी वेळोवेळी कारवाई केलेली आहे. हा संपूर्ण भाग नो पार्कींगचा आहे. दिनांक १जानेवारी २००८ ते १.३.२००८ पर्यंत नो पार्कींगच्या ठिकाणी वाहने पार्कींग केल्याबद्दल ५ हजार ४०० रुपये दंड वसूल केनेनस असहे. परवान्या पेक्षा अधिक प्रवासी बसवून वाहतूक केली म्हणून संबंधित वाहन चालकाकडून १ लाख ५३ हजार रुपयांचा दंड वसूल केलेला आहे हेल्मेट वापरले नाहीत म्हणून ७ हजार ९०० रुपये दंड वसूल केलेला आहे.अवैध प्रवासी वाहतूक केली म्हणून १ लाख ९९ हजार रुपये वसूल केलेले आहेत.. अशा प्रकारे त्या ठिकाणची वाहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टीने अलीकडे पोलिसांनी काम केलेले आहे.बजाज चौक येथे पोलीस चौकी २००८ सालापासून सुरु करण्यात आलेली आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही. सिग्नल्स हे नगरपालिकेने लावावयाचे असून या सिग्नल्ससाठी त्यांनीच खर्च करावयाचा असतो .



ता.प्र.क्र.३७३६९ श्री.डायगव्हाणे ..

नगरपालिकेकडून सिग्नल्स बसविण्याचे काम करुन घेण्यात येईल असे मागच्या वेळी आश्वासन दिले होते. परंतु अजूनही सिग्नल्स बसविण्याचे काम केलेले नाही तेव्हा आर्वी नाका येथे सिग्नल्स बसूवन ते कार्यान्वित करण्याच्या बाबतीत नगरपालिकेला सूचना दिल्या पाहिजेत. तेव्हा या सूचना देण्यात येतील काय तसेच या ठिकाणी जे आश्वासन देण्यात आले होते त्याप्रमाणे चौकी बसविण्यात येईल काय . त्यानंतर मी दारु विक्रीसंबंधीचा प्रश्न विचारला होता वर्धा जिल्हयात ज्या ठिकाणी दारुची विक्री केली जाते ती बंद करण्यात येणार आहे काय प्राथमिक शाळेत दारु ठेवली जाते आणि रस्त्यावर आणून ती विकली जाते. माझ्या घरासमोर मुख्य भागात हा प्रकार सुरु आहे तेव्हा तो त्वरित बंद करण्यात येणार आहे काय तसेच चौकी आणि सिग्नल्स बसविण्याच्या संदर्भात व्यवस्था करण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37369...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सिग्नल्सच्या बाबतीत सांगावयाचे तर शासना मार्फत या संबंधात नगरपालिकेला सूचना देण्यात येतील आणि जे सिग्नल्स बसविलेले आहेत पण चालू नाहीत ते चालू केले जातील. सभापती महोदय, एकदा या सदनामध्ये चर्चा झाल्यानंतर मी या बाबत माहिती घेतली आणि पोलीसांची संख्या त्या चौकामध्ये वाढविण्यात आली आहे. वर्धा जिल्ह्यातील या दोन्ही तिन्ही चौकांमध्ये आपण सिग्नल्स बसविण्याच्या बाबतीत कारवाई केलेली आहे तसेच तेथील वाहतूक सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने देखील कारवाई केलेली आहे. त्या संबंधात वाहन चालकांना अटक करणे, त्यांच्याकडून दंड वसूल करणे अशीही कारवाई केली गेली आहे. किंबहुना गेल्या वर्षभरामध्ये जेवढा दंड अशा प्रकरणांमध्ये वसूल केला होता तेवढा दंड गेल्या 3 महिन्यात त्या भागांतून वसूल केलला आहे म्हणजेच पोलिसांनी या संबंधात निश्चितपणे कारवाई केलेली आहे. तरीही आणखी गरज भासल्यास तेथे पोलिसांची संख्या वाढवून देण्यात येईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न दारू दुकानाबाबत विचारला आहे. दारू दुकानांना परवाने देण्याचा विषय हा एक्साईज विभागाशी निगडित आहे. कोठे दारू दुकान असावे, कोठे असू नये या बाबत नियम आहेत. म्हणजे शाळेपासून, देवळापासून किती अंतरावर दारू दुकान असावे वगैरे नियम आहेत. परंतु राज्यामध्ये काही ठिकाणी या नियमांचे उल्लंघन करूनही अशी दुकाने चालू राहत आहेत म्हणून या बाबत धोरणात्मक निर्णय मी सांगतो. सन्माननीय सदस्य शिक्षक आमदार आहेत आणि त्यांना तेथे दारू दुकान असल्याचे पाहण्यालाही लाज वाटते असे त्यांनी सांगितले आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रात जितक्या म्हणून ठिकाणी शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून अधिकृत परवान्याने दारू दुकान चालू असेल त्यांनी नियमांचे पालन केले पाहिजे हीच भूमिका या सगळ्यांच्याच बाबतीत घेतली जाईल. सभापती महोदय, वर्धा जिल्हा हा पूर्णपणे दारूबंदी असलेला जिल्हा आहे. याबाबतीत देखील पोलिसांनी वेळोवेळी कारवाई केलेली आहे. परंतु शेजारच्या राज्यातून तेथे दारू आणून विकली जाते, त्यातून गुन्हेही होतात. याबाबतीत कडक वचक बसावा म्हणून हे गुन्हे आपण नॉन-बेलेबल केलेले आहेत, तसेच दंडाची रक्कम देखील मोठ्या प्रमाणात वाढविली आहे. असे असूनही असे प्रकार घडत असतील. ... आता येथे सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले, शाळेमध्ये दारू ठेवली जाते व तेथून ती बाहेर विकायला नेली जाते वगैरे जे सांगितले आहे, ती माहिती खरी असल्याचे गृहीत धरून त्याबाबत चौकशी

.... आय 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र.37369 ....

केली जाईल आणि संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल आणि तेथील पोलिसांना या प्रकाराची माहिती असूनही त्यांनी याबाबत काहीही न केल्याबद्दल संबंधित पोलीस ठाणे इन-चार्जवर कारवाई केली जाईल.

***

..... आय 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर जवळील किन्हवली फाट्याजवळ एक लक्झरी बस झोपडीत शिरुन झालेला अपघात**

**(7) * 37504 श्री.राजन तेली, श्री. संजय दत्त, श्री. गोविंदराव आदिक, श्री. सुरेशदादा देशमुख, श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई-नाशिक महामार्गावरील शहापूर जवळील किन्हवली फाट्याजवळ दिनांक 9 डिसेंबर, 2007 रोजी वा त्यादरम्यान एक लक्झरी बस झोपडीत शिरुन झालेल्या अपघातात दोन महिला ठार होऊन अन्य तीन जण गंभीर जखमी झाल्याची भयंकर घटना घडली, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अपघातात मृत्यू पावलेल्या महिलांच्या कुटूंबाला व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच वाहन चालकावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिद्धाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे.
(2) व (3) होय.
दिनांक 9.12.2007 रोजी पटेल कंपनीच्या लक्झरी बसचा चालक त्याच्या ताब्यातील बस अतिवेगाने व रॉंग साईडने मुंबईहून नाशिककडे जात असताना किन्हवली फाटकाजवळ वळण घेणाऱ्या ट्रेलरला धडक मारुन नंतर बाजूला असलेल्या झोपडीत बस घुसल्याने झोपडीमधील 2 महिला मृत्यू पावल्या व तीन जण जखमी झाले आहेत.
सदर अपघाताबाबत शहापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.198/2007 नुसार भा.दं.वि.सं.कलम 304(अ), 279, 337, 338 मोटार वाहन कायदा कलम 184, 187 प्रमाणे आरोपी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी बस चालकास अटक करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
सदर घटनेतील मृतांच्या वारसांना व जखमींना आर्थिक मदत मिळविण्यासाठी मोटार अपघात दावा न्यायाधिकरण येथे दावा दाखल करण्याचा सल्ला देण्यात आला असून आवश्यक कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा प्रश्न एका स्पेसिफिक घटनेबद्दल असला तरी या प्रश्नाच्या निमित्ताने एका महत्त्वाच्या बाबीकडे मला आपल्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. हल्लीच्या काळात खाजगी प्रवासी वाहने त्यांची प्रवासी क्षमता आणि वाहन गती याबाबत

..... आय 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MMP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 13:40

श्री. संजय दत्त (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 37504 ....

कोणत्याही प्रकारचे निर्बंध पाळत नाहीत. त्यामुळेच सध्या अपघातांचे प्रमाण खूप वाढलेले आहे याची दखल घेऊन शासन या संदर्भात काही नेमक्या उपाय योजना करणार आहे काय ? तसेच या प्रकरणामध्ये जखमींना आणि मृतांच्या वारसांना अजून आर्थिक मदत न मिळण्याची कारणे काय आहेत ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, दिवसेंदिवस वाढत्या वाहन संख्येमुळे अपघातांचे प्रमाणही वाढत आहे. दरवर्षी आपल्या राज्यामध्ये 11 हजार मृत्यू होतात त्यात नैसर्गिक मृत्यूनंतर सर्वाधिक प्रमाण अपघाती मृत्यूंचे आहे. यामागे तीन कारणे आहेत. एक म्हणजे वाहनाची कंडिशन, दुसरे म्हणजे ड्रायव्हरची कंडिशन आणि तिसरे कारण म्हणजे रस्त्याची कंडिशन. या तिन्हीपैकी एकामध्ये बिघाड झाला तरी अपघात होतात. आज फार सोप्या पद्धतीने राज्यात वाहन परवाने दिले जाताहेत. तसेच संबंधितांनी किती तास ड्युटी करावी हेही ठरविण्याची वेळ आली आहे. याबाबत परिवहन विभागाबरोबर मी स्वत: चर्चा केलेली आहे आणि आणखीही चर्चा करणार आहे. एखादा ड्रायव्हर सलग किती तास ड्युटीवर राहू शकेल याबाबतही नियम ठरविण्याची गरज आहे तसेच जे अपघाती झेन्स आहेत तेथे सातत्याने अपघात होतात तर त्या ठिकाणी रस्त्यांची दुरूस्ती करणे, जी कंडम वाहने असतील तर त्यांच्याबाबतीतही काही निर्णय घेणे क्रमप्राप्त झालेले आहे. तेव्हा याबाबत लवकरच शासनामार्फत निर्णय घेतले जातील.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, दोन वाहने रात्रीच्या वेळी अतिगतीने जात असताना अप्पर आणि डीप्पर लाईटस् न दिल्यामुळे देखील अनेक दुर्घटना होत असतात. त्याबद्दल शासन विशेष उपाय योजना करणार आहे काय ? दक्षिणेकडील राज्यात हेड लाईटस् असतात त्याच्या खाली काळी पट्टी लावलेली असते त्यामुळे अप्पर-डिप्परचा प्रश्न येत नाही. तर ती योजना आपण आपल्याकडे राबविणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, परिवहन विभागाला या बाबत विचार करण्यास सांगण्यात येईल. तसेच अन्य राज्यात या संदर्भात काय परिस्थिती आहे याची माहिती घेऊन गैरसोय होणार नसेल तर तशी पद्धत स्वीकारण्याविषयी सूचना देण्यात येतील.

( यानंतर श्री. सरफरे ....जे 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37504...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शासनाच्या परिवहन विभागामध्ये अनेक पदे रिक्त आहेत. त्याचप्रमाणे ट्रॅफिक पोलिसांची सुध्दा कमतरता आहे. ही अडचण लक्षात घेऊन पदे भरण्यात येतील काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, शहरामधील ट्रॅफिक पोलिसांची संख्या वाढविण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. गेल्या दोन वर्षापासून सतत ट्रॅफिक पोलिसांची संख्या वाढवीत आहोत. त्याचप्रमाणे परिवहन विभागातील अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. वाढणाऱ्या वाहनांच्या तुलनेत ही संख्या पर्याप्त नाही. त्यादृष्टीने शासन विचार करील.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, एका गंभीर प्रश्नाची दखल घेऊन माननीय उप मुख्यमंत्र्यांनी कठोर भूमिका घेतल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. याबाबत माझा सूचनारुपी प्रश्न असा आहे की, खाजगी प्रवासी वाहनांची तपासणी मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार एक वर्षाच्या आत करणे बंधनकारक आहे. या दरम्यान जर गाडी बिघडली तरी ती पळविण्यात येते. तेव्हा संबंधित कायद्यामध्ये दुरुस्ती करुन एक वर्षाचा कालावधी कमी करण्याचा शासन विचार करील काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आज एक वर्षानंतर सुध्दा व्यवस्थित तपासणी होत नाही. आपल्याकडील कर्मचाऱ्यांची परिस्थिती पाहिल्यानंतर व त्यांच्यावर असलेला कामाचा ताण पाहिल्यानंतर वाहन चालकाची केवळ सहा मिनिटांची चाचणी करुन त्याला वाहन परवाना दिला जातो. अशाप्रकारच्या असंख्या त्रुटी आहेत. तेव्हा हे अपघात कमी करण्यासाठी ज्या काही गोष्टी कराव्या लागतील त्याबाबत सर्वंकष अभ्यास करुन निर्णय घेतला जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोल्हापूर येथील जेष्ठ साहित्यिक मधुमालती नारायण कोटीभास्कर यांचा चोरट्यांनी निर्घुण खून केल्याबाबत**

**(८) * ३८८४८ श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.सय्यद जामा , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील जेष्ठ साहित्यक मधुमालती नारायण कोटीभास्कर यांचा दिनांक ८ जानेवारी, २००८ रोजी वा त्या दरम्यान चोरट्यांनी त्यांच्यावर हल्ला करुन व दगडाने घाव घालून त्यांचा निर्घुण खून करुन त्यांच्या अंगावरील सुमारे पाऊन लाखाचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची भयंकर घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चोरट्यांचा शोध घेवून त्यांच्यावर कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) जेष्ठ साहित्यिक मधुमालती नारायण कोटीभास्कर यांचा खून झाला हे खरे आहे. फिर्यादिने फिर्यादित नमूद केलेल्या दागिण्यातील फक्त कानातील कर्णफुले मिळून आली नाहीत. बाकी सर्व दागिने घरीच मिळून आल्याने ते जप्त करण्यात आले आहेत.

(२) व (३) याबाबत शाहुपुरी पोलीस ठाणे गु.र.क्र.८/०८ भा.दं.वि.सं. कलम ३९४, ३९७, ३०२ प्रमाणे दाखल करण्यात आला. गुन्हा उघडकीस आणणेकामी कसोशिने तपास चालू आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सदरचा गुन्हा उघडकीस येण्यासाठी कोणते खास प्रयत्न करण्यात येत आहेत?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सदर गुन्हयाचा शोध घेण्यासाठी पोलिसांच्या दोन टीम तयार करण्यात आल्या. गुन्हा घडल्यानंतर त्या विभागामध्ये आणि बाजूच्या इमारतीमध्ये साध्या वेशामध्ये महिनाभर पोलिसांची पाळत ठेवण्यात आली. आणि त्या इमारतीमध्ये कोण ये-जा करीत आहेत यासंबंधीचे निरीक्षण करण्यात आले.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांवर होणाऱ्या प्राणघातक हल्ल्यांबाबत प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न विचारण्यात येतो. आणि त्या प्रश्नाला "होय" असे उत्तर देण्यात येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र. ३८८४८.....

डॉ. नीलम गोऱ्हे...

या घटनेमध्ये पाऊण लाखाचे सोन्याचे दागिने लंपास झाल्याचे म्हटले असतांना उत्तरात केवळ कर्णफुले मिळाली नाहीत, बाकीचे दागिने घरामध्येच होते असे म्हटले आहे. यावरुन प्रश्न असा निर्माण होतो की, चोरांचा हेतू काय होता? तसेच, कोल्हापूर, पुणे, नाशिक या शहरामध्ये राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी आपण हेल्पलाईन सुरु केली आहे. या हेल्पलाईनचा फायदा किती लाभधारक घेत आहेत? याबाबतची माहिती आता आपणाजवळ नसेल तर ती नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी. परंतु आपण केलेल्या घोषणेचा फायदा लोक घेत नाहीत असे आपण उत्तर देण्यापेक्षा आपण ज्येष्ठ नागरिकांची बैठक घेतली पाहिजे, त्यांना समजावून सांगितले पाहिजे, त्यांच्याशी फोनवर संपर्क साधला पाहिजे. त्यांच्या घरामध्ये ठेवावयाच्या नोकर वर्गाकरिता परमिट योजना लागू करणार काय? त्याकरिता आपण आचारसंहिता लागू करणार काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी एका महत्वाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. आपल्या राज्यामध्ये वयोवृद्ध माणसांच्या होणाऱ्या हत्त्यांमध्ये यावर्षी घट झ ााली आहे. गेल्या वर्षीच्या आणि त्या अगोदरच्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या कमी आहे. याची प्रमुख कारणे बहुतांशी घटना त्या घरातील नोकरांकडून घडल्या आहेत. अलिकडच्या काळात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे, काही वृद्ध माणसांची मुले परदेशात नोकरीकरिता जाणे, वृद्ध माणसांनी घरामध्ये ठेवलेल्या नोकरावर विश्वास बसणे, आणि कमी पगारामध्ये नोकर मिळत असल्यामुळे तो विश्वास संपादन करतो आणि जातांना त्या वृद्ध दांपत्यांना मारुन जातो. याकरिता वयोवृद्ध लोकांकरिता मुंबई शहरामध्ये हेल्पलाईन सुरु केली. या हेल्प लाईनची मदत ४६ हजार वृद्धांनी मागितली.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38848 . . . .

श्री.आर.आर.पाटील . . . .

नंतर पोलिसांनी मदत केलेली आहे. केवळ संरक्षण करण्याच्या बाबतीतील मदत नव्हे तर मी देखील उत्सुकतेपोटी माहिती घेतली आहे. त्यावरुन असे दिसून आले की, जी वृध्द माणसे एकाकी रहात आहेत, त्यापैकी काहीजण पोलीस स्टेशनला फोन करुन सांगतात की, आमच्याकडे पोलीस कॉन्स्टेबलला गप्पा मारण्यासाठी पाठवावे किंवा गॅस आणून आणून देण्यासाठी पाठवावे वगैरे. नेहमीच पोलिसांच्या बाबतीतील त्रुटी शोधल्या जातात. परंतु पोलीस देखील अशा प्रकारची चांगली कामे करीत आहेत. मुंबई शहरामध्ये वृध्द लोकांचे जवळजवळ 46 हजार कॉल अटेंड करण्यात आलेले आहे. पोलीस दलाने खूप चांगल्या प्रकारचे काम केलेले आहे हे मला सांगावयाचे आहे. त्याचबरोबर वृध्द लोकांच्या घरी जे नोकर असतात, त्यांचा पत्ता घेऊन, त्याची नोंद ठेवण्याचे काम केले जात आहे. तसेच ते ज्या राज्यामधून आलेले आहेत, तेथे जाऊन त्यांची माहिती घेणे आवश्यक आहे. म्हणून याबाबतीत वेळोवेळी लोकांना आवाहन केले जाते की, तुमच्या घरी जे नोकर आहेत, त्यांचा पत्ता व फोटो देण्यात यावा. जे नोकर अन्य राज्यातून येथे कामासाठी आलेले आहेत, त्यांचे त्या-त्या राज्यामध्ये जाऊन व्हेरिफीकेशन करण्याचे काम सुरु केले आहे. ज्याप्रमाणे मुंबईमध्ये काम केले जात आहे, त्याच पध्दतीने राज्यातील सर्व शहरांमध्ये वयोवृध्द लोकांच्या मदतीसाठी हेल्प लाईन सुरु करणे आणि जे वृध्द लोक एकाकीपणे रहात आहेत, त्यांच्या घरी पोलिसांनी अधुनमधून भेट देऊन त्यांची सुरक्षितता राखणे अशा प्रकारच्या योजना राज्यभर सुरु करण्यात येतील.

----

. . . .के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मोर्शी पिंपरी जि.पुणे येथील टोलनाक्यावर गांजा पकडण्यात आल्याबाबत**

**(9) * 37662 श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.राजन तेली** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मोर्शी पिंपरी जि. पुणे येथील टोलनाक्यावर दिनांक 14 डिसेंबर, 2007 रोजी वा त्या दरम्यान 162 किलो गांजा पकडण्यात आला, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) होय, दिनांक 13.12.2007 रोजी मोशी टोलनाक्याजवळ 162 किलो 500 ग्रॅम गांजा पकडण्यात आला, हे खरे आहे.

(2), (3) व (4) या प्रकरणी चौकशीअंती पाच आरोपीना अटक करुन त्यांच्याविरुद्ध भोसरी पोलीस ठाण्यात गु.रं.क्रं. 3279/07 एनडीपीएस ॲक्ट क.20 (ब), 29 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर आरोपींविरुद्ध विशेष सत्र न्यायाधिश शिवाजीनगर सत्र न्यायालय येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून खटला न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, गांजाची वाहतूक करणाऱ्या टोळीने हा गांजा कुठून आणला होता, हे तपासामध्ये निष्पन्न झालेले आहे काय ? तसेच पाच जणांच्या टोळीचे इतर काही लोकांशी संबंध आहेत काय ? अशा प्रकारच्या केसेस संबंधात त्यांची पूर्वीपासूनची गुन्हेगारी प्रवृत्ती असल्याचे दिसून आले आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हा गांजा आंध्र प्रदेशमधील वारंगळ जिल्हयातून आणला होतो. या प्रकरणामध्ये पाच आरोपी आहेत. त्यांची अशा प्रकारच्या केसेसमध्ये पूर्वीपासूनची गुन्हेगारी प्रवृत्ती आहे काय, हे तपासण्यासाठी आंध्र प्रदेशमध्ये खास पथक पाठवून माहिती घेतली जात आहे.

-----

. . . .के-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



**मु.पो. खिर्डी बु॥ जि. जळगांव येथे रेंभोटा रोडवरील केळीच्या बागेत पावरा समाजाच्या 2 आदिवासी महिलांवर बलात्कार केल्याबाबत**

(10) * 40714 **श्री. जगदीश गुप्ता , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री.केशवराव मानकर , श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मु.पो. खिर्डी बु॥ जि. जळगांव येथे दिनांक 4 फेब्रुवारी, 2008 रोजी वा त्या सुमारास रेंभोटा रोडवरील केळीच्या बागेत पावरा समाजाच्या 2 आदिवासी महिलांवर बलात्कार करण्यात आला असल्याची तक्रार दाखल करण्यात आली, हे खरे आहे काय,

(2) सदर प्रकरणी तपासपूर्ण झाला आहे काय,

(3) असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तीविरोधात कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) पिडीत महिलांवर दि. 26/01/2008 व दि. 01/02/2008 रोजी बलात्कार झाल्याची तक्रार दाखल झालेली आहे.

(2),(3) व (4) प्रस्तुत प्रकरणी दोन्ही पिडीत महिलांनी दिलेल्या फिर्यादी नुसार निंभोरा पोलीस स्टेशन येथे भाग - 5 गु.र.नं. 03/08 भा.द.वि. कलम 376, 504, 506 व भाग -5 गु.र.नं. 04/08 भा.दं.वि. कलम 376, 504, 506 सह अ.जा.ज. (अ.प्र.) का. कलम 3(1), 12,3(2), 5 अन्वये दोन गुन्हे दाखल करण्यात आले. गुन्ह्याच्या तपासात आरोपीतांनी बलात्कार केल्याचे निष्पन्न झाले असून दोन्ही गुन्ह्यातील आरोपींना अटक केली आहे. रासायनिक विश्लेषणाचा अहवाल प्राप्त झालेला नसून गुन्हे तपासावर आहेत.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या प्रकरणातील जे दोन आरोपी आहेत, ते सध्या जेल मध्ये आहेत की त्यांची जामिनावर मुक्तता करण्यात आलेली आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सध्या दोन्ही आरोपी जेलमध्ये आहेत.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, महिलांच्या दृष्टीकोनातून हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा प्रश्न आहे. या दोन आरोपींना जामीन दिलेला आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या दोन आरोपींना जामीन दिलेला नाही.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, शासनाला रासायनिक विश्लेषणाचा अहवाल किती कालावधीमध्ये प्राप्त होईल ? तसेच ही कारवाई किती कालावधीमध्ये पूर्ण होईल ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, रासायनिक विश्लेषणाचा अहवाल लवकरच म्हणजे महिन्याभरामध्ये मिळण्याची शक्यता आहे आणि त्यादृष्टीने कारवाई करण्यात येईल.



श्री.प्रतावराव सोनावणे : सभापती महोदय, मु.पो.खिर्डी बु.जि.जळगाव येथे दि.4 फेब्रुवारी 2008 रोजी वा त्या सुमारास रेंभोटा रोडवरील केळीच्या बागेत पावरा समाजाच्या 2 आदिवासी

महिलांवर बलात्कार करण्यात आल्याचे शासनाने मान्य केलेले आहे. तसेच पोलिसांनी आरोपींना अटक देखील केलेली आहे. परंतु रासायनिक विश्लेषणाचा अहवाल प्राप्त न झाल्यामुळे तपास करण्यामध्ये विलंब होत आहे अशा प्रकारे शासनाने उत्तरामध्ये कारण दिलेले आहे. अशा प्रकारच्या अनेक गंभीर आणि माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये रासायनिक विश्लेषणाच्या अहवालाचा तांत्रिक मुद्दा पुढे करुन या माध्यमातून गुन्हेगारांना एक प्रकारे कायदेशीर प्रक्रियेतून पळवाट मिळत आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. एकतर राज्यामध्ये अशा प्रकारच्या घटनांमध्ये रासायनिक विश्लेषण करणाऱ्या प्रयोगशाळा खूप कमी आहेत. अशा वेळी या प्रकारच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये अधिक गोपनीयता आणि पारदर्शकता येणे आवश्यक आहे. तसेच राज्यातील अशा प्रकारच्या अन्यायग्रस्त, पीडित लोकांना न्याय मिळावा अशी जर शासनाची इच्छा असेल तर राज्य शासन राज्यातील रासायनिक विश्लेषण करणाऱ्या प्रयोगशाळांची संख्या वाढविणार आहे काय ? तसेच या सर्व तपासाच्या प्रक्रियेतील पळवाटा कमी करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, बलात्कारासारख्या घटनेमध्ये डोळयांनी पाहिल्याचे पुरावे उपलब्ध नसतात. बऱ्याच वेळेला पुरावे असतातच असे नाही. त्यामुळे बलात्कार झाला आहे की नाही हे सिध्द करण्यासाठी रासायनिक विश्लेषण करण्याची आवश्यकता असते.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ MMP/ KGS/ प्रथम श्रीमती रणदिवे.... 13:55

श्री. आर.आर. पाटील....... ता.प्र.क्र. 40714.........

मी आपल्याला अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की, आतापर्यंत आपल्या राज्यामध्ये प्रयोगशाळा सुसज्ज नव्हत्या. ही गोष्ट लक्षात धेऊन, आज मुंबईमध्ये, राज्यातील अत्यंत चांगली फॉरेन्सीक लॅब तयार केलेली आहे. या लॅबमध्ये डीएनए टेस्ट पासून नार्को टेस्ट पर्यंत सगळया चाचण्या केल्या जाऊ शकतील. या पूर्वी आपणाला आवाज तपासणीसाठी, चंदीगढला जावे लागावयाचे, नार्को टेस्ट करण्याकरिता बँगलोरला जावे लागायचे तसेच डीएनए टेस्ट करण्याकरिता कलकत्ता शहरामध्ये जावे लागायचे. आता मुंबईच्या फॉरेन्सीक लॅबमध्ये, सर्व सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत. मुंबईबरोबरच नाशिक, औरंगाबाद, नागपूर या शहरामध्ये देखील फॉरेन्सीक लॅबची सुविधा टप्प्याटप्प्याने प्राप्त करुन देण्याकरिता विभागाकडून प्रयत्न केले जाणार आहे. तसेच या लॅबच्या आधुनिकीकरणाकरिता देखील अधिक निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे. काही वेळा गुन्हयाच्या ठिकाणी पुरावे गोळा करण्यास उशीर झाला तरी देखील गुन्हयाचा तपास करण्याकरिता आवश्यक असणारे पुरावे नष्ट होण्याची शक्यता असते. ही गोष्ट लक्षात घेऊन, गुन्हयांच्या तपासाकरिता तातडीने पुरावे गोळा करण्यारिता एक फिरती प्रयोगशाळा देखील सुरु करण्यात येणार आहे. आतापर्यंत रासायनिक विश्लेषण करण्याकरिता प्रलंबित असणाऱ्या केसची संख्या बरीच मोठी असायची. काही केसमध्ये अनेक वर्षे रासायनिक विश्लेषण केले जायचे नाही. त्यामुळे, गुन्हेगारावर चार्ज शीट दाखल करता यावयाचे नाही. चार्ज शीट वेळेवर दाखल न केले गेल्यामुळे, गुन्हेगारांना फायदा मिळायचा. हे गुन्हेगार काही वेळेला जामीन मिळवून फरार देखील होत असत. गुन्हेगारांना ही सूट मिळू नये याकरिता या प्रयोगशाळा अधिक सक्षम करण्यात येणार आहेत. तसेच त्यांची संख्या देखील आता वाढविण्यात येत आहे. प्रयोगशाळेतील स्टाफने ओव्हर टाईम काम करुन व कामापेक्षा अधिक नमुन्यांची तपासणी केलेली आहे. आता फॉरेन्सीक लॅबमध्ये रासायनिक पृथःक्करण करण्याची प्रकरणे जास्त दिवस प्रलंबित राहत नाहीत. त्यामुळे सध्या हे काम कालबध्दतेमध्ये सुरु आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शासनाने केलेला प्रयत्न हा खरोखरच स्तुत्य आहे. परंतु मी येथे एक प्रश्न विचारु इच्छिते की, बलात्काराच्या घटनेमध्ये, डीएनए टेस्ट झाली तर त्याचे रिपोर्ट काही महिन्यात येणे आवश्यक असते. परंतु आज हे रिपोर्टस मिळण्याकरिता बराच

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विलंब होत आहे. बलात्काराच्या घटनेमध्ये सहा महिन्याच्या आत निकाल लावण्याची यंत्रणा शासनाने तयार करणे आवश्यक आहे. आपण आताच सांगितले आहे की, याकरिता काही स्पेशल कोर्टची देखील निर्मिती करण्यात येणार आहे. बलात्काराच्या घटनेतील केसचा निकाल सहा महिन्याच्या आत लागू शकेल काय, व या केसमध्ये पोलीस डीएनए टेस्टचा वापर करणार आहेत काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, बलात्काराच्या घटनेमध्ये सहा महिन्याच्या आत निकाल लागत नाहीत ही गोष्ट मी या ठिकाणी कबूल करीन. स्पेशल कोर्टस तयार करावेत असे निर्देश हाय कोर्टाने दिलेले आहेत. शासनाने बलात्कारा सारख्या घटना या अतिशय गंभीरतेने घेतलेल्या आहेत. हाय कोर्टाकडून देखील अशा प्रकरणांना सहकार्य मिळते आहे. बलात्काराच्या केसचा निकाल सहा महिन्यामध्ये लागत नाही ही वस्तुस्थिती आहे. हा निकाल सहा महिन्यामध्ये लागावा या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे. पूर्वी जिल्हयाच्या ठिकाणी एक तर प्रयोगशाळा नसायची किंवा असल्यास तेथील डॉक्टर प्रशिक्षित नसायचे. गुन्हयाच्या तपासणीकरीता कोणते नमूने घेतले पाहिजेत याची तेथील स्थानिक डॉक्टरांना माहिती नसायची. आता फॉरेन्सीक लॅबमधील डॉक्टरांना प्रशिक्षित केले जात आहे. कोणते पुरावे गोळा केले पाहिजेत, याची माहिती पोलिसांना देण्यात येत आहे. लवकरात लवकर, या कामाला गती आलेली आपल्याला दिसेल.

....................

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तंटा मुक्त गाव समिती स्थापन केल्यामुळे गंभीर दखलपात्र गुन्हयामध्ये समेट घडवून आणल्याबाबत**

**(११) * ३७२९५ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.सय्यद जामा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंटा मुक्त गांव समिती स्थापन केल्यामुळे गंभीर दखलपात्र गुन्ह्यामध्ये समेट घडवून आणल्याच्या घटना घडल्याची बाब दिनांक १३ जानेवारी, २००८ वा त्या सुमारास लातुर, उद्‌गीर येथे उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तंटा मुक्त गांव समितीला असे गुन्हे तडजोड करण्याचा अधिकार नसतांना लातूर येथे तस्लीमा बागवान आणि उद्‌गीर येथे शिवाजी मुले यांच्या पत्नीचा खून झाल्या प्रकरणी तंटा मुक्त गाव समितीने तडजोड घडवून आणल्याची बाब उघडकीस आली आहे, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तंटा मुक्त गांव समित्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) या दोन्ही प्रकरणामध्ये आरोपीवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**श्री. सिध्दराम म्हेत्रे,श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (१), (२) व (३) महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेत तडजोडीने मिटविता येण्याजोग्या (कंपाऊंडेबल) तंट्यांच्याबाबतीत मध्यस्त व प्रेरकाची भूमिका बजाविण्याच्या दृष्टीने गाव पातळीवर तंटामुक्त गाव समितीची स्थापना करण्यात आली आहे. तडजोडीने मिटविता न येण्याजोग्या (नॉन कंपाऊंडेबल) तंट्यांच्याबाबतीत समितीस कोणतेही अधिकार नाहीत. दावणगाव, ता.उदगीर येथील तस्लीमा बागवान यांच्या मरणाबाबत तंटामुक्त गाव समितीने प्रकरण मिटविले नाही. परंतू तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष मारुती माधवराव भंडे आणि निमंत्रक पोलीस पाटील, मोहन बालाजी भोसले यांनी सदर प्रकरणी अपराध्यांनी केलेल्या अपराधाची जाणीव असताना अपराध्यांना वाचविण्यासाठी गुन्ह्याचा पुरावा नष्ट केल्याने पोलीस ठाणे उदगीर (ग्रामीण) गु.नो.क्र.२/०८, कलम ३०२, २०१, ३७६ (२) (ग), १४९, २९५ (अ), ५०६ भा.द.वि. प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यांमध्ये त्यांना अनुक्रमे दिनांक ७/१/२००८ व दिनांक ६/१/२००८ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच याप्रकरणी एकुण १० आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यापैकी ४ आरोपी सध्या जेलमध्ये आहेत आणि इतर आरोपी जामिनावर मुक्त झालेले आहेत.

शिवाजी मुळे यांच्या पत्नीचा खून झालेला नाही. तथापि, उपरोक्त गुन्ह्यात त्याला दिनांक ४/२/२००८रोजी अटक करण्यात आली आहे.

(४) व (५) उपरोलिखित एक घटना घडली असून या प्रकरणी, सदरची घटना उघडकीस येताच संबंधीतांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई केली आहे. सदर प्रकरणी दिनांक१०/३/२००८ अन्वये न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या प्रकरणातील पोलीस पाटील श्री.मोहन बालाजी भोसले यांना निलंबित करण्यात आले आहे काय ? असल्यास त्यांना केव्हा निलंबित करण्यात आले

...5...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे ? तसेच तंटा मुक्त गाव समितीचे अध्यक्ष श्री.मारुती भंडे यांना अध्यक्ष पदावरुन हटविण्याबाबत शासनाकडून कोणती व केव्हा कारवाई करण्यात आलेली आहे ? या महत्वाच्या योजनेमध्ये, जे लूप होल्स आहेत ते दूर करण्यासाठी शासनाकडून काही पुढाकार घेतला जाणार आहे काय ?

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, फिल्डवर काम करीत असताना, अनेक अधिकाऱ्यांबरोबर तसेच विधी व न्याय विभागामध्ये काम करणाऱ्या वरीष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन,राज्यामध्ये महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम सुरु करण्यात आली होती.

यानंतर श्री. बरवड.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37295 ...... श्री. आर. आर. पाटील ....

त्याचे प्रमुख कारण असे की, आज न्यायालयांमध्ये दाव्यांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. त्यामुळे न्यायालयावरचा ताण वाढत आहे. लवकर निकाल लागत नाही. लवकर निकाल न लागल्यामुळे छोट्या भांडणाचे रुपांतर मोठ्या भांडणामध्ये होते. त्याचा परिणाम म्हणजे आज गावागावांमध्ये नाराजीचे तसेच न्याय मिळत नाही अशा पध्दतीचे जे वातावरण तयार झाले होते त्या गावांमध्ये पूर्वापार छोटे छोटे गुन्हे, तंटे सोडविणाऱ्या ज्या गाव समित्या होत्या त्या कार्यान्वित कराव्यात म्हणून तंटामुक्त मोहीम राज्यामध्ये सुरु करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांपासून शिक्षकांपर्यंत, निवृत्त न्यायाधीश, व्यापारी, दलीत, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, महिला या सगळ्यांना या समितीमध्ये प्रतिनिधित्व दिलेले आहे. याचा अनुकूल परिणाम म्हणजे फार चांगल्या पध्दतीचे काम राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये सुरु आहे. माझ्याकडे जी प्राथमिक माहिती आहे त्यानुसार दोन लाखापेक्षा अधिक तंटे या तंटामुक्त मोहिमेमध्ये लोकांनी स्थानिक पातळीवर सोडवलेले आहेत. हे तंटे केवळ सोडविलेलेच नाहीत तर लोकांनी पुन्हा कोर्टात जाऊन तडजोडनामा देऊन कोर्टाच्या परवानगीने हे तंटे मागे घेतलेले आहेत. सगळ्या पध्दतीचे तंटे सोडविण्यात यामध्ये यश येत आहे. परंतु बऱ्याचवेळा शासकीय योजनांची पूर्ण माहिती न घेता टीकाटिप्पणी केली जाते. एका योजनेवर टीका आली की, या योजनेमुळे जुना गावगाडा चालू होईल. देशमुख-पाटलांचे राजकारण गढीवरुन सुरु होईल आणि गावातील दलित माणसांवर अन्याय होईल. परंतु शासनाने जी.आर.मध्ये असा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, ॲट्रॉसिटीच्या प्रकरणामध्ये तडजोड करण्याचा या कमिटीला कोणताही अधिकार नाही. तसेच नॉन कम्पाऊंडेबल गुन्ह्यांच्या बाबतीतील चर्चा या कमिटीमध्ये होऊ शकत नाही. परंतु योगायोगाने या प्रकरणामध्ये तंटामुक्त समितीचा जो अध्यक्ष आहे तोच आरोपी आहे. तो आरोपी असण्याचे प्रमुख कारण असे आहे की, त्या मुलीला ज्यांनी मारले त्यामध्ये त्याचा मुलगा होता. त्याने या प्रकरणामध्ये दाबण्याचा जो प्रयत्न केला तो तंटामुक्त समितीचा अध्यक्ष म्हणून नाही तर आपल्या मुलाला वाचविण्यासाठी त्यांनी तो प्रयत्न केला.

डॉ. नीलम गोऱ्हे : ती महिला जिवंत आहे की, मयत झाली ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37295 ......

श्री. आर. आर. पाटील : ती महिला मयत झाली. तंटामुक्त समितीच्या अध्यक्षाला व त्याच्या मुलाला अटक केली. तंटामुक्त समितीतून त्यांना काढून टाकण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यातील सगळ्यांना अटक झालेली आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, काही अपवादात्मक घटनांमुळे ही योजना बदनाम करण्याचे कारण नाही. ही योजना चांगली आहे. पण माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे छोट्या घटकांचा आवाज दाबून टाकण्याचा प्रयत्न अनेक ठिकाणी सर्रास सुरु आहे. त्यामुळे त्याची शासनाने गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. त्याबाबत शासन काय करणार आहे ? दुसरा प्रश्न असा की, तंटामुक्त गावाची संकल्पना आणि त्यांचे निकष आहे काय आहेत हे स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी एक पाणवठा आहे तेच गाव तंटामुक्त मानणार असा निकष यामध्ये ठेवणार काय ? मी मसणवट्याबाबत बोलत नाही पण त्या गावामध्ये एक पाणवठा तरी पाहिजे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, पाणवठा वगैरे गोष्टी यामध्ये घातलेल्या नाहीत परंतु टप्प्याटप्प्याने ही योजना आपल्याला विस्तारित करता येईल. संत गाडगेबाबा अभियानाच्या धर्तीवर याचा विस्तारही आपल्याला करता येईल परंतु आज ज्या पध्दतीचे काम या योजनेच्या माध्यमातून सुरु आहे ते निश्चितच आनंददायी आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, त्याला कोणत्या गुन्ह्याखाली अटक केली ? दोन महिलांच्या संदर्भात हा प्रश्न आहे. एक महिलेबाबत असे म्हटले आहे की, दावणगाव, ता. उदगीर येथील तस्लीमा बागवान यांच्या मरणाबाबत तंटामुक्त गाव समितीने प्रकरण मिटविले नाही. पुढे असे म्हटले आहे की, यांना अटक केलेली आहे पण श्री. शिवाजी मुळे यांच्या पत्नीला खून इ ालेला नाही. श्री. शिवाजी मुळे यांच्यावर काय आरोप आहे ? त्यांची पत्नी जिवंत आहे काय ?

श्री. आर. आर. पाटील : त्यांची पत्नी जिवंत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : मारहाण केली त्यामध्ये त्यांनी मिटविण्याचा प्रयत्न केला काय ? त्यांनी कोणता तंटा मिटविण्याचा प्रयत्न केला ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37295 ......

श्री. आर. आर. पाटील : श्री. शिवाजी मुळे यांच्या पत्नीची कोणतीही तक्रार नाही. तिला मारहाण झालेली नाही. तिचा खून झालेला नाही. ज्या मुख्य मुलीवर जो अन्याय झाला आहे त्यातील श्री. शिवाजी मुळे आरोपी आहेत. त्यांच्यावर उदगीर पोलीस स्टेशनमध्ये कलम 302, 201, 376(2), 149, 295, 506 खाली गुन्हा दाखल आहे

डॉ. नीलम गोऱ्हे : खून कोणाचा झाला ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37295.....

श्री.आर.आर.पाटील : तस्लीमा बागवान, दावणगाव, ता.उदगीर येथे या मुलीवर बलात्कार करुन तिचा खून करण्यात आला. दोन गुन्हे घडलेले नाहीत, घटना एकच घडलेली आहे. श्री.शिवाजी मुळे हे आरोपी आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : तंटा मुक्त गाव समितीने निर्णय दिल्यावर तो निर्णय संबंधितावर बंधनकारक आहे काय ? तो निर्णय पाळला नाही तर अडचण निर्माण होते. म्हणून या निर्णयाला लोक न्यायालयाची मान्यता घेऊन त्यावर शिक्कामोर्तब करावे, अन्यथा तंटा मुक्त निर्णयाबद्दल चर्चा होईल, तो निर्णय कोणी मानणारच नाही. म्हणून लोक न्यायालयाकडून त्याला मान्यता घेण्यासंबंधीचे नवीन धोरण शासन स्वीकारणार आहे काय ? ज्यामुळे हे काम सुलभ होईल.

श्री.आर.आर.पाटील : तंटा मुक्त गाव हायकोर्टाने सुध्दा या योजनेचा गौरव करुन ॲप्रेशिएट केलेले आहे. जे खटले कोर्टात प्रलंबित आहेत त्या खटल्यासंबंधी संबंधितांनी गावात तडजोड केली तरी ते मागे घेऊ शकत नाहीत, अशा प्रकरणासाठी कोर्टात जावे लागते. राज्यातील अनेक जिल्हयातील न्यायाधीशांनी उत्स्फूर्तपणे लोक न्यायालय भरवून त्यात तडजोडी करणा-यांना बोलवून हजारो खटले लोक न्यायालयातून बाहेर काढले आहेत. हायकोर्टाने सुध्दा सरकारला मदत करण्याची भूमिका घेतलेली आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

**नांदेड जिल्ह्यातील सातेगांव नायगाव बाजार येथे प्रेयसीसह घरातून पळून गेलेल्या प्रियकराला मुलीच्या नातेवाईकांनी बेदम मारहाण करून प्रियकराचे डोळे फोडल्याबाबत**

**(१२) * ४०२८५ श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. संजय दत्त , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. गोविंदराव आदिक :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील सातेगांव-नायगाव बाजार येथे प्रेयसीसह घरातून पळून गेलेल्या प्रियकराला मुलीच्या नातेवाईकांनी बेदम मारहाण करून प्रियकराचे डोळे फोडल्याची धक्कादायक घटना दिनांक ४ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार गुन्हेगारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (१) होय, घटना दिनांक ६.१.२००८ रोजी घडली.

(२) होय.

(३) व (४) सातेगावातील दलित फिर्यादी व त्याच गावातील सवर्ण मुलगी हे फिर्यादीच्या मित्रांच्या मदतीने आंध्र प्रदेशातील कामारेड्डी येथे लग्न करण्यासाठी गेल्याचे मुलीच्या नातेवाईकांना कळले. सबब त्यांनी सदर तीनही जणांना कामारेड्डीहून पकडून गावात आणून दोन्ही दलित मुलांना चाबकाने मारहाण करुन फिर्यादीचे डोळे फोडल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्या अनुषंगाने पोलीस ठाणे कुंटुर येथे गु.र.नं.३/०८ भा.द.विचे कलम ३०७, ३३६, १३४, १४३, १४७, १४८, १४९, ३४१, ३४२, ४२७, ५०४, ५०६, ३०२, ३२३, २०१ सह अ.जा.ज.(अ.प्र.) कायदा कलम ३(१)(५), ३(१)(१०) अन्वये एकूण चौदा (१४) आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण बारा (१२) आरोपींना अटक केली असून अटक केलेले व एक फरारी असलेला आरोपी शिक्षक याचेंविरुध्द कलम २९९ सिआरपीसी प्रमाणे असे एकूण (१३) आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले असून, गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सदरहू घटना जानेवारीच्या पहिल्या आठवडयामध्ये घडलेली असताना अजूनपर्यंत आरोपी असलेला एका शिक्षकास अटक झालेली नाही. हा आरोपी पोलिसांना अजून का सापडत नाही ? त्याचा शोध घेण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न सुरु आहेत ?

३....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र.४०२८५......

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये वेगवेगळया गुन्हयांसंबंधीचे प्रश्न सभागृहासमोर आले होते. त्यापैकी हा प्रकार मात्र मी अत्यंत धक्कादायक मानतो. ही गोष्ट खरे आहे की, ती अल्पवयीन मुलगी आहे, तिला पळवून तिच्याबरोबर लग्न करण्यासाठी तिला आंध्र प्रदेशमध्ये नेण्यात आले आहे असे लक्षात आले, त्यावेळी पोलीस तक्रार करण्याऐवजी स्वत:च शोध मोहिम घेऊन त्या लोकांना मुलीसह पकडले आणि गावामध्ये आणून त्यांना मारहाण केली. त्यांचे डोळे फोडण्याचा प्रयत्न केला आहे. पोलिसांना ही घटना कळल्यानंतर पोलिसांनी ज्याप्रकारे ही घटना हाताळली त्याबाबत वर्तमानपत्रांनीही पोलिसांना ॲप्रेशिएट केले आहे. तेथील एस.पी. आणि पोलिसांनी स्वत: वर्गणी काढून दोन्ही दलित व्हिक्टीम्सना हैद्राबादला चांगल्या दवाखान्यामध्ये पाठविले. सुदैवाने या दोघांचे डोळे वाचलेले आहेत. परंतु याबाबत वर्तमानपत्रामध्ये आणि माध्यमातून ही बातमी फारशी प्रसारित झाली नाही. पण पहिल्यावेळी याबाबतची बातमी मोठया प्रमाणावर प्रसारित झाली. आता त्यांचे डोळे वाचलेले आहेत. या घटनेमध्ये जे सगळे आरोपी आहेत त्यांना पोलिसांनी अत्यंत शिताफीने पकडले आहे. एक शिक्षक अजून फरार आहेत. त्यांना शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेवटचा उपाय म्हणून नियम ८२ प्रमाणे त्यांची मालमत्ता जप्त करुन ती शासनाकडे जमा करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यावर आहे. एक तर या त्यांनी हजर झाले पाहिजे अन्यथा प्रोसिजरप्रमाणे त्यांची संपूर्ण मालमत्ता जप्त केली जाईल.

------

४.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील मिरारोड पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक यांना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने लाच स्वीकारताना पकडल्याबाबत**

**(१३) * ३७७७६ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री.राजन तेली , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील मिरारोड पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक यांना दिनांक ६ जानेवारी, २००८ रोजी वा त्यादरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने लाच स्वीकारताना पकडण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर पोलीस उपनिरीक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) ठाणे जिल्ह्यातील मिरारोड पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक श्री. शफी रहिमुद्दीन शेख यांना दिनांक ५ जानेवारी, २००८ रोजी पन्नास हजार रूपयांची लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून रंगेहात पकडण्यात आले, हे खरे आहे.
(२),(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी श्री. शफी रहिमुद्दीन शेख, पोलीस उपनिरीक्षक यांनी या प्रकरणातील तक्रारदार श्री. अदिल खान यांना त्यांच्या विरूध्द दाखल गुन्ह्यात तात्काळ अटक न करण्यासाठी श्री. दिगंबर बाबुराव शेटे, पोलीस नाईक यांचे मार्फत पन्नास हजार रूपयांची लाचेची मागणी केल्याप्रकरणी दिनांक ५ जानेवारी, २००८ रोजी आयोजित लाचेच्या सापळा कारवाईत श्री. शेख यांनी पन्नास हजार रूपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यासंदर्भात मिरा रोड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३/०८ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७,१२,१३ (१) (ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्ह्यात श्री. शेख यांना दिनांक ६ जानेवारी, २००८ रोजी व श्री. दिगंबर शेटे यांना दिनांक ९ जानेवारी, २००८ रोजी अटक करण्यात आली. श्री. शफी शेख यांना दिनांक ६ जानेवारी, २००८ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : दिनांक ६ जानेवारी, २००८ रोजी श्री.शेख यांना आणि श्री.दिगंबर शेटे यांना ९ जानेवारी, २००८ रोजी अटक करण्यात आली होती. श्री.शेख यांना ६.१.२००८ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. या दोन आरोपींपैकी श्री.शेटे यांना निलंबित केलेले नाही, त्यांना निलंबित न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : या दोघांना अटक करण्यात आली असून दोघांनाही निलंबित करण्यात आलेले आहे.

-------

नंतर श्री.शिगम



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील सुमारे चार हजार गावांमध्ये राज्याच्या स्थापनेपासून आतापर्यंत रस्तेच बांधण्यात आले नसल्याचे राज्य नियोजन मंडळाच्या बैठकीत निदर्शनास आल्याबाबत**

**(१४) * ४०७८४ डॉ. वसंत पवार , श्री.अरुण गुजराथी , श्री.भास्कर जाधव , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. किसनचंद तनवाणी , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अद्याप चार हजार गावांना राज्याच्या स्थापनेपासुन अद्यापपर्यंत रस्तेच बांधलेले नसल्याचे राज्य नियोजन मंडळाच्या दिनांक १४ डिसेंबर, २००७ रोजी झालेल्या बैठकीत निदर्शनास आले तसेच राज्यातील दोन हजार गावांना अद्यापपर्यंत रस्ते बांधण्यासाठी शासनाने निधीची पूर्तता केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्लक्षित रस्त्यांचे बांधकाम येत्या दोन वर्षात पूर्ण करण्याच्या सूचना राज्य नियोजन मंडळाचे कार्याध्यक्ष यांनी उपरोक्त बैठकीत दिल्या, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) तसेच, सदर गावांना त्वरीत निधी उपलब्ध करुन रस्ते त्वरीत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रविशेठ पाटील, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) महाराष्ट्र राज्यातील एकूण ४०४१२ गावांपैकी ३१ मार्च २००७ अखेर ३८७८४ (९५.९७%) गावे बारमाही रस्त्याने जोडण्यात आली असून १२०३ (२.९८%) गावे आठमाही रस्त्याने जोडली आहेत. केवळ ४२५ (१.०५%) गावे अद्याप रस्त्याने जोडणे शिल्लक आहे.

(२) मा. कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ यांनी प्रतिवर्षी प्लॅन तयार करताना गांवे जोडण्यावर भर देणे आवश्यक असून यापुढे ज्या गावात रस्ते नाहीत, ती सर्व गांवे रस्त्यांनी १०० टक्के जोडली जातील. यावर प्रथम भर देण्यात यावा व नंतरच रस्त्यांच्या सुधारणेवर खर्च करण्यात यावा आणि सदर बाब लक्षात घेऊनच निधीची तरतूद करण्यात यावी असे सूचित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) राज्यातील सर्व गावे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने प्राथम्यक्रमनिहाय कार्यक्रम निश्चित केला असून निधी उपलब्धतेनुसार सर्व गावे बारमाही रस्त्याने जोडण्याची कार्यवाही टप्प्याटप्प्याने सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भास्कर जाधव : कमिटीच्या अहवालाप्रमाणे 4000 गावांना बारमाही रस्त्याची सोय नाही. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की "524 गावे बारमाही रस्त्याने जोडलेली नाहीत. निधी उपलब्धतेनुसार सर्व गावे बारमाही रस्त्याने जोडण्याची कार्यवाही टप्प्याटप्प्याने सुरु आहे." ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.खंदारे 14:10

सर्व गावे बारमाही रस्त्याने किती कालावधीत जोडली जातील आणि त्यासाठी शासनाने किती रकमेचा अंदाजित प्लॅन तयार केलेला आहे ?

श्री. छगन भुजबळ : या कामांमध्ये वन खात्याची जमीन येत असल्यामुळे 425 गावे बारमाही रस्त्याने जोडली गेलेली नाहीत. तसेच काही ठिकाणी नक्षलवादी कारवाया अतिशय तीव्र स्वरुपाच्या आहेत. अशा दोन-तीन कारणामुळे ही कामे होऊ शकली नाहीत.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी नक्षलवादी कारवायांचा उल्लेख केला. तेव्हा ही कामे कोणत्या भागातील आहेत ?

श्री. छगन भुजबळ : त्याबाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. मी ती पटलावर ठेवीन. 4000 हजार गावे रस्त्याने जोडली गेलेली नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते चुकीचे आहे. सगळया गावातील रस्त्यांची माहिती माझ्याकडे आहे. सन्माननीय सदस्यांना ती माहिती पाहिजे असेल तर ती मी पटलावर ठेवीन. सभापती महोदय, रस्त्यांच्या बाबतीत अतिशय चांगले काम झालेले आहे. वन जमिनीमधून जे जे रस्ते जात आहेत त्या रस्त्यांची कामे झालेली नाहीत. हा वन जमिनीचा प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. बाकीचे सर्व रस्ते बारमाही करण्याच्यादृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत. लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन त्यासंदर्भातील कारवाई केली जाईल.

डॉ. दीपक सावंत : कोकणातील किती गावे बारमाही रस्त्याने जोडली गेलेली नाहीत. तसेच या रस्त्यासाठी 2008-09च्या अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद करण्यात आलेली आहे ?

श्री. छगन भुजबळ : कोकणातील बृहन्मुंबईत शून्य, ठाणे 23, रायगड 20, रत्नागिरी 16 आणि सिंधुदुर्ग 5, अशी कोकण विभागातील गावे आहेत. ही कामे न होण्याच्यामागचे मुख्य कारण वन जमीन हे आहे. निधीची उपलब्धता हे त्या मागचे कारण नाही.

श्री. जगदीश गुप्ता : आदिवासींची लोकसंख्या जेथे मोठ्या प्रमाणात असते तो वनक्षेत्राचा भाग असतो. पावसाळयामध्ये या आदिवासी गावांचा संपर्क तुटत असल्यामुळे आणि पावसाळयामध्ये कुपोषणाचा प्रश्न गंभीर होत असल्यामुळे आदिवासींची मुले दगावतात. म्हणून एक विशेष बाब म्हणून आदिवासी भागातील गावे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी वन जमिनीची अडचण राहून नये यासाठी शासन केन्द्रस्तरावर पाठपुरावा करणार आहे काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ : मी मघाशी सांगितले की, हे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. तसेच रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी व अन्य कामासांठी 123.75 कोटीची तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे.

---

...3..

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**संजय गांधी निराधार योजनेचे वेतन मिळत नसल्याने राज्यातील लाखो निराधांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत**

**(१५) * ३७४५५ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री.सय्यद जामा , श्री.राजन तेली :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी निराधार योजनेचे वेतन गेल्या सहा महिन्यापासून मिळत नसल्याने राज्यातील लाखो निराधारांवर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २००७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वेतन तातडीने देऊन निराधारांची उपासमार थांबवावी या मागणीसाठी चंद्रपूर येथील श्रमिक एल्गारच्या अध्यक्षा ॲड.पारोमिता गोस्वामी यांच्या नेतृत्वाखाली शेकडो निराधार महिलांनी दिनांक १५ जानेवारी, २००८ वा त्यासुमारास चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे लाक्षणिक उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(३) उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या काय आहेत,

(४) असल्यास, सहा महिने निराधारांना वेतन न देण्याचे कारण काय आहे,

(५) तातडीने निराधारांना वेतन देण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आर.आर.पाटील** : (१) नाही. संजय गांधी निराधार योजनांच्या अनुदानाचे एप्रिल, २००७ पासून जानेवारी, २००८ पर्यंतच्या कालावधीचे वितरण केल्याचे सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांनी कळविले आहे.

(२) नाही. तथापि, दिनांक १७.१.२००८ रोजी श्रमिक एल्गारच्या अध्यक्षा यांनी मोर्चासह मागण्यांकरिता जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना निवेदन दिले होते.

(३) निवेदनातील मागण्या पुढीलप्रमाणे:-

१) निराधारांचे अनुदान नियमित देण्याबाबत.

२) निराधारांच्या जी.आर.ची अंमलबजावणी करण्याबाबत.

३) शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या महिलांना दरमहा मोबदला देण्याबाबत.

४) सर्व घरकुलांना तातडीने वीज पुरवठा करण्याबाबत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये जानेवारी, २००८ अखेरपर्यंत अनुदान वितरण करण्यात आले असून फेब्रुवारी, २००८ व मार्च, २००८ चे अनुदान वितरणाची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. गोविंदराव आदिक : संजय गांधी निराधार योजना ही राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाची, महत्वाकांक्षी आणि ख-या अर्थाने निराधारांना आधार देणारी योजना आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:15

ता.प्र.क्र. 37455.... श्री. गोविंदराव आदिक...

आणि म्हणूनच या योजनेच्या बाबतीत सर्वांनी सतर्क राहणे अतिशय आवश्यक आहे. म्हणूनच हा प्रश्न विचारण्यात आला होता. या ठिकाणी विभागाकडून उत्तर देण्यात आले आहे की, जानेवारी, 2008 पर्यंत संपूर्ण अनुदान देण्यात आले आहे. फेब्रुवारी आणि मार्च महिन्यातील अनुदान वितरीत करण्याचे काम चालू आहे. ही वस्तुस्थिती खरी आहे गृहीत धरुन मी शासनाचे अभिनंदन करतो. शासनाने अतिशय तातडीने पाऊले उचलून निराधारांना अनुदान वितरीत केले आहे. ही योजना अतिशय महत्वाची आहे. आजच्या प्रश्नातील तक्रार जरी दूर झाली असली तरी देखील निराधार योजनेचे अनुदान निराधारांना वेळेवर पोहोचत नाही. ते अनुदान देण्यामध्ये असंख्य अडचणी निर्माण केल्या जातात. निराधारांना त्या मदतींपासून वंचीत ठेवले जाते. अशा प्रकारच्या तक्रारी सातत्याने होत आलेल्या आहेत. ही गोष्ट लक्षात घेता, शासनाने 2008 पर्यंतचे अनुदान वेळेवर दिले असले तरी व अभिनंदनास पात्र असले तरी भविष्यात या योजनेने अनुदान देण्याच्या संदर्भात त्रुटी राहणार नाहीत, अनुदान वितरीत करण्यात विलंब होणार नाही, या योजनेच्या अनुदान वाटपास प्राधान्यक्रम देणे आवश्यक असल्यामुळे, अशा योजनेस शासन अग्रक्रम देईल काय ?

श्री. आर.आर.पाटील :सन्माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक यांनी सभागृहात अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. महाराष्ट्रातील गरीब जनतेसाठी ही एक महत्वपूर्ण योजना आहे. एक गोष्ट प्रांजळपणे कबूल केली पाहिजे की, महसूल विभागाकडे हे काम दिले आहे. परंतु महसूल विभागार अनेक कामांच्या प्राधान्यक्रमात या योजनेचे काम मागे पडते. त्याचा परिणाम म्हणून अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे या योजनेच्या अनुषंगाने वेळेवर बैठका न होणे, वेळेवर चौकश्या न होणे, या योजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभ न मिळणे, यासंदर्भात विधानसभा सभागृहात सविस्तर चर्चा झाली. या चर्चेच्या वेळी माननीय विधानसभा अध्यक्षांनी निदेश दिले आहेत की, या योजनेच्या बाबतीतील आमदारांचे म्हणणे ऐकून घ्यावे व त्यांचे समवेत व संबंधित अधिका-यांबरोबर बैठका घ्याव्यात. त्याप्रमाणे तीन विभागातील आमदार, आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्या समवेत बैठका घेतल्या आहेत. उर्वरित विभागातील आमदारांसमवेत बैठका अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येतील. या बैठकींना विभागीय आयुक्त, संबंधित अधिकारी, त्या विभागातील सर्व आमदार बोलाविण्यात येते आणि एकत्रितपणे या योजनेचा आढावा घेत आहे. तीन विभागातील बैठकीमध्ये माझ्या असे निदर्शनास आले की, काही ठिकाणी यासंदर्भातील कमिटया देखील झालेल्या नाहीत. काही

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37455..... श्री.आर.आर.पाटील...

ठिकाणी कमिटया झाल्या आहेत, परंतु त्यांच्या बैठका होत नाहीत. या सगळया त्रुटी शासनाकडून लवकरात लवकर दूर केल्या जातील. ज्या ठिकाणी कमिटया झाल्या नाहीत, त्या ठिकाणी नव्याने कमिटया निर्माण करण्यात येतील, काही ठिकाणी कमिटया निर्माण झाल्या आहेत, परंतु तेथे बैठका झाल्या नाहीत तेथे संबंधित आमदारांनी वेळ दिली नाही, व यासंदर्भात बैठक घेतली नाही तर त्या विभागाचे प्रांत हे बैठक घेतील. कोणतीही निराधार व्यक्ती लाभापासून वंचीत राहू नयेत यासंबंधी शासनाने जी.आर.काढलेले आहेत. शासनाने या योजनेच्या बाबतीत निर्णय देखील घेतलेला आहे.
या ठिकाणी प्रश्न विचारला गेला आहे की, या योजनेचे अनुदान वेळेवर दिली नाहीत. याबाबतीत सांगू इच्छितो की, काही विभागात या योजनेचे अनुदान वेळेवर दिले गेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याचे प्रमुख कारण असे आहे की, जिल्हयाच्या ठिकाणी पेमेंटची सिस्टीम बी.डी.एस. पध्दतीने केलेली आहे. जिल्हयाच्या ठिकाणी संगणकाच्या माध्यमातून अनुदान उपलब्ध करुन देण्याची भूमिका राज्य शासनाने स्वीकारली आहे. या पध्दतीत काही तांत्रिक अडचणीमुळे दरम्यानच्या काळात अनुदान जिल्हयाच्या ठिकाणी उपलब्ध झाले नव्हते. आता ती त्रुटी दूर झाली आहे. त्यामुळे आता अनुदान प्राप्त होण्यास विलंब लागणार नाही. विधानसभा सभागृहामध्ये यासंबंधीची मागणी झाली आहे की, सगळयांना वेतन आयोग लागू केला जातो आणि त्यांना न्याय दिला जातो. परंतु या गरीब माणसाला फक्त 250 रुपये दिले जात आहेत. जर या कुटुंबात दोन लाभार्थी असतील तर त्यास 500 रुपये, तीन लाभार्थी असतील 625 रुपये अशा पध्दतीने सध्या अनुदाने दिली जात आहेत. या अनुदानात वाढ करण्याची करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. मी बैठका घेतल्या त्यात देखील आमदारांनी मागणी केली आहे. या सदनाच्या माध्यमातून या राज्यातील निराधार व्यक्तींना सांगू इच्छितो की, राज्य सरकार लवकरच या अनुदानात भरीव वाढ करण्याचा निश्चितपणाने निर्णय घेईल. तसेच या निराधार लोकांना सदरहू अनुदान वेळेवर मिळतील यादृष्टीने देखील निश्चितपणे काळजी घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा या संदर्भात स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत औरंगाबाद, मुंबई खंडपीठापुढे जनहित याचिका दाखल झाली होती. या योजनेत तीन कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे ही गोष्ट कोर्टाने मान्य केली आहे.

3...



ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37455....        श्री. दिवाकर रावते....

याबाबतीत संबंधित अधिकारी आणि संबंधित मंत्री महोदयांवर आरोपपत्र दाखल केले गेले आहे आणि शासनाला कोर्टाने निर्देश दिले आहेत की, संबंधित दोषी व्यक्तीं विरुध्द गुन्हा दाखल करावा. यासंदर्भात शासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे ?

यानंतर श्री. कानडे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KTG/ SBT/ 14:20

ता.प्र.क्र. 37455 पुढे सुरु......

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एखाद्या स्पेसिफिक घटनेची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. भ्रष्टाचाराच्या संदर्भात ज्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे त्यांच्यावर ती निश्चितपणे करण्यात येईल.

श्री. गोविंदराव आदिक : सभापती महोदय, शासनाचे अभिनंदन करताना पुन्हा एकदा मला प्रश्न विचारावयाचा आहे की, आताच उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे समितीच्या बैठका वेळेवर होत नाहीत असे त्यांच्या निदर्शनास आलेले आहे. तालुका पातळीवरील या समित्यांचे अध्यक्ष आमदार आहेत. किती आणि कोणत्या आमदारांनी बैठका घेतल्या नाहीत यासंबंधीची माहिती शासन सदनाच्या पटलावर ठेवील काय ? त्याचप्रमाणे श्रमिक एल्गार संघटनेने आंदोलन करुन निवेदन दिलेले आहे. तक्रार नसतील तर उपोषण किंवा आंदोलन केले नसते. या संघटनेने दिलेल्या निवेदनाप्रमाणे त्यासंबंधी चौकशी होऊन कारवाई झाली आहे काय आणि झाली नसल्यास ती निश्चितपणाने केव्हा होणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, संघटनेने आंदोलन केले नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन दिले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्याबरोबर चर्चा केली. त्यानंतर आंदोलन केले नाही फक्त निवेदन दिले. निवेदनाप्रमाणे ज्या त्रुटी होत्या त्या दूर करुन अनुदान मिळाले नव्हते त्यांना अनुदान देण्यात आलेले आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला. आज एकूण 15 प्रश्नांवर चर्चा झाली. अलिकडच्या काळातील हा एक विक्रम समजावा लागेल.

------

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव.

**मु.शी.**: श्री. बाबुराव बागूल ज्येष्ठ साहित्यिक यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

श्री. छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, बाबुराव बागूल, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

" श्री. बाबुराव बागूल, ज्येष्ठ साहित्यिक यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, ज्येष्ठ साहित्यिक, दलित साहित्याचे प्रणेते, ख्यातनाम कथाकार, विद्रोही कवी, पुरोगामी विचारवंत कै.बाबुराव रामजी बागूल यांचा जन्म नाशिक जिल्ह्यात विहितगाव येथे दिनांक १७ जुलै १९३१ रोजी झाला. त्यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले होते.

कै.बागूल यांनी काही काळ रेल्वेत नोकरी केली होती. ग्रामीण भागातील अस्पृश्यतेचे दाहक चटके आणि मुंबईच्या झोपडपट्टीतील जीवनाचा विदारक अनुभव घेतलेल्या बाबुरावांना लहानपणापासूनच लिखाणाची आवड होती. कथा, कांदबरी व कविता यात विलक्षण रस असलेल्या या साहित्यकारास सरस्वतीचे वरदान लाभले होते. महात्मा ज्योतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मॅक्झिम गॉर्की, प्रेमचंद या प्रतिभावंत व्यक्तींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या साहित्य निर्मितीला प्रेरक ठरला. "युगांतर'', "नवयुग'' व "अस्मितादर्श'' या नियतकालिकातून त्यांच्या अनेक कथा, कादंबऱ्या प्रसिध्द झाल्या आहेत.

कै.बागूल यांच्या "जेंव्हा मी जात चोरली होती'' व "मरण स्वस्त होत आहे'' या कथा संग्रहातून व "सूड'' या कांदबरीतील साहित्यकृतितून त्यांच्या लेखणीचे सामर्थ्य दिसून येते. सामाजिक विषमतेचे बळी ठरलेली, दु:ख व दारिद्र्याने ग्रासलेली, आणि अन्यायाने असहाय्य झ ालेली उपेक्षित जनता व शोषित स्त्री हे त्यांच्या कथांचे केंद्र बिंदू होते.

कै.बागूल यांच्या साहित्यातून सामाजिक वास्तवतेचे दर्शन घडते. अस्सल अनुभव, दिनदलितांविषयी वाटणारे आपलेपण, विद्रोहाची खंबीर भूमिका, आाणि सुसंगत अशी रांगडी भाषा हे त्यांच्या साहित्यकृतिचे वेगळेपण होते. "कोंडी'', "पावशा'', "पाषाण'', "सरदार'', "भूमिहीन'', "मूकनायक'', "गुंड', "विद्रोह'', "प्रेसुक'', "अघोरी'' "भूक'', "मृत्यू'', "संघर्ष'', "लुटालूट''

........३

श्री. छगन भुजबळ.....

इत्यादी कथा वाचकांच्या दिर्घकाळ स्मरणात राहणाऱ्या आहेत. त्यांच्या अनेक कथांचे गुजराती, हिंदी व इंग्रजी भाषेतून अनुवादही झाले आहेत. दलितांच्या वाङ:मयीन चळवळींना त्यांनी व्यापक मानवतावादी पायावर उभे केले आहे. ज्ञान, विज्ञान आणि लोकशाही समाजवाद यांचे ते निष्ठावंत पुरस्कर्ते होते. सामाजिक व वैचारिक बांधिलकीची जाणीव ठेवून लिहिणारे विद्रोही साहित्यिक होते. काव्यात्मकता व भेदक कल्पनाशक्ति यांची देणगी त्यांना लाभली होती. दलित साहित्याला सामाजिक वास्तव आणि विद्रोही जाणिवेचे नवपरिमाण त्यांच्या लिखाणामुळे प्राप्त झाले होते. या विद्रोहाने मानवी मूल्यांचे तत्वज्ञान आत्मसात करत विश्वमानवाच्या विशाल परिघात स्वअस्तित्वाची एक वेगळी नोंद त्यांनी केली आहे. दलित साहित्याला प्राप्त झालेले हे नवजाणिवेचे संदर्भ बागूलांच्या व्यक्तिगत जीवनात तसेच त्यांच्या सामाजिक जीवनातही दिसून येतात.

कै.बागूल यांनी साहित्य क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल दलित साहित्य चळवळीने त्यांना सन्मानित केले होते. नाशिकच्या युगांतर प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठीत समजला जाणारा "युगांतर'' पुरस्कार, राज्य साहित्य अकादमी, पुणे विद्यापीठ, नाशिक महानगरपालिका, सांगली सांस्कृतिक प्रतिष्ठान या सारख्या अनेक सामाजिक संस्थांनी पुरस्कार देवून त्यांचा गौरव केला होता. सन १९७२ मध्ये महाड, १९७६ मध्ये नागपूर व १९९६ मध्ये वाळवा येथील दलित, कामगार, आदिवासी व ग्रामीण साहित्य संम्मेलनांचे अध्यक्षस्थानही त्यांनी भूषविले होते. मराठी साहित्यात आपल्या कर्तृत्वाने स्वत:चे एक आगळे-वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या क्रांतिकारी दलित साहित्यिकाचे, पुरोगामी विचारवंताचे, अलौकिक प्रतिभेचे सामर्थ्य लाभलेल्या सरस्वतीच्या उपासकाचे बुधवार दिनांक २६ मार्च २००८ रोजी दु:खद निधन झाले.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ........

सभापती महोदय, बाबुराव बागूल हे दोन महिन्याहून अधिक काळ रुग्णालयात होते. त्यांना वाचविण्यासाठी डॉक्टरांच्या माध्यमातून प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात आली होती. संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही त्यांच्या कथा, कवितांचे भाषांतर झालेले आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल अतिशय मानसन्मान, आदर होता. 'वेदा आधि तू होतास' ही त्यांची कविता अतिशय क्रांतिकारी होती. त्यांना दलित साहित्याच्या संदर्भात अधिक ओळखले जात असले तरी दलित साहित्य हे दलित साहित्य म्हणून ओळखले जाण्याच्या अगोदरपासून त्यांनी लिखाण सुरु केले होते. 'वेदा आधि तू होतास', ही बाब केवळ महाराष्ट्रात नव्हे, देशात नव्हे तर जगातील प्रत्येक मानवाच्या संदर्भात माणसांना त्यांनी आवाहन केले होते. सूर्याला सूर्य व चंद्राला चंद्र हे नाव तूच ठेवले आहेस. वेद निर्माण झाले त्याच्या पूर्वीपासून तू आहेस. जगाला सुंदर करण्याचे काम मानवा तू केले आहेस. म्हणून मानवा, तू सुध्दा अगदी श्रेष्ठ आहेस. त्याच मानवाला त्यांनी सांगितले, अनेक प्रेषितांचे वाढदिवस तू साजरे केलेस. याचा अर्थ अनेक धर्म, अनेक धर्मगुरु, अनेक धर्म संस्थापक सुध्दा तुझ्यामुळे निर्माण झाले. हे सर्व थोडक्या शब्दात आणि संपूर्ण मानव जातीला आवाहन करणारी, ख-या अस्तित्वाची त्यांना जाणीव करुन देण्याची शक्ती बाबुराव बागूल यांच्या लिखाणामध्ये होती. त्यांच्या अंत्ययात्रेच्या वेळी सुध्दा तेथे जमलेल्या अनेक थोर लोकांनी, काही समाजसेवकांनी बाबुराव बागूल यांच्याविषयी आपले विचार मांडले. खरे म्हणजे नाशिकमध्ये अलिकडच्या काळात वामनराव कर्डक व बाबुराव बागूल हे फार मोठे शाहिर व साहित्यिक निधन पावले. या दोघांच्या वाङ्मयाच्या बाबतीत अभ्यास करण्यासाठी, प्रचार व प्रसार करण्यासाठी एखादे प्रतिष्ठान निर्माण केले जावे, एखादी संस्था निर्माण केली जावी, तेथून त्यांच्या या साहित्याचा अभ्यास केला जावा अशी मागणी करण्यात आली. शासनाच्या वतीने आम्ही सांगितले की, नाशिकमध्ये निश्चितपणे शासन याबाबतीत पावले उचलल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, मी पुन्हा एकदा शासनाच्या वतीने बाबुराव बागूल यांच्या मृतात्म्यास शांती लाभो अशा प्रकारची श्रध्दांजली अर्पण करतो.

---------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : महोदय, माननीय ज्येष्ठ मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी ज्येष्ठ साहित्यिक कै. बाबूराव बागूल यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

बाबूराव बागूल यांच्यासंबंधी जेवढी माहिती द्यावी तेवढी थोडीच आहे. एक ज्येष्ठ साहित्यिक, ज्येष्ठ कथाकार, विद्रोही कवी, विचारवंत म्हणून बाबूराव बागूल ओळखले जात होते. अवघे मॅट्रिकपर्यंत शिक्षण घेऊन त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर ही साहित्याची चळवळ चालविली. आपल्या साहित्यातून, आपल्या लेखणीतून, आपल्या कादंबऱ्यांतून आणि कथांमधून खऱ्या अर्थाने दलितांसाठी आणि समाजाच्या वास्तवाचे दर्शन ज्यांनी घडविले, असा एक महान साहित्यकार, त्यांचे निधन झाल्यामुळे मराठी साहित्यातील एक तारा निखळला असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित व पिडीतांच्या भाव-भावनांचे जिवंत चित्रण त्यांच्या साहित्यात आहे. हे साहित्य इंग्रजीत बनविले असते तर त्याला कदाचित "नोबेल पारितोषिक" सुध्दा मिळाले असते. त्यांचे लेखन उच्च व जागतिक दर्जाचे होते. सन 1960 च्या दशकात मराठी साहित्यात दलित साहित्याचा प्रवास सुरु झाला. त्याच्या जडणघडणीत बाबूरावांची भूमिका अत्यंत मोलाची होती. त्यांच्या साहित्यावर समाजसेवकांचा प्रभाव होता. त्यांच्या कथा व कादंबऱ्या आणि वैचारिक चित्रण हे वरच्या दर्जाचे होते. आताच त्यांच्या बाबतीत उल्लेख झाला की, "जेव्हा मी जात चोरली होती", "मरण स्वस्त होत आहे" ह्या त्यांच्या कथा खऱ्या अर्थाने त्यांच्या यशाचे मापदंड आहेत. महाराष्ट्राची भूमी ही संतांची भूमी आहे. तसे दलित साहित्यामध्ये सुध्दा अनेक विचारवंत या महाराष्ट्राच्या भूमीत निर्माण झालेले आहेत. अण्णाभाऊ साठेंसारखा एक काहीही न शिकलेला माणूस, ज्या माणसाने आपल्या शाहिरीतून संपूर्ण महाराष्ट्राला जागवून खऱ्या अर्थाने अस्पृश्यतेचा प्रश्न पुढे आणला, त्याच पध्दतीने बाबूराव बागूल यांचे कार्य सुध्दा महान आहे. मी माझ्या आणि माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना आदरांजली अर्पण करतो आणि त्यांच्या आत्म्याला शांती मिळो, अशी प्रार्थना करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

.....2

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, शासनाच्या वतीने सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांनी श्री बाबूराव बागूल यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

ज्याला आपण म्हणतो वैचारिक द्वंद्व, महाराष्ट्रामध्ये अनेक वर्षांपासून संपूर्ण परिवर्तनाची चळवळ मी पाहत आहे. त्यामध्ये नक्की सामान्य माणसाला न्याय कोणत्या विचारांनी मिळू शकतो, वर्ग लढा महत्वाचा की वर्ण लढा याबद्दल अनेक वेगवेगळे वादंग झाले आणि त्याचे प्रतिबिंब वारंवार महाराष्ट्राच्या साहित्यामध्ये, राजकारणात व समाजात पडलेले आहे. अशा वेळी वर्ग लढा आणि वर्ण लढा हे दोन्ही प्रश्न महत्वाचे असले तरी येथे भारताच्या भूमीमध्ये त्याचे जे स्वरुप आहे, त्याचा जो आविष्कार आहे तो जातीय विद्रोहाच्या रुपाने व्यक्त होत असतो, याबद्दल धाडसी, बंडखोर आणि ज्यामध्ये संपूर्ण शांतता असते अशा सर्व बाबतीत एक वेगळया प्रकारची भूमिका घेऊन एक मोठी पिढी उभी राहिली. ज्यांनी चौकटबध्द विचारांना बाजूला ठेवून एक वेगळी भूमिका घेतली. त्यापैकी श्री. बागूल एक होते. कोणालाच ते स्वत:चे वाटले नसतील, कारण कम्युनिस्टांना वाटले नसेल की हे कम्युनिस्ट आहेत आणि इतरांना सुध्दा ते आपले वाटले नसतील. पण त्यांनी स्वत:चा मार्ग तयार केला आणि स्वत:चाच मार्ग राजकारणात जसा उभा केला जातो तसा साहित्यामध्ये विशेषत: महाराष्ट्रातल्या साहित्यामध्ये उभा केला. अनेक वेगवेगळया विचारधारा, त्याचे प्रभूत्वकार असताना बाबूराव बागूल सारख्या अनेक दलित साहित्यिकांनी जो मार्ग महाराष्ट्रातील आणि भारतातील दलित साहित्यिकांसाठी तयार केला, त्या पायवाटेवरुन अनेक दलित साहित्यिकांनी कोंडी फोडली आणि त्यामधून एक चांगल्या प्रकारचे सकस साहित्य जन्माला आले. येथे बोलत असतांना मला आवर्जुन उल्लेख करावयाचा वाटतो की, बाबूराव बागूल यांच्या बाबतीत बोलत असताना शोषित जनता आणि उपेक्षित स्त्री, या कथानकांमुळे एका कथाकाराचे जीवन ज्यावेळी समोर येते तो मुद्दा सलगपणे येतो परंतु तोच वेगवेगळया जातीमध्ये, धर्मामध्ये वेगवेगळया वेळी जेव्हा मतभेद होतात तेव्हा त्याचा आविष्कार वेगवेगळया प्रकारे होत असतो म्हणून हे स्वाभाविकच आहे की, त्यांच्या सगळ्या साहित्यामध्ये, त्यांच्या बोलीतून, सातत्याने तळमळ व्यक्त होत होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्जनशील रुप घेऊन आपल्या साहित्यामध्ये मांडण्यासाठी त्यांचा जीवनसंघर्ष सातत्याने चालला होता. मघाशी कोणीतरी येथे उल्लेख केला की,

. .....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे......

त्यांचे साहित्य इंग्रजीत झाले असते तर बरे झाले असते. परंतु अर्जुन डांगळे सारख्या साहित्यिकाने काही महत्वाच्या
साहित्यिकांचे वाङमय इंग्रजीतून केले आहे आणि त्याची दखल संपूर्ण जग तसेच हिंदुस्थानात घेण्यात आली आहे.

(यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ..

कै.बाबुराव बागुल यांच्या साहित्यिक कार्याची कर्मभूमी नाशिक आहे. तसेच संपूर्ण राज्यामध्ये नाशिकचे एक वेगळे स्थान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक येथील काळाराम मंदिरामध्ये प्रवेश मिळण्यासबंधी जो सत्याग्रह केला होता त्यावेळी वेगवेगळया प्रकारे वितंडवाद झाल्यानंतर सुध्दा आम्हाला माणुसकीचा राम पाहिजे असे शब्द दलित सामान्य लोकांच्या तोंडातून बाहेर आले होते. कै.बाबुराव बागूल यांच्या संपूर्ण साहित्याच्या वाटचालीमध्ये अमुक एका गोष्टीच्या पलीकडे जाऊन व्यापक अशा विश्वबंधुत्वाची जाणीव देखील त्यांच्या साहित्यामधून वेळोवेळी होत असावयाची.

सभापती महोदय, कै.बाबुराव बागुल यांच्या शोक प्रस्तावावर बोलत असतांना माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्याकडून असे सांगण्यात आले की, त्यांच्या नावाचे एखादे प्रतिष्ठान तयार करावे असे वाटते. याबाबतीत मी सांगू इच्छिते की, ज्या वेळी कै. बाबुराव बागूल यांच्यासारख्या महत्वाच्या व्यक्ती आपल्यातून निघून जातात त्यावेळी त्यांच्या नावाने एखादे प्रतिष्ठान सुरु करण्यात यावे असा नेहमीच असा उल्लेख केला जातो . डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याच्या संदर्भात शासनाचे केलेले कार्य तसेच महात्मा फुले यांच्या नावाने उभ्या केलेल्या प्रतिष्ठानामध्ये काम करणाऱ्या सदस्यांची व तेथे काम करणा-या स्टाफची सातत्याने होणारी आर्थिक कोंडी याचा जर शासनाने विचार केला तर अशा प्रकारची प्रतिष्ठाने तयार करीत असतांना कै. बाबुराव बागूल यांच्या विचारांचा खरोखर सन्मान करावयाचा असेल आणि त्यांच्या साहित्यांचा वारसा पुढे न्यावयाचा असेल तर तरुण पिढीला या साहित्याची ओळख चांगल्या प्रकारे होऊ शकेल अशा वेगळया प्रकारचे काम आपण करु शकतो काय याचा देखील विचार केला गेला पाहिजे. कै.बाबुराव बागूल यांनी लिहिलेले सर्वच साहित्य माझ्या वाचनात आलेले आहे. "मी जेव्हा जात चोरली होती" आणि "मरण स्वस्त आहे" या दोन पुस्तकांचा उपयोग कार्यकर्त्याच्या प्रशिक्षणासाठी ब-याचवेळा लोकांना झालेला आहे. गावगाडयामध्ये ज्यांना प्रतिष्ठा मिळत नाही अशा माणसांना मान खाली घालून जीवन जगावे लागते, त्या माणसाची कोंडी आणि त्या माणसाची अस्वस्थता , ज्यांना गावात प्रतिष्ठा मिळते त्यांच्या किती लक्षात येते हे मला माहीत नाही. कै. बाबुराव बागूल यांचे साहित्य राजकारणाचे जोडे बाजूला ठेवून वाचले तर ते जास्त चांगल्या प्रकारे आणि संवेदनशीलतेने त्यांच्या मनापर्यंत पोहोचेल असे मला वाटते.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

सभापती महोदय, माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी सातत्याने हे स्पष्ट केलेले आहे की, या ठिकाणी कोणतेही राजकारण मध्ये न आणता शिवशक्ती आणि भीमशक्ती यांचा विचार एकत्र आणण्याचा विचार आमचा सातत्याने सुरु आहे.शिवसेनेच्या वतीने कै. बाबूराव बागूल यांना मी श्रध्दाजंली व्यक्त करते आणि त्यांनी समाजामध्ये जातीच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न केला होता तेव्हा अशा प्रकारे समोजप्रबोधनाचे काम करण्याची सद्‌बुध्दी आम्हा सर्वांना मिळेल अशी प्रार्थना करुन मी त्यांना माझी श्रध्दांजली अर्पण करते . जय भीम. जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक): सभापती महोदय, ज्येष्ठ साहित्यिक कै. बाबुराव बागूल यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्याला पाठिंबा देण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, कै. आचार्य अत्रे यांच्या नवयूग मध्ये कै. बाबूराव बागूल यांची पहिली कथा जेव्हा प्रसिध्द झाली होती तेव्हा कै. बाबुराव बागूल यांनी शिरीष ताईना पत्र लिहिले होते त्या पत्राचा उल्लेख शिरीष ताईनी परवाच्या दिवशी आपल्या लेखामध्ये केला होता. त्या पत्रात त्यांनी असे म्हटले होते की, "जे स्वातंत्र्य मी अनभवू शकलो नाही ते स्वातंत्र्य माझी कथा आज अनुभवत आहे." हे वाक्य अत्यंत चटका लावणारे होते.तसेच या समाज व्यवस्थेचे नेमक्या शब्दात वर्णन करणारे होते. आजच्या शोक प्रस्तावाने हे स्वातंत्र्य आज अनुभवलेले नाही .हे शल्य माझ्या मनामध्ये आहे. दोन वेळा येथे मागणी केल्या नंतर तिस-या दिवशी हा शोक प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्यामुळे या शल्यासंबंधी मला येथे जाणीवपूर्वक उल्लेख करावासा वाटतो.

सभापती महोदय, कै. बाबूराव बागूल केवळ शाहू,फुले आंबेडकर वादी नव्हते. तर मार्क्सचे अधिष्ठानसुध्दा त्यांना होते. तसेच ती निष्ठा त्यांनी वादातीत ठेवली होती. त्यामुळे अनेकदा आंबेडकरवादीं प्रवाहाकडून त्याची उपेक्षासुध्दा झाली होती. केवळ मराठी सारस्वतांकडूनच नव्हे तर या गटाकडून सुध्दा त्यांची उपेक्षा झाली होती .अशा प्रकारे त्यांची उपेक्षा झाली म्हणून त्यांनी कधीही तडजोड केलेली नाही. तडजोड न करणाऱ्या साहित्यिकाच्या वाटयाला नेहमीच उपेक्षा आलेली आहे. कै. बाबूराव बागूल यांच्या वाटयाला देखील संपूर्ण आयुष्यभर उपेक्षा वाटयाला आलेली आहे. आज आपण त्यांचे स्मारक बांधणार आहोत. परंतु कै.बाबुराव बागूल हयात होते तेव्हा दारिद्रयाचे चटके ते सोसत होते. श्री.नरेंद्र जाधव यांनी त्यांच्या बाबतीत असा उल्लेख केला होता की," कै. बाबुराव बागूल यांचे साहित्य जर इंग्रजीतून प्रसिध्द झाले असते तर त्यांना नोबल पारितोषिक मिळाले असते. एवढा मोठा हा साहित्यिक होता परंतु कै. अण्णा भाऊ साठे यांना ज्याप्रमाणे आयुष्यात चटके सहन करावे लागले होते त्याप्रमाणे कै.बाबूराव बागूल यांना देखील आयुष्याच्या अखेरपर्यंत चटकेच सोसावे लागले होते. केवळ उपेक्षित वर्गाच्याच त्यांनी व्यथा वा वेदना मांडल्या आहेत असे नव्हे तर संपूर्ण मराठी साहित्यामध्ये विद्रोह उभा केला होता आणि विद्रोहाचा झेंडा खांद्यावर घेऊन ते सतत लढत राहिले होते. म्हणूनच मराठी साहित्याच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुख्य प्रवाहात कधीही त्यांना स्थान मिळाले नसेल, मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना मिळाले नसेल, महाराष्ट्र भूषण हे पद त्यांना कदाचित मिळाले नसेल परंतु त्याही पेक्षा मोठे असे त्यांचे स्थान होतें. एखाद्या व्यक्तीची कामगिरी फारशी नसली तरी ती व्यक्ती मोठया पदावर जाऊन बसते परंतु ज्यांनी मोठे काम निर्माण केलेले आहे त्यांची नेहमीच उपेक्षा होत आलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

ज्या माणसाच्या गौरव गीताचा माननीय मंत्री महोदयांनी उल्लेख केला .. 'वेदा आधी तू होतास ..' असे त्यांनी त्यात म्हटले आहे. 'देव दानवा नरे निर्मिले..' असे केशवसुतांनी म्हटले होते पण बाबूराव बागूल त्यापुढे गेले. त्यांनी म्हटले आहे की, 'वेदाआधी तू होतास..' म्हणजे वेद निर्माण करणाऱ्या परमेश्वराच्याही आधी तू होतास. माणसाचे इतके धाडसाने केलेले वर्णन जगाच्या पाठीवरील कोठल्याही भाषेमध्ये नाही, ते मराठीत आहे. म्हणूनच या कविचे मोठेपण हे केवळ मराठी भाषेच्या नाही, देशाच्याही सीमा ओलांडून गेलेले आहे. सभापती महोदय, या कविने आणखी काय सांगितले ? '... तू सूर्याला सूर्य म्हटलेस, म्हणून तो सूर्य झाला., तेच चंद्राला चंद्र म्हटलेस म्हणून चंद्र चंद्र झाला., अवघ्या विश्वाचे नामकरण तू केले आहेस आणि प्रत्येकाने हे मान्य केले आहे., हे प्रतिभावान माणसा, तूच आहेस सर्व काही, तुझ्यामुळे सजीव सुंदर झाली ही माही.' सभापती महोदय, माणसाचे गौरव गीत गाणाऱ्या या महाकविचे स्मारक आपण करू मागता आहात, त्याचे मी जरूर स्वागत करतो. पण माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्या प्रमाणे हे स्मारक केवळ चार भिंतींचे असू नये. केवळ धूळ खात पडणाऱ्या एखाद्या समाधीचे असू नये. जो विद्रोहाचा झेंडा घेऊन बाबूराव बागूल उभे होते. मराठी साहित्य समृद्ध करणारे जे जे प्रवाह आहेत त्या सर्व प्रवाहांना ताकद देणारी एखादी योजना जर बाबूराव बागूलांच्या स्मरणार्थ आपण सुरू करणार असाल तर ते अधिक औचित्यपूर्ण ठरेल. दलित साहित्य प्रवाह आहे, उपेक्षितांचे अनेक प्रवाह निर्माण झालेले आहेत. विविध समाज घटकांनी त्यांची त्यांचे साहित्य निर्माण केले आहे, त्यांची त्यांची सम्मेलने त्यांनी भरविली आहेत. मग त्यात दलित साहित्य सम्मेलन असेल, मुस्लिम मराठी साहित्य सम्मेलन असेल. मराठी भाषा समृद्ध करण्याचे काम जे जे प्रवाह करीत आहेत त्यांना मदत करण्याची भूमिका शासनाने बाबूराव बागूलांच्या नावाने एखादी योजना सुरू करून, बजेटमध्ये त्याची तरतूद करून ती नियमित करावी. आपण मुख्य मराठी साहित्य संमेलनास 25 लाख रूपये देतो, किमान तेवढीच रक्कम या इतर साहित्य प्रवाहांना वाटून देण्याची योजना जर आपण पुढे आणली तर ते अधिक उचित ठरेल ही सूचना करून, मी माननीय मंत्री श्री.भुजबळ यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्याचे मी समर्थन करतो, त्या संदर्भात सहवेदना व्यक्त करतो आणि श्रद्धांजली वाहून थांबतो.

***

..... यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, आदरणीय मंत्री श्री.भुजबळ साहेबांनी बाबूराव बागूलांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव येथे मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय,

येथे जन्माने अधिकार, जात ठरते जन्मेचि नीचोत्तम,

वज्राभेद्य समाजधोरण असे झाले कायम, ठेवू कृत्रिम भेद कायम,

कुणा अस्पृश्य मानू जरी, स्वातंत्र्यास अपात्र आपण ठरू घेऊनि शापाश्री

वर्णव्यवस्थेच्या वरवंट्याखाली भरडणारा जाणारा जो समाज आहे, ज्याला सोशल स्टेटस् नाही, ज्याला कुणी जवळ करीत नाही. ही अशी उपेक्षा, जीवघेणी, माणूसघाणी प्रवृत्ती ज्यांच्या वाट्याला आलेली होती अशा प्रकारच्या सर्व सामान्य माणसाचे सर्वमान्य दुखणे ज्या बाबूराव बागुलांनी खऱ्या अर्थाने सांगितले. मी जेव्हा प्री डिग्रीला होतो, मराठीचा अभ्यास करीत होतो तेव्हा मी त्यांची 'मी जात चोरली' ही कथा वाचली, अतिशय मन:पूर्वक वाचली. पहिल्या वाचनामध्ये माझ्या लक्षात आले की, या कथेची व्यापकता, या माणसाच्या अनुभवाची सार्वत्रिकता, जी माझ्याही वाट्याला आली असेल असे प्रत्येकाला जाणवावे इतके वैश्विक आणि व्यापक असे दुखणे त्यांनी स्वत:च्या या कथेतून सादर केले आहे. सभापती महोदय, सामाजिक आशयाच्या शेकडो कथा या मराठी साहित्यात लिहिल्या गेल्या आहेत. पण या सामाजिक आशयाच्या, जाणिवेच्या कथेची उंची अजून एकाही कथेने गाठलेली असेल असे मला वाटत नाही. इतकी ही जबरदस्त कथा आहे. एवढेच नव्हे तर श्री.गायधनी म्हणाले होते की, हा माणूस व्यक्ती आणि समष्टीपर्यंत कसा गेला ? हा माणूस केवळ कोणा एका संप्रदायापुरता, एका व्यक्तीपुरता मर्यादित नाही असेही या ठिकाणी सांगण्यात आले. जसे 'अणू रेणूया थोकडा, तुका आकाशा एवढा..' ही विचारसरणी देखील या माणसासाठी व्यापक का होत गेली ? किमान स्वत:च्या वाट्याला आलेले दळभद्री जीणे आपल्याही वाट्याला येऊ नये अशी देखील त्यांची अपेक्षा होती. कविवर्य नारायण सुर्वे एका ठिकाणी म्हणतात ..

' रोटी प्यारी की आणखी काही हवे आहे ?

याच साठी माझे जग राजमुद्रा घडवित आहे.

सभापती महोदय, या माणसाच्या साहित्याने अखिल मराठी वाङ्मयाला वैचारिकदृष्ट्या, वाङ्मयीनदृष्ट्या, कलात्मकदृष्ट्या किती समृद्ध केले असेल हे तुम्हा-आम्हाला नाकारता येत नाही.

...... यू 3 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणूनच या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांनी देखील सूचना केली की, केवळ लोकांविषयी शोकप्रस्ताव सादर करून आपल्याला आदरांजली व्यक्त करता येईल अशातील भाग नाही. परंतु मला या ठिकाणी नम्र विनंती करावयाची आहे. या संबंधात कुसुमाग्रज म्हणाले की,

" कोट्यवधी जगतात जीवाणू जगति अन् मरती, जशी ती गवताची पाती
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली, निर्मितो नवक्षितिज पुढती... "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

दलित साहित्याला खऱ्या अर्थाने दलित साहित्याच्या, किंवा उपेक्षित लोकांच्या साहित्याच्या गंगोत्रीचा महासागर करण्याचे काम कुणी केले असेल तर ते बागुलांनी केले आहे. यामध्ये केशव मेश्राम आहेत, दया पवार आहेत, तराळ अंतराळ लिहिणारे शंकरराव खरात आहेत, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे आहे, त्यानंतर उचल्या आहे, उपरा आहे, अशा विविध प्रकारच्या वाङमयांचा खऱ्या अर्थाने प्रचंड असा विस्तार आणि विकास आणि त्याहीपेक्षा अनुभवाचे अधिष्ठान जर कुठल्या साहित्याला मिळाले असेल तर ते बागुलांमुळे मिळाले. त्यांच्यामुळे मराठी साहित्य, मराठी वाङमय समृध्द झाले हे तुम्हा-आम्हाला नाकारता येत नाही. म्हणून या माणसाने व्यक्तीपासून समस्येपर्यंत केलेला व्यापक विचार कितपत महत्वाचा आहे, याबाबत मला एवढेच सांगावेसे वाटते की,

"कारल्यात साखर घोळल्याने, सोय जीभेची होते,
कारल्याची नाही....
लॉटरी लाखाची लागल्याने, सोय एकाची होते,
लाखाची नाही..."

या लाख लोकांचे भले झाले पाहिजे. किमान माझ्या वाटयाला आलेले जीणे इतरांच्या वाटयाला येता कामा नये अशाप्रकारची संपूर्ण मानवतेविषयीची तळमळ बाबूराव बागुलांच्या ठिकाणी होती. आदरणीय श्री. भुजबळ साहेबांनी हा प्रस्ताव सादर केला. माझी देखील माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्या प्रस्तावाला जोडून सूचना आहे की, अशाच प्रकारचे एक चिरंजीवी ठरणारे एखादे प्रतिष्ठान आपल्याला उभे करता येईल की काय? याचा देखील आपण विचार करावा. एक कमी शिकलेला माणूस. परंतु संपूर्ण मराठी साहित्याला, इंग्रजी साहित्याला, हिंदी साहित्याला, उर्दू साहित्याला अनुभवाचे अधिष्ठान व दिशा देणारे अशाप्रकारचे वाङमय या माणसाच्या प्रतिभेतून खऱ्या अर्थाने उत्स्फूर्तपणे बाहेर आले आहे.

सभापती महोदय, काव्य म्हणजे काय? साहित्य म्हणजे काय? जगामध्ये सर्वात स्वस्त कोणती बाब असेल तर बदमाशाला बहुमान, आणि कुठल्याही निषिध्द दगडालाही जर दुनियेमध्ये देवत्व प्राप्त केले जात असेल तर त्या माणसाचा देखील विचार व्हावा हा पहिला विचार बाबुराव बागुलांनी मांडला. आणि म्हणून माझी आपणास विनंती आहे की, बाबुराव बागुलांच्या साहित्याविषयी कृतज्ञता आणि आत्मियता जर तुम्हा-आम्हाला बाळगावयाची असेल तर त्यासाठी एखादे प्रतिष्ठान जन्माला यावे अशी मी विनंती करतो. पोएट्री म्हणजेच,.... ..2.

प्रा. वसंत पुरके...

" Poetry is nothing less than the most perfect speech of Man, in which he comes near to utter the truth."

जगातील वैश्विक सत्य प्रदर्शित करणे हे खऱ्या अर्थाने सर्वोत्कृष्ट प्रतिभावंतांचे कर्तृत्व असते, या प्रतिभावंताने या मराठी साहित्याला प्रचंड मोठे व समृध्द केले आहे त्यांच्या प्रती आदरांजली व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, अशाप्रकारचा प्रस्ताव सभागृहामध्ये यावा अशी आम्हा सर्व मंडळींची मनापासून इच्छा होती. आणि तो माननीय मंत्रिमहोदयांनी मांडल्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो.

कै. बाबूराव बागुल हे दलित साहित्य चळवळीचे प्रणेते होते. त्यांनी असंख्य अस्मितादर्श साहित्य मेळावे घेतले. त्या चळवळीतून असंख्य साहित्यिक निर्माण झाले. कै. दया पवार, अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, राम जाधव, कवि कोंडविलकर, ज. वि. पवार, प्रविण बागडे, प्रकाश आंबेडकर, केशव मेश्राम, भालचंद्र मुणगेकर हे या चळवळीमध्ये वावरले. त्यांनी दलित साहित्य चळवळ उभी केली. या साहित्यिकांनी जातीवर आधारीत विषमता भोगलेली आहे, असंख्य निखारे यांनी भोगलेले आहेत. मी याबाबत माझे एक उदाहरण आपणास सांगतो. मालवण तालुक्यामध्ये धामापूर हे माझे गाव आहे. त्या गावात एक सुंदर तलाव आहे. माझ्या लहानपणी त्या गावात घरां बाहेर करवंटी ठेवली जात होती. आणि त्या करवंटीमधून आम्हाला चहा दिला जात होता. आम्हाला प्यायला पाणी देतांना सुध्दा ते वरुन टाकले जात होते. त्यामुळे एक पेला पाणी प्यावयाचे असेल तर संपूर्ण घागरभर पाणी वाया जात असे. माझ्या वडिलांनी स्वत: हे भोगले आहे. त्यासाठी त्यांना त्याकाळच्या रितीप्रमाणे गावामधून जातांना गळयात एक मडके बांधावे लागत होते आणि कमरेला पाठीमागे एक झाडू लावावी लागत होती. हे सारे आम्ही भोगले आहे. आणि हे सर्व या दलित साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून लिहून काढले आहे, सांगितले आहे. काल मी अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये सुध्दा हा मुद्दा मांडला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान साहित्यिक होते. त्यांचे हे सर्व शिष्य आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या राज्यात जन्माला आले नसते तर या राज्याचा दलित मुख्यमंत्री कदापि झाला नसता. कै. यशवंतराव चव्हाण साहेबांनंतर ज्याला दलित साहित्याची जाण आहे, ज्याला साहित्य समजते असा मुख्यमंत्री माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांच्या माध्यमातून झाला. याला ही दलित साहित्य चळवळ कारणीभूत आहे. म्हणून यावेळी मी त्यांचा शतश: आभारी आहे. मला आपण बोलण्याची संधी दिली, शोक प्रस्ताव मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, साहित्य सम्राट श्री.बाबुराव बागूल यांना आदरांजली वाहण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, श्री.बाबुराव बागुल यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर चौथी इयत्तेमध्ये असताना एक कविता लिहिली होती. एका अर्थाने त्यांना ही उपजत प्रतिभा होती, निसर्गदत्त होती हे स्विकारावे लागेल. म्हणजे भूक आणि दारिद्रय यांच्याशी संघर्ष करीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्ध हे त्यांच्या ह्दयात वास करीत होते, तर कम्युनिस्ट चळवळ ही त्यांना खुणावत होती. एका अर्थाने बुद्ध आणि कम्युनिस्ट चळवळ यांचे द्वंद्व हे त्यांच्या मनामध्ये चालत होते. त्यांनी इराण्याच्या हॉटेलमध्ये बसल्यानंतर चहाचे घोट घेत, कथा-कादंबऱ्यांना आकार देण्याचे काम देखील केलेले आहे. मार्टीन ल्युथर किंग यांना स्वत:चा "मरण स्वस्त होत आहे" हा कथासंग्रह त्यांनी अर्पित केला. तसेच देव, देश, धर्म याही पेक्षा माणूस श्रेष्ठ आहे यावर त्यांचा विश्वास होता. जगामध्ये माणसापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही हे समीकरण बांधून त्यांनी जीवनाची आचारसंहिता ठेवली होती. त्यांनी एक कविता लिहिली होती. त्यांच्या कवितांच्या संदर्भाबाबत, साहित्याच्या क्षेत्राबाबत बरेच जण अज्ञ आहेत. परंतु कै.बाबुराव बागूल यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अनेक कविता लिहिल्या आहेत. त्यापैकी एक कविता मी येथे सांगू इच्छितो.

हे प्रज्ञावंत प्रलयकारी माणसा, साऱ्या विश्वाचे नामकरण तू केलेस
आणि सर्वांना गळाभरुन हाक मारलीस, हे सूर्या, हे चंद्रा, हे शून्या,
हे संस्थे, हे मुंगी, आणि हे पर्वता आणि तुझ्या हाकेप्रमाणे ते झाले,
आणि आताही तसेच होईल, तू हाक मार, ते तुझे होऊन जातील.

सभापती महोदय, मानव्याचा पुजारी, साहित्याच्या शहरातील हा सम्राट यांचे दु:खद निधन झ ााले. म्हणून मी माझ्यावतीने आणि माझ्या पक्षाच्यावतीने त्यांना आदरांजली वाहतो.

-----

. . . . .डब्ल्यु-2

श्री.सुमंत गायकवाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळसाहेबांनी कै.बाबुराव बागुल यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला मी रिपब्लीकन पक्षाच्यावतीने पाठिंबा देण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहाच्या प्रथा काय आहेत ? याची मी नवीन सभासद असल्याने मला कल्पना नाही. पण याठिकाणी कै.बाबूराव बागुल यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात यावा अशी सन्माननीय सदस्यांना मागणी करावी लागते ही फार वाईट गोष्ट आहे. कै.बाबुराव बागुल हे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले नसतील, पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, कै.बाबूराव बागुल हे माझे अत्यंत जवळचे मित्र होते. जेव्हा मी 1968 मध्ये माटुंगा लेबर कॅम्पमधून नगरसेवक झालो, तेव्हा ते माझे मतदार होते. त्यांनी मला मतदान केलेले आहे. त्यांच्याबद्दल असे बोलले जात असे की, ते कम्युनिस्ट विचारसरणीचे आहेत. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, कै.बाबुराव बागूल हे खऱ्या अर्थाने मार्क्सवाद आणि आंबेडकर वाद यामध्ये खऱ्या अर्थाने समन्वय साधलेला असा एक थोर साहित्यिक, दलित साहित्यिक होते. मी तर असे म्हणेन की, दलित साहित्याचा जनक हे कै.बाबूराव बागुल होते. आम्ही अनेक वेळेला त्यांच्या बरोबर चर्चा केलेल्या आहेत. सिद्धार्थ कॉलेजमध्ये असताना श्री.धनश्याम तळवटकर यांच्या टेबलाजवळ सर्व दलित साहित्यिक जमा होत असत. त्यावेळी एक नवीनच युग तयार झाले होते आणि या लोकांनी जणुकाही मराठी साहित्याला आव्हान देण्याची घोषणाच केलेली होती. त्यावेळी या दलित साहित्याचे संमेलन महाड येथील चवदार तळयाच्या ठिकाणी झालेले आहे. कै.बाबूराव बागुल हे मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले नसतील. पण मी तुम्हाला सांगू इच्छितो की, तुम्ही जर त्यांच्या कथा-कादंबऱ्या वाचल्या तर असे दिसून येईल की, ते अत्यंत गरीब घराण्यातील होते. माटुंगा लेबर कॅम्पच्या बाहेर एक इराण्याचे हॉटेल आहे. आम्ही तेथे बसत होतो. कारण तेव्हा अशी स्थिती होती की, त्या हॉटेलमध्ये जाऊन एक कप चहा घेतला तर दोन तास तेथे बसण्यासाठी परवानगी मिळत असे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ KTG/ SBT/ 14:55

श्री. सुमंत गायकवाड ........

कै.बाबुराव बागूल यांनी त्यांचे सर्व लिखाण या हॉटेलमधून केलेले आहे. असे एक चांगले साहित्यकार कै. बाबुराव बागूल आज आपल्यामधून निघून गेले आहेत. शासन त्यांच्या नावे प्रतिष्ठाा सुरु करील की नाही याची तर मला शंकाच वाटते. जी प्रतिष्ठाने या पूर्वी सुरु करण्यात आलेली आहेत त्यांची काय व्यथा आहे याची मला माहिती आहे. कै. बाबुराव बागूल यांना श्रध्दांजली वहाण्याकरिता ज्या वेळी माननीय मंत्री महोदय, श्री. छगन भुजबळ तेथे गेले त्यावेळी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष माननीय श्री. रामदास आठवले हे देखील गेले होते. त्यावेळी या दोघांनी याबाबतीत घोषणा केली होती. त्यांना मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदय, श्री. छगन भुजबळ आपण यासाठी पुढाकार घ्यावा, आम्ही तुम्हाला पाठिंबा देऊ. नाशिक येथे कै. बाबुराव बागूल यांचे यथोचित स्मारक करावे अशी या ठिकाणी विनंती करतो, या संदर्भात आम्ही देखील शासनाला सहकार्य करु असे मी सांगू इच्छितो. या थोर साहित्यिकाला श्रध्दांजली वाहण्याकरिता माननीय मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ यांनी जो शोकप्रस्ताव येथे मांडलेला आहे त्याला पाठिंबा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

..............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2....

श्रीमती उषाताई दराडे ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, कै बाबुराव बागूल यांना आदरांजली वाहण्यासाठी, माननीय मंत्री श्री छगन भुजबळ यांनी जो शोकप्रस्ताव येथे मांडलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, वर्गलढा व वर्णलढा या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केलेला आहे. स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत समाजामध्ये, वर्गलढा व वर्णलढा असा भेद सुरु आहे. दलित, पददलित, मागासवर्गीय यांचा बुध्दीभेद करण्याचा प्रयत्न समाजामधील काही लोकांनी केलेला आहे. वर्णभेद व वर्गभेद या कोणत्याही लढयाच्या दोन बाजू असू शकत नाही. या दोन्हीही, एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वर्गभेदाने सांगावे आर्थिक उन्नती अगोदर व वर्णभेदाने सांगावे जात विरहित समाज रचना अगोदर. खरे तर असा वाद समाजामध्ये असू शकत नाही.

सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिबा फुले, छत्रपति शाहू महाराज, यांनी समाज परिवर्तनाचे जे स्वप्न पाहिले आहे ते इतर बाबींपेक्षा काही वेगळे असू शकत नाही. समाज परिवर्तनाचा, आर्थिक उन्नतीचा लढा लढत असताना, स्वातंत्र्याचा लढा लढत असताना, अनेक पातळीवर, प्रत्येकाने आपल्या क्षमतेप्रमाणे योग्य भूमिका बजावण्याचा प्रयत्न केला आहे. मी आपणास सांगू इच्छिते की, समाज परिवर्तनाच्या कामामध्ये साहित्याची भूमिकाही वेगळी असू शकत नाही. समाज परिवर्तन लढयातील सैनिक हा राजकारणी असू शकतो, सत्ताधारी असू शकतो, किंवा एखाद्या विशिष्ट वर्गातील असू शकतो असे नव्हे तर तो या व्यतिरिक्त इतरही क्षेत्रातील असू शकतो. साहित्य हे एक महत्वाचे हत्यार आहे. कै.. बाबुलाल बागूल यांनी समाज परिवर्तन करीत असताना असे विचार निर्माण करुन ते जगवून समाजापर्यंत पोहचविण्याकरिता साहित्याचा वापर केला. ज्या प्रमाणे भगतसिंग यांनी गॅलरीमध्ये बॉम्ब टाकून स्वातंत्र्य लढयाचा संदेश दिला त्याच पद्धतीने साहित्यिक मंडळी देखील आपल्या लेखणीमधून समाजाला एक प्रकारचा संदेश देत असतात. कबीर यांनी म्हटले आहे की, "शब्दकाही धन है मेरे पास" माझ्या घरामध्ये सर्व संपत्ती ही केवळ शब्दांचीच आहे. अशी शब्दांची संपत्ती साहित्यकारांची असते.

सभापती महोदय, शाहीर आण्णाभाऊ साठे,शाहीर अमर शेख, श्री. वामनभाऊ कर्डक, श्री. दया पवार या सर्वांचा मला या ठिकाणी आग्रहाने उल्लेख करावयाचा आहे. ज्या प्रमाणे

...3...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .........

मुंबईतील लावणी गरीब आणि श्रीमंत यामधील दरी उभी करते. त्याचप्रमाणे श्री. वामनभाऊ कर्डक यांचे साहित्य आपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, दलित माणसाच्या जगण्यातील जीवंतपणा व त्यांच्या जीवनातील प्रश्न सोडविण्याची तीव्रता दर्शविणारी वस्तुस्थिती त्यांच्या साहित्यामध्ये विषद केलेली आहे. यापेक्षा आणखी काही वेगळे वर्णन आपल्याला करता येणार नाही. सामान्य माणसाचे मन ज्या माणसाला कळते त्या माणसाकडून "जेव्हा आम्ही जात चोरली", "लूटारु", "भूक", "विद्रोह","मृत्यू", "संघर्ष","वेदत्व","देवता", अशा प्रकारची शीर्षके येऊ शकतात. ज्यांच्याकडे माणूसपण आहे त्याच माणसाला या सर्व गोष्टींवर लिहिण्याकरिता शब्द मिळू शकतात. त्यांच्याजवळ इतर कोठलीही जात नाही. मानवता ही एकच जात त्यांच्याकडे आहे. मानवता हा एकच धर्म त्यांच्याकडे आहे. एकाच जातीचे स्वप्न बाळगणारा हा वेडा माणूस आहे. या वेडाने भारावून जाऊन समाजपरिवर्तनाचे स्वप्न अहोरात्र त्यांनी पाहिले आहे. या सर्व दृष्टीने आपल्याला कै.. बाबुराव बागूल यांच्याकडे पहावे लागेल. त्यांचे स्मरण करीत असताना "जय भीम " असा आदराने उल्लेख करणे ही काळाची फार मोठी गरज आहे.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

पददलितांना पाठीचा कणा दिला. लोकशाहीचा अर्थ दिला. एवढ्या उंचीचे नेतृत्व जगाच्या पाठीवर कदाचित झाले नाही आणि होणार नाही. त्यांच्या विचाराचे वेड जसे यांना होते त्याच पध्दतीने त्यांना ग्रेस आणि मार्क्स यांच्या विचारांचेही वेड होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुमंतराव गायकवाड साहेबांनी फार चांगला उल्लेख केला. मार्क्सवाद असेल किंवा आंबेडकरवाद असेल या सगळ्या वादांमध्ये काही गोष्टी खूप चांगल्या आहेत. प्रतिगामी विचारांच्या लोकांना सुध्दा समाजवादी गांधीवादाचे विचार काही दिवस घ्यावे लागले होते. जे विचार चांगले असतात ते चांगलेच असतात. या सगळ्यांची सांगड घालून समाजाचे प्रश्न आपापल्या परीने सोडवण्याचे प्रयत्न करणारे जे कोणी होऊन गेले त्यांच्यामध्ये बागूल साहेब होते. या देशामध्ये ज्या व्यथा आहेत, जिथे दगडाला देव मानले जाते, जिथे धातूंना देव मानले जाते पण हाडामासाच्या जिवंत माणसाला अजूनही स्वीकारले जात नाही, त्याला अस्पृश्य समजले जाते, ही समाजाची खंत बागूल साहेबांच्या मनामध्ये होती. मला एक गोष्ट या ठिकाणी सांगावयाची आहे की, ज्या समाजामध्ये क्रांतीची ज्योत पेटवणाऱ्या, महिलांच्या शक्तीची जाणीव असणाऱ्या सावित्रीला सुध्दा स्वत:च्या पतीचे म्हणजे ज्योतिबांचे धार्मिक विधी करीत असताना शिंकाळे पकडत असताना तिच्याकडे बोट दाखवणारी समाजव्यवस्था अजूनही आमच्या समाजामध्ये आहे. हा वर्णभेद, ही जातीव्यवस्था नष्ट करणे आणि निश्चितपणे पुढे वाटचाल करणे ही महत्वाची बाब आहे. पुन्हा ही कविता कधीही निर्माण होऊ नये. कवी सुरेश भट म्हणतात की, " ये मरणा ये, ये ये मरणा, मज वाटे या जगण्याचे भय". ज्या समाजव्यवस्थेमध्ये जगण्याची भीती वाटणार नाही आणि निर्धोकपणे जगता येईल अशा प्रकारे ही लोकशाही सुदृढ करण्याचे काम या बाबुराव बागूल यांच्या विचाराने केलेले आहे त्या सर्व विचारांना पुन्हा एकदा मी या ठिकाणी क्रांतिकारी अभिवादन करते. बागूल साहेबांच्या विचारांना जय भीम म्हणते आणि माझे दोन शब्द संपविते.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ( नामनियुक्त ) : माननीय मंत्रिमहोदय श्री. छगन भुजबळ साहेबांनी कै.बाबुराव बागुल यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. परवा मी आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेच्या भाषणामध्ये हा मुद्दा उपस्थित केला होता की, हा शोक प्रस्ताव शासनाच्या वतीने आणण्यात यावा. तो प्रस्ताव आज या ठिकाणी आलेला आहे. आताच आमच्या भगिनी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी वर्गलढा आणि वर्णलढा हे वेगळे काढू शकत नाही असे सांगितले. या समाजामध्ये ज्यांनी कोणी हा प्रयत्न केला ते मनुवादाचे वाहक होते हे विसरुन चालणार नाही. या समाजामध्ये आजही माणसाला माणूस म्हणून जगता येत नाही. या समाजामध्ये आजही विहिरीवर पाणी भरावयास गेलेल्या माझ्या भगिनीला यातना सोसाव्या लागत आहेत किंबहुना तिला जाळून मारले जाते. तो समाज बदलण्याची ज्यांच्यामध्ये ताकद होती, त्या समाजाचे प्रबोधन करण्याची ज्यांच्यामध्ये ताकद होती अशापैकी एक बाबुराव बागूल होते. त्यांनी जे बघितले, त्यांनी जे भोगले ते त्यांनी त्यांच्या साहित्यातून लिखाणाच्या स्वरुपात पुढे आणले. सन्माननीय सदस्य श्री. सुमंतराव गायकवाड यांनी मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद याचा उल्लेख केला. स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मार्क्सवादाच्या विरोधात उभे राहावयाचे. परंतु आंबेडकवादी चळवळीचे निष्ठेने काम करणारे, त्यांच्यावर प्रचंड निष्ठा असणारे श्री. बाबुराव बागूल यांच्या मनातील द्वंद्व त्यांनी लिखाणाच्या माध्यमातून पुढे आणले आणि थोडीफार आपली जवळीक त्यांनी दोन्ही चळवळीमध्ये दाखवली. पण हे सगळे घडत असताना, या ठिकाणी उदाहरणे देण्यात आली, त्यांच्या साहित्याबद्दल बोलले गेले पण वामनराव कर्डक, बाबुराव बागूल हे जेव्हा मरणाच्या जवळ जात होते तेव्हा त्यांची परिस्थिती काय होती याकडे शासनाने जरा लक्ष द्यावे. बाबुराव बागूल यांचे चिरंजीव दोन महिन्यांपूर्वी दारु पिऊन वारले. ते स्वत: तीन महिने कोमामध्ये होते. शासनाने याबदल थोडेसे लक्ष द्यावे. ज्यांची संपत्ती ही केवळ त्यांचे साहित्य आहे, युगानुयुगे ज्यांच्या साहित्याचा प्रभाव केवळ महाराष्ट्रावर नाही तर संपूर्ण जगावर पडणार आहे, असे म्हटले जाते की, जर खऱ्या अर्थाने बाबुराव बागूल यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर जर लॉबींग केले असते तर ते नोबेल पुरस्कारापासून फार लांब राहिले नसते. एवढ्या ताकदीचा एक साहित्यिक

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. जितेंद्र आव्हाड .....

आपल्याकडे होता पण मरताना त्यांना ज्या यातना झाल्या त्याबद्दल या ठिकाणी न बोललेले बरे. पण असे अनेक साहित्यिक आहेत की, ज्यांचे साहित्य युगानुयुगे या पिढीला आणि यानंतरच्या पिढीला मार्ग दाखविणारे ठरणार आहे. मला दलित साहित्यातून निर्माण झालेली दोन वाक्ये कायम आठवतात. सांगा बिर्ला टाटा, धनाचा साठा आणि आमचा वाटा कोठे आहे ?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....

श्री.वामनराव कर्डक यांच्या कवितेच्या या दोन ओळी आहेत. परंतु त्यातून किती मोठे मार्गदर्शन होते. हे सर्व वाचत असताना त्यांचे अखेरचे दिवस होते, खास करुन दलित साहित्यातील जे दलित आहेत, त्यांची अवस्था वाईट होते. शासनाने त्यांच्यासाठी काही तरी केले पाहिजे. एखादे तरी प्रतिष्ठान केले पाहिजे. स्व.बाबूराव बागूल यांच्या नावाने प्रतिष्ठान निर्माण करावे. पण जे खरोखर साहित्य विश्वाला ऊर्जा देतात, साहित्य विश्वात वणवा पेटवतात, ज्याच्यातून आपण मार्ग शोधू शकतो असे साहित्य निर्माण करतात, अशा साहित्यिकांना आधार वाटेल, शासन आमच्यासाठी आहे असे वाटेल असे काही तरी पाऊल उचलून त्यांना आदरांजली वाहू या. ज्या पध्दतीने माननीय श्री.छगन भुजबळ हे नाशिकला गेले, त्यांची प्रतिक्रिया तर उत्फूर्त होती. आंतरराष्ट्रीय स्तरावरचे थोर साहित्यिक होते, स्व.बाबूराव बागूल यांची त्यांनी काबकाशी तुलना केलेली आहे. मेटामॉरफॉसीस कन्टेम्पोररी साहित्यात त्यांच्या सारखा दुसरा ताकदीचा साहित्यिक आहे असे मला तरी वाटत नाही. म्हणून त्यांना श्रध्दांजली वाहत असताना सर्व साहित्यिकांना खास करुन दलित साहित्यिकांना ताकद येईल, गरिबीतून, दारिद्रयातून, शोषित आहेत, त्यांनी भोगलेले आहे,त्यांच्या ह्दयाला चिमटा बसलेला आहे, कधी तरी शाळेच्या बाहेर बसून शिकावे लागले आहे या सगळया वेदना पेपरमध्ये दिसत आहेत. समाज कसा असावा हे पुढील 50 वर्षानंतर पुढील पिढी वाचेल तेव्हा त्यांनी काय काय भोगले आहे, हे समजले तर समाजामध्ये परिवर्तन करण्याची ताकद सवर्णांमध्ये सुध्दा येईल. ही ताकद देण्याचे काम साहित्यिक करीत आहेत. त्यांच्य यातना आपण दूर केल्या पाहिजेत त्यासाठी शासनाने काही तरी भूमिका जाहीर करावी अशी मी याठिकाणी विनंती करीत आहे.

------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.छगन भुजबळ यांनी स्व.बाबूराव बागुल यांच्या निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्या शोक प्रस्तावाबद्दल सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी देखील माझ्या भावना याठिकाणी व्यक्त करीत आहे.

स्व.बागुल हे ज्येष्ठ साहित्यिक, दलित साहित्यिक, दलित साहित्याचे प्रणेते, विद्रोही कवी, पुरोगामी विचारवंत होते. स्व.बागूल हे मराठीतील दलित साहित्यिक म्हणून सर्वांना परिचित आहेत. त्यांनी कविता, कथा, कादंब-या व वैचारिक वाङ्‌मयाचे विपुल लेखन केलेले आहे. कै.बागूल यांनी तळागाळातील सर्वसामान्य माणसांच्या वेदना आपल्या लेखनातून मांडल्या. कै.बागूल यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. अशा या ज्येष्ठ साहित्यिकाचे निधन दिनांक 26 मार्च, 2008 रोजी झालेले आहे.

सन्माननीय मंत्री महोदय श्री.छगन भुजबळ यांनी एक अत्यंत चांगले उचित प्रतिष्ठान निर्माण करण्याची भावना शासनाच्यावतीने व्यक्त केलेली आहे. सभागृहातील अनेक वक्त्यांनी साहित्य क्षेत्रात सातत्याने काम करणा-या सर्व साहित्यिकांना हे प्रतिष्ठान प्रेरक ठरेल अशी भावना व्यक्त केलेली आहे. मला खात्री आहे की, शासन या प्रतिष्ठानाची आखणी करील, स्थापना करील आणि तीच ख-या अर्थाने कै.बागूल यांना श्रध्दांजली ठरेल.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात. )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियाकडे पाठविण्यात येईल. सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.09 ते 3.25 पर्यंत स्थगित झाली.)

---------

नंतर श्री.शिगम

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**माहितीच्या मुद्यासंबंधी**

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आणिक - चेंबूर या ठिकाणी जे ॲडलॅब थिएटर आहे त्या ठिकाणी भरणीचे काम चालू आहे. मी गेली 10-15 वर्षे त्या रस्त्याने ये-जा करतो. पूर्वी तेथील संपूर्ण भाग हा मॅनग्रोव्हजने भरलेला होता. माझी गाडी त्या ठिकाणी बंद पडली म्हणून मी तेथे थांबलो होतो. त्यावेळी त्या मॅनग्रोव्हजच्या ठिकाणी ट्रकने भरणी केली जात असल्याचे माझ्या निदर्शनास आले. पूर्वी तेथील भाग संपूर्ण मॅनग्रोव्हजने भरलेला होता. या भरणीमुळे तेथे आता फक्त 20 टक्केच मॅनग्रोव्हजचा भाग राहिलेला आहे. या भरणीमुळे तेथील मॅनग्रोव्हजला मिळणारे खारेपाणी मिळणार नाही आणि ती झाडे नष्ट होतील आणि भरणी टाकून जमीन ताब्यात घेतली जाईल. एखाद्या गरिबाने एखादे झाड तोडले तर त्याच्यावर वन कायद्यातील सर्व कलमे लावली जातात. सभापती महोदय, मॅनग्रुव्हज म्हणजे झुडपी जंगल. हे झुडपी जंगल त्याठिकाणी असताना आणि ते नष्ट होत असताना शासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. तेव्हा तेथील भरणीच्या कामाची चौकशी करुन हे काम ताबडतोबीने थांबवून मॅनग्रोव्हजचे रक्षण करावे अशी माझी या माहितीच्या मुद्याद्वारे आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी जी माहिती दिली त्याप्रमाणे त्याठिकाणी भरणी चालू आहे का ते पहावे. भरणी चालू असेल तर ती ताबडतोबीने बंद करावी आणि ज्याने ही भरणी केली असेल त्याच्यावर कारवाई करावी.

श्री. बाळासाहेब थोरात : कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : आपण केलेल्या कारवाईची माहिती उद्या संध्याकाळपर्यन्त सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी सभागृहाला द्यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : ठीक आहे.

----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य व खादी ग्रामोद्योग मंडळाचे सन 2004-2005 चे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबादचासन 2006-2007 चा सातवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते यांनी " समाजकल्याण विभागांतर्गत चालणा-या अनुदानित आश्रम शाळांना वाढत्या महागाई निर्देशंकानुसार प्रती विद्यार्थी 600 रुपये प्रमाणे परिरक्षण अनुदान मंजूर करण्याची मागणी, तसेच हे अनुदान आदिवासी विभागांतर्गत येणा-या आश्रमशाळांना मंजूर न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी " जानेवारी,2006 ते मार्च,2008 या कालावधीत महावितरणाच्या जनसंपर्क विभागाने वेगवेगळया जनजागृहती अभियानाच्या जाहिराती वर्तमानपत्रे व वृत्त वाहिन्यांना नियमबाहय पध्दतीने दिल्यामुळे महावितरण कंपनीची जवळपास 2.5 कोटी रुपयांची झालेली फसवणूक " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी "ठाणे महानगरपालिकेने ठाणे शहरातील जनतेकडून कर रुपाने गोळा केलेले दोन कोटी गत 10 वर्षापूर्वी दादरस्थित चेतना सहकारी बँकेत ठेव म्हणून ठेवणे, सदर बँक ठेवी ठेवल्यानंतरदुस-याच दिवशी बुडीत निघणे, या ठेवीपैकी महापालिकेस फक्त 21 लक्ष रुपये परत मिळणे, या ठेवीपैकी महापालिकेस फक्त 21 लक्ष रुपये परत मिळणे, या ठेवी ठेवणा-या अधिका-यांवर कार्यवाही करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी " आर्थिकदृष्टया मागासलेल्या दारिद्रय रेषेखालील लोकांना पिवळी रेशनकार्ड देण्याचे शासनाचे धोरण असूनही अलिबाग व रोहा तहसिल कार्यालयातर्फे अदयापही दारिद्रय रेषेखालील लोकांना पिवळी रेशनकाडे देण्यात न येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर यांनी "मुंबईतील वरळी येथील शासकीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या जेवणातील भाजीमध्ये दिनांक 29 मार्च, 2008 रोजी पाल आढळल्याने वसतिगृहात राहण्या-या विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी "जीवनावश्यक वस्तुंची झालेली बेसुमार भाववाढ, याभाववाढीवर नियंत्रण ठेवण्यास शासनाला आलेले अपयश " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "अपंग कायदा 1945 कलम 43 खाली अपंगांकरिता 400 चौरस फुटांच्या घरांसाठी स्वयंसिध्द स्वयंरोजगार, अपंग पुनर्वसन केंद्र,मुंबई या संस्थेने जमिनीची केलेली मागणी, बेघर, पुरग्रस्त, प्रकल्पग्रस्त अपंगाना कायमस्वरुपी पुनर्वसन, त्यांच्या पालकांना पेन्शन, त्यांच्या स्टॉलला परवाने देणे तसेच म.न.पा.दवाखान्यात त्यांचा मोफत इलाज होणे इत्यादी मागण्यांची अंमलबजावणी न झाल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री व्ही.यू.डायगव्हाणे,प्रा.बी.टी.देशमुख यांनी " राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 7 वरील बुट्टीबोरी (नागपूर) रेल्वे क्रॉसींगच्या ठिकाणी ओव्हर ब्रिजचे काम गेल्या 7-8 वर्षापासून धिम्या गतीनेसुरु असून रेल्वे क्रॉसींग करताना एक ते दीड तास विलंब होत असल्याने आजारी व्यक्ती, विद्यार्थी, कर्मचारी, प्रवाशी इत्यादींना तटकळत थांबावे रेलवे क्रॉसींगच्या दोन्ही

5...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

बाजुस 1 कि.मी. रस्त्यावर तात्पुरते दुभाजक तयार करण्याची त्यांची मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "बोईसर एमआयडीसी मधील स्टर्लिग आक्झिलरी या कारखान्यात स्फोट होऊन 2 कामगार ठार व 17 कामगार जखमी होणे,तसेच बोईसर येथीलच सियायाराम सिल्क मिलमध्ये मशीनमध्ये अडकून शिवबहाद्दुर या कामगारांचा मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सातार्डा-सातेली (जि.सिंधुदूर्ग) येथील डोंगरात गोव्याच्या खनिकर्म विभागाने उत्खनन थांबविण्याचे आदेश देऊनही खनिज काढण्यात येणे, यामुळे खाणीच्या खाली राहणा-या 35 घरांना धोका निर्माण होणे, ही खाण बंद करण्याची ग्रामस्थांची मागणी बंद न करता उलट त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, विनोद तावडे यांनी " द्राक्ष उत्पादक शेतक-यांसाठी पीक विमा काढण्यासाठी असलेल्या अटींमध्ये आगीमुळे, गारपीट अथवा वादळात नुकसान झाल्यास एकरी 10 हजार रुपये विमा काढण्याची तरतूद असणे, उक्त रक्कम शेतक-यांच्या आवाक्या बाहेरची असल्याने त्यांनी विमा न काढल्याने अनेक शेतकरी पीक विम्याच्या रक्कमेपासून वंचित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी माझ्या दालनात अनुमती नाकारली आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : टॅक्सी चालकाने परदेशी महिलेचा केलेला विनयभंग

**मु. शी.** : टॅक्सी चालकाने परदेशी महिलेचा केलेला विनयभंग याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ' टॅक्सी चालकाने परदेशी महिलेचा केलेला विनयभंग 'या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>निवेदनानंतर</u>**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, परदेशात पर्यटक जातात त्यावेळी अशी पध्दत आहे की, टॅक्सीमध्ये बसलेल्या पर्यटकाला टॅक्सी कुठे जात आहे, कुठून आली आहे याची नोंद केली जाते. टॅक्सीवर मॉनेटरींग करणारी एक सिस्टीम परदेशात आहे. अशी सिस्टीम मुंबईमध्ये लागू केली जाणार आहे काय ? त्याचप्रमाणे मुंबई मिरर या दैनिकात बातमी आलेली आहे आणि रशियन मुलीचा फोटो त्यामध्ये छापण्यात आलेला आहे. याचे कात्रण मी आपल्याला पाठवून देते. अशा प्रकारे विनयभंग झालेल्या महिलेचा फोटो छापल्याबद्दल संबंधित वृत्तपत्राची दखल घेऊन शासन त्यावर कारवाई करील काय ? तसेच टॅक्सीमध्ये माहितीपत्रक ठेवण्यात येईल काय ? इंग्रजी भाषेमध्ये हे माहितीपत्रक ठेवल्यास परदेशी पर्यटकांना सोईचे होईल. तसेच या केसमधील आरोपी सय्यद हफीज याला जामीन मिळाला काय ? जामीन रद्द करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सय्यद हफीज, टॅक्सी चालक याला कोर्टाने जामीन दिलेला आहे. जामीनपात्र गुन्हा असल्यामुळे त्याला जामीन मिळाला आहे. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे टॅक्सीमध्ये मॉनिटरींग सिस्टीम सुरु करण्याबाबत त्यासंबंधीची शक्यता पडताळून पाहून शासन त्यासंबंधीचा निर्णय घेईल. टॅक्सीमध्ये प्रवासी बसल्यानंतर टॅक्सीनंबर,फोननंबर इतर माहिती देण्याबाबत विचार केला जात आहे. मागील वेळी मी सांगितले होते की, टॅक्सीमध्ये बसल्यानंतर काही अडचण आल्यास कोणत्या नंबरवर संपर्क साधावा यासंबंधीचे आदेश देण्यात येतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वृत्तपत्रामध्ये परदेशी मुलीचा फोटो छापलेला आहे. छायाचित्रकाराने बातमीमध्ये सर्कल करुन मुलीचा फोटो छापला आहे हे योग्य नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, यासंबंधी गंभीर दखल घेऊन संबंधित वृत्तपत्राच्या संपादकाला सूचित करण्यात येईल.

------

......3



**पृ. शी.** : हिंगोली जिल्हयातील औंढा तालुक्यातील बंधाऱ्यांची निकृष्ट दर्जाची कामे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु. शी.** : हिंगोली जिल्हयातील औंढा तालुक्यातील बंधाऱ्यांची निकृष्ट दर्जाची कामे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाळासाहेब थोरात ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर,जगदीश गुप्ता यांनी "हिंगोली जिल्हयातील औंढा तालुक्यातील बंधाऱ्यांची निकृष्ट कामे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>निवेदनानंतर</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शासनाने कबूल केले आहे की, 17 बंधाऱ्यांपैकी 8 बंधाऱ्यांची कामे पूर्ण झालेली आहेत. त्यामध्ये पाणीसाठा होत आहे. हिंगोली जिल्हयातील औंढा

तालुक्यात 16 बंधारे बांधले गेले. त्यापैकी लक्ष्मण नाईक तांडा,संघनाईक तांडा, काळा पाणी तांडा, लोहरा बु., काठोण तांडा, सिरला, बहिरावा चौंढी इ. बंधारे बांधले आहेत. हे बंधारे ॲग्रीमेंटप्रमाणे बांधले गेले नाहीत. फाऊंडेशनमध्ये सिमेंट टाकण्याऐवजी दगड आणि धोंडे टाकले आहेत. कोणत्याही बंधाऱ्यामध्ये पाणी साठा होत नाही. यामध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे 10 बंधारे पूर्णपणे निकामी ठरले आहेत. एक थेंब पाणी यामध्ये साचत नाही. म्हणून यासंबंधी उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधितांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एकूण 17 बधाऱ्यांची कामे जिल्हा परिषदेमार्फत औंढा-नागनाथ तालुक्यात घेण्यात आली. यासंबंधी तक्रार प्राप्त झाल्यानंतर डीआरडीएचे प्रकल्प संचालक यांच्या नेतृत्वाखाली चौकशीसाठी टीम तयार करण्यात आली. चौकशीमध्ये 8 बंधाऱ्यांची कामे नीटपणाने न झाल्याचे आढळून आले. कामे चुकीची झाली असून पाणीसाठा झालेला नाही. चौकशीनंतर संबंधित शाखा अभियंता आणि उपअभियंता यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी नोटीस बजावून खुलासा मागितला आहे. त्यांची चौकशी झाल्यानंतर या दोघांवर कारवाई करण्यात येईल.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



निवेदन क्रमांक-2..........

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांचेच म्हणणे मागविले तर चौकशी कशी होईल? साईट चुकीची निवडली, फाऊंडेशनमध्ये सिमेंटऐवजी दगड व मातीचा वापर केल्यामुळे पाणीसाठा होत नाही. असे असताना चोरांच्या हाती तिजोरीच्या चाव्या देत असाल तर

निष्कर्ष काय निघेल? म्हणून मी मागणी करतो की, महाराष्ट्र राज्याच्या क्वालिटी कंट्रोलमार्फत चौकशी करुन चुकीची साईट निवडून काम केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल का?

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे चौकशी करण्यात येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : आयसीएसई व सीबीएसई शाळांच्या व्यवस्थापनाकडून होत असलेली बेसुमार फी वाढ.

**मु. शी.** : आयसीएसई व सीबीएसई शाळांच्या व्यवस्थापनाकडून होत असलेली बेसुमार फी वाढ याबाबत श्री.कपिल पाटील,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "आयसीएसई व सीबीएसई शाळांच्या व्यवस्थापनाकडून होत असलेली बेसुमार फी वाढ" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा गंभीर आणि जिव्हाळयाचा प्रश्न आहे. या निवेदनामध्ये तीन प्रकारच्या त्रुटी आहेत. व्हिबग्योर हाय आणि बिलाबॉंग हाय या शाळांकडून 75 हजार रुपये इतकी फी वाढ करण्यात आली आहे. पालक संघटनेने माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले होते त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिले होते, त्याचा या निवेदनामध्ये उल्लेख नाही. माननीय हायकोर्टाने पालकांना विश्वासात घेऊन फी वाढ केली पाहिजे असे सांगितले होते, त्याचाही निवेदनामध्ये उल्लेख नाही. या शाळांना शासनाने जमीन दिलेली आहे. त्यामुळे शासनाने या शाळांवर नियंत्रण ठेवले पाहिजे. आयसीएसई व सीबीएसई अभ्यासक्रमाच्या शाळांमधील फी वाढीवर शासन नियंत्रण ठेवणार आहे की नाही? पहिली ते आठवी प्राथमिक शिक्षणाचा भाग असल्यामुळे तो शासनाशी निगडित आहे. त्यामुळे शासनाला याबाबत नियंत्रण ठेवता येईल. शासन या फी वाढीला पायबंद घालणार आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सीबीएसई, आयसीएसई, आयजीआयएसई व आयबी हे केंद्र सरकारचे अभ्यासक्रम आहेत. या अभ्यासक्रमाच्या शाळांना शासनाकडून एन.ओ.सी. दिली जाते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे भरमसाठ फी वाढ करणे, शाळेमध्ये झेंडा वंदन न करणे, राष्ट्रगीत न म्हणणे या संदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. या संदर्भात शासन शिक्षण संचालक (प्राथमिक) व शिक्षण संचालक (माध्यमिक) यांच्या नेतृत्वाखाली समिती नियुक्त करीत आहे. या फी वाढीवर नियंत्रण ठेवता येईल का याचा विचार केला जाणार आहे. राज्य शासनाकडून यापूर्वी मान्यता दिलेल्या व यापुढे मान्यता दिल्या जाणा-या शाळांना या गोष्टी बंधनकारक करीत आहोत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, इतर शाळांमध्ये ॲडमिशन, रिझल्ट्स, सुट्टयांचे वेळापत्रक, राष्ट्रगीत म्हणणे, सुरुवातीची प्रार्थना म्हणणे या संहितेच्या गोष्टींबाबत जी कार्यप्रणाली अवलंबिली जाते त्या कार्यप्रणालीचे पालन या शाळा करीत नाहीत. मराठी विषय या शाळांमधून शिकविला जात नाही. मंत्रीमहोदयांनी यापूर्वी सांगितले होते की, कर्नाटक पॅटर्नप्रमाणे त्रिभाषा सूत्री आणणार आहोत. त्याविषयी काय कारवाई करण्यात आली? या शाळांवर नियंत्रण ठेवले जाणार आहे का?

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-3..........

श्री.हसन मुश्रीफ : या सगळ्या गोष्टींचे पालन या शाळा करीत नाहीत. शासनाने फक्त एन.ओ.सी.दिली की शासनाचे काम संपत होते. असे यापुढे होऊ नये म्हणून शिक्षण संचालक, प्राथमिक व माध्यमिक यांची समिती करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सूचना केली त्याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल व त्यानुसार निकष ठरविण्यात येतील आणि ॲफिडेव्हीट करुन एन.ओ.सी.दिली जाईल. यापूर्वी ज्या शाळांना मान्यता दिली त्याना देखील या गोष्टींचे पालन करावयास लावले जाईल.

-----------------

(नंतर श्री.खर्चे.......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कांदिवली (प.) गोराई रोड येथील विकासकाने म्हाडाकडे व्याजमाफीसंबंधीचा प्रस्ताव सादर करणे

**मु. शी.** : कांदिवली (प.) गोराई रोड येथील विकासकाने म्हाडाकडे व्याजमाफीसंबंधीचा प्रस्ताव सादर करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण यांनी "कांदिवली (प.) गोराई रोड येथील विकासकाने शासनाकडे व्याजमाफीसंबंधीचा प्रस्ताव सादर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : महोदय, म्हाडाच्या वतीने जो विकासक आहे, जो भूखंडधारक आहे त्याचे नाव काय आहे ? त्याच्याकडे एकूण किती थकबाकी आहे ? त्यातील व्याजापोटी असणारी थकबाकी किती ? आणि संबंधित विकासकाने व्याज माफ करण्यासंबंधीचा प्रस्ताव कोणाच्या आदेशाने मंत्रालयात पाठविलेला आहे ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : कांदिवली-गोराई रोड येथील न्यू एमआयजी कॉलनी सन 1965 मध्ये बांधण्यात आली आणि तिचा पुनर्विकास करण्याची सन 1995 मध्ये सोसायटीलाच परवानगी दिली होती. त्या सोसायटीने थकबाकी जवळपास भरलेली आहे परंतु व्याजाची रक्कम अद्याप भरलेली नाही.

श्री. नितीन गडकरी : महोदय, अष्टविनायक सोसायटीच्या विकासकाला ॲडिशनल एफएसआय दिलेला आहे. त्याने म्हाडाचे पैसे दिलेले नाहीत, व्याज भरलेले नाही. तरी देखील त्याने ही रक्कम माफ करण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रालयात पाठविला, तो कोणाच्या आदेशावरुन पाठविला ? हा आदेश सरकारकडून देण्यात आला की म्हाडाला ही प्रेरणा झाली ? गरीब माणसाला एक पैसाही म्हाडा कमी करीत नाही परंतु विकासकाला इतकी मोठी रक्कम माफ करण्याएवढे प्रेम अचानक कसे निर्माण झाले ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : महोदय, यामध्ये विकासकाचे नाव नसून संस्थेने हा विकास केलेला आहे. या सोसायटीने सर्व थकबाकी भरलेली आहे, व्याजाची रक्कम माफ करावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला असून तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. नितीन गडकरी : महोदय, म्हाडाचा सुओमोटो प्रस्ताव आला आहे की, मंत्रालयातून हा प्रस्ताव मागितला आहे ? या संस्थेवरच ही मेहेरनजर होण्याचे कारण काय ? कारण गरीब माणसाला एक पैसाही न सोडणारा विभाग या विकासकाला मात्र 6 कोटी रुपयाची सूट द्यायला निघाले आहे, याचे कारण काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : महोदय, यापूर्वी आपण विडी कामगारांच्या कर्जावरील व्याज माफ केलेले आहे. तसा संस्थेने शासनाकडे व्याज माफीचा प्रस्ताव दिला असून त्यानुसार माफी द्यावी किंवा नाही हा प्रश्न वेगळा आहे.

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : ही संस्था अथवा हा विकासक म्हणजे अल्पभूधारक शेतकरी आहे काय ? कारण ही सोसायटी एक प्रकारे डमी आहे आणि यात काम करणारा एक मोठा बिल्डर आहे आणि त्याने मंत्रालयातून आदेश घेतले की, हे सर्व माफ करणार म्हणून आणि म्हाडाकडून तशी नस्ती तयार करुन घेतली, हे खरे आहे काय ? कोणत्याच प्रश्नाचे उत्तर योग्य प्रकारे मिळत नाही, म्हणून हे निवेदन राखून ठेवावे आणि संपूर्ण माहितीसह उद्या चर्चेला घेण्यात यावे, अशी आमची विनंती आहे.

**उपसभापती** : हे निवेदन मी राखून ठेवतो आणि संपूर्ण माहितीसह मंत्री महोदयांनी सभागृहात उद्या हजर रहावे, हे निवेदन उद्या चर्चेला घेण्यात येईल.

--------------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : ट्रान्झिट कॅम्पसाठी दिलेले भूखंड परत न करणे

**मु. शी**. : ट्रान्झिट कॅम्पसाठी दिलेले भूखंड परत न करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे संजय केळकर, मधुकर चव्हाण यांनी "ट्रान्झिट कॅम्पसाठी दिलेले भूखंड परत न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, 5540 कोटीचा हा भ्रष्टाचार आहे. माननीय मंत्री महोदयांनी कृपया अधिकाऱ्यांकडून दिलेले जसेच्या तसे उत्तर या ठिकाणी देऊ नये. तसेच ज्यांनी हा भ्रष्टाचार केला त्यांना जेलमध्ये टाकण्याची हिंमत ठेवावी, अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. खाजगी विकासकाला ज्यावेळी डेव्हलपमेंट करण्याची परवानगी शासन देते त्यावेळी विशेष बाब म्हणून त्यांना ट्रान्झिट कॅम्पसाठी जागा देण्यात येते अथवा भूखंड दिला जातो. त्या जागेवर विकासक तात्पुरत्या स्वरुपात ट्रान्झिट कॅम्प बांधावेत आणि डेव्हलपमेंट झाल्यानंतर, पुनर्वसनाचा पोर्शन तसेच सेलेबल पोर्शन झाल्यानंतर ट्रान्झिट कॅम्पला जे गाळे दिलेले असतात अथवा जो भूखंड दिलेला असतो तो भूखंड अथवा ते गाळे परत करावयाचे असतात....

यानंतर श्री. गायकवाड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ..

1997 ते 2000 या पाच वर्षाच्या कालावधीसाठी त्यांना हे काम देण्यात आले होते त्याप्रमाणे् त्यांनी काम पूर्ण केले होते तरी सुध्दा आपल्या अधिकाऱ्यांनी शहरातील मोक्याच्या जागी असेलेले आठ भूखंड त्यांना दिले होते आणि 2000 ते 2005 असा पाच वर्षाचा कालावधी त्यांना पुन्हा वाढवून दिला होता. त्यांना जी जमीन देण्यात आलेली आहे ती सगळी जमीन 17 हजार 712 चौरस मिटर्स एवढी आहे. ही जमीन त्या विकासकांनी परत करावयास पाहिजे होती. परंतु ती त्यांनी परत केलेली नाही. एक एकर जमिनीसाठी एक हजार एक रुपया हा दर लावण्यात आलेला आहे. वास्तविक एक लाख रुपये हा दर लावावयास पाहिजे होता. अशा प्रकारे या विकासकांना सवलत देण्यात आली होती त्याचबरोबर त्यांना कोर्टात जाण्याची संधी दिली गेली. कोर्टात गेल्यानंतर या विकासकांनी स्टे मिळवला . कोर्टाने असे सांगितले की, या जमिनीचे भाडे रेडी रेकनरनुसार भाडे वसूल करावयास पाहिजे होते त्याप्रमाणे भाडे वसूल करण्यात आले नाही. त्या ठिकाणी जी जमीन आहे त्या जमिनीतून त्यांना 540 कोटी रुपये मिळणार आहेत.. या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की, ज्या अधिकाऱ्यांनी प्रकरण तयार केले होते त्यांची नावे काय आहेत ? त्याचप्रमाणे विकास झााल्यानंतर ही जमीन विकासकाने परत का केली नाही ? ज्या अधिकाऱ्यांनी त्यांना मदत केलेली आहे त्यांना त्वरित सस्पेन्ड करुन त्यांची सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, याबाबतीत चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल ?

श्री.नितीन गडकरी : या आठ बिल्डर्सच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी करण्यात आल्या होत्या हे खरे आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : पोलीस तक्रार झालेली नाही.

श्री.नितीन गडकरी : या बिल्डर्सच्या विरुध्द वर्षभरापूर्वी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी करण्यात आल्या होत्या .तेव्हा अशा प्रकारे पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी करण्यात आल्या नव्हत्या असे आपले म्हणणे आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : पोलीस स्टेशनमध्ये त्यांच्या विरुध्द तक्रारी करण्यात आलेल्या नव्हत्या.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदरहू विकासकाच्या विरुध्द संबंधित पोलीस स्टेशनमध्ये प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यात आला आहे". माननीय मंत्री महोदयांनी हे निवेदन वाचलेले नाही काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,सदरहू विकासकांबाबत संबंधित पोलीस ठाण्यात प्राथमिक माहिती अहवाल ( एफ.आय.आर.) दाखल करण्यात आलेले आहेत असे निवेदनाच्या पान नंबर दोन वर म्हटलेले आहे. असे असतांना माननीय मंत्री महोदय " नाही " असे उत्तर देत आहेत. तेव्हा सभापती महोदय, याबाबतीत आपण मला संरक्षण द्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

एक सन्माननीय सदस्य (बसून) :माननीय मंत्री महोदयांच्या विरुध्द हक्क भंगाची सूचना दिली पाहिजे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला त्यांना असे विचारावयाचे आहे की, ज्या आठ विकासकांना भूखंड देण्यात आले होते त्यांची नावे काय आहेत ? जे विकासक मंत्रालयामध्ये "लक्ष्मीदर्शन "देतात ते कोण आहेत ? वास्तविक माननीय राज्यमंत्र्यांचा यामध्ये काहीही दोष नाही. कारण त्यांच्याकडे सहया करण्यासाठी फाईल्स येत नाहीत.त्यामुळे ते निरपराध आहेत म्हणूनच या बाबतीत बोलतांना मला देखील संकोच वाटत आहे. माननीय राज्यमंत्र्यांना उत्तर देण्यासाठी उभे केले जात आहे.

**उपसभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांकडून आपण विकासकांची नावे विचारत आहात परंतु तुम्ही ती नावे का सांगत नाहीत ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, या संदर्भात उच्च न्यायालयात केस प्रलंबित आहे. या प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर कारवाई करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रकरणात जे 8 बिल्डर्स कोर्टात गेलेले आहेत त्यांना कोर्टात जाण्यासाठी म्हाडाच्या अधिकाऱ्यांनीच मदत केली आहे .त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे या भूखडाची किमत 5540 कोटी रुपये एवढी आहे. युती शासनाच्या काळात हे भूखंड संक्रमण शिबिरासाठी दिले होते.या विकासकांनी तेथे बिल्डीग्ज बांधल्या होत्या त्यानंतर ही जागा त्यांनी म्हाडाला परत करावयास पाहिजे होती परंतु त्यांनी या जागा म्हाडाला परत न करता स्वत:कडे ठेवून घेतली होती..त्यानंतर सरकारने



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याऐवजी त्यांचा बहुमान केला जातो. त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर सुध्दा माननीय मंत्री महोदय असे सांगत आहेत की, ही पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करण्यात आली नव्हती. निवेदनामध्ये मात्र असे सांगण्यात आले आहे की, त्या विकासकाविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली आहे. एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे. तेव्हा या आठ बिर्ल्डसची नावे काय आहेत ? त्यांच्यावर कृपा दाखविण्यासाठी कोणी आदेश दिले होते ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : आठ भूखंडा पैकी तीन भूखंड ताब्यात घेतले असून पाच भूखंडाच्या संदर्भात कार्यवाही झालेली आहे.

श्री.नितीन गडकरी : मला माननीय मंत्री महोदयांना एक विनंती करावयाची आहे. या ठिकाणी सोसायटीची नावे देण्यात आलेली आहेत. त्या मागे असलेले खरे विकासक वेगळेच आहेत. माननीय राज्यमंत्री या विषयासंबंधी उत्तरे देत आहात खरे म्हणजे आपल्याला काहीही देणे घेणे नाही. त्या ठिकाणी राहणा-या व्यक्तीला 220 चौरस फुटाचे घर मिळाले असून त्याला काहीही देणे घेणे नाही. त्यांना मोफत घर दिले असल्यामुळे त्यांचा विषय संपलेला आहे. यामध्ये माल कमाविणारा खरा विकासक आहे. या सोसायटयांबरोबर करार करणारा हा विकासक आहे. सोसायटीकरिता आम्ही हा प्रश्न विचारलेला नाही. या सोसायटीचा विकासक कोण आहे ? ज्यानें ही इमारत डेव्हलप केली आहे त्याचे नाव काय आहे ? त्याबाबतीत माननीय मंत्री महोदय काहीही बोलत नाहीत. या ठिकाणी जी नावे दिलेली आहेत ती सोसायटयांची आहेत.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : ती माहिती मी सभागृहाच्या पाटलावर ठेवतो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांचा नेमका प्रश्न आहे की, पुनर्वसनासाठी म्हणून म्हाडाच्या मालकीची जी जागा दिलेली होती ती विकासकांनी घरे बांधून दिल्यानंतरही आपल्याच ताब्यात ठेवली आहे, त्याचे कारण काय आहे ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमची मागणी आहे की, हे आठ भूखंड म्हाडाने विकासकाला पर्यायी जागा म्हणजे ट्रान्झिट कॅम्प्स बांधण्यासाठी दिले होते. ते यासाठी की, त्या विकासकांना ज्या इमारतींचा पुनर्विकास करावयाचा होता आणि त्या इमारतीतील मूळ भाडेकरूना पर्यायी जागा देण्यासाठी नव्हती म्हणून त्यांना हे भूखंड देऊन त्यावर त्यांनी ट्रांझिट कॅम्प बांधून त्या भाडेकरूंना तेथे ठेवायचे आणि त्यांची मूळ इमारत पुनर्रचित झाल्यानंतर त्या इमारतीत त्यांना पुन्हा पाठवून द्यायचे आणि मग ही ट्रांझिट कॅम्पसाठी दिलेली जागा म्हाडाला परत करावयाची. परंतु या विकासकांनी प्रत्यक्षात ते भूखंड म्हाडाला परत केलेच नाहीत, अशी जवळपास 540 कोटींची ही जागा आहे ...

**उपसभापती** : ही वस्तुस्थिती असेल तर हे भूखंड ताब्यात घेण्यासाठी तुम्ही, शासनाने वा म्हाडाने काय कारवाई केली आहे वा करणार आहात ते राज्यमंत्र्यांनी सांगावे.

श्री. मधुकर चव्हाण : पण आता ते लोक कोर्टात गेले आहेत ...

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, त्या विकासकांची नावे या निवेदनात आपण दिलेली आहेत आणि ज्या संस्थांचा त्यांनी पुनर्विकास केला त्यांचीही नावे यात आहेत.

श्री. नितीन गडकरी : आम्हाला त्या व्यक्तिंची नावे पाहिजेत. उदा. संगम नगर सहकारी गृहनिर्माण संस्था आहे तिचे विकासक मे.रणजित नाईक ॲण्ड असो. आहे. तर त्या विकासक कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर वा चेअरमन कोण आहेत ? सभापती महोदय, या माणसांनी म्हाडाला फसविले आहे. त्यांच्या विरोधात म्हणूनच एफआयआर पोलीस ठाण्यात दाखल केला गेलेला आहे. म्हाडातीलच भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्यांना आता कोर्टात जाण्याचा सल्ला दिला आहे. खरे तर या विकासकांनी म्हाडाचे भूखंड म्हाडाला परत करायला पाहिजे होते पण ते त्यांनी हडपले आहेत. जवळपास 540 कोटीचे हे भूखंड आहेत. पण त्यांच्यावर आपण कारवाई करीत नाही. विकासकावर आणि त्याला साथ देणाऱ्या म्हाडातील अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करीत नाही. त्यांना आपण सुटे का सोडत आहात ?

...... जीजी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, या बाबत चौकशी करून कारवाई करू आणि ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

**उपसभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांनी हे लक्षात घ्यावे की, सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्याप्रमाणे शासनातील अधिकारी आणि विकासक हे संगनमत करून शासनाचे म्हणजे म्हाडाचे भूखंड हडप करत असतील तर ही अतिशय गंभीर बाब आहे. या लोकांना फौजदारी स्वरूपाचे गुन्हे तुम्ही दाखल करावेत आणि ज्या अधिकाऱ्यांनी या विकासकांना यासाठी मदत केली आहे त्यांच्यावरही तातडीने काय कारवाई केली आहे हे सदनाला तुम्ही उद्यापर्यंत सांगावे. मात्र याबाबतची कारवाई ही आजच झाली पाहिजे.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : होय.

***

...... जीजी 3 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या 103 शाळांत मागील वर्षीच्याच प्रश्नपत्रिका तारखा बदलून या वर्षीच्या परीक्षे-साठी देणे.

**मु. शी.** : कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या 103 शाळांत मागील वर्षीच्याच प्रश्नपत्रिका तारखा बदलून या वर्षीच्या परीक्षे-साठी देणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, मधुकर चव्हाण व रामनाथ मोते यांनी " कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या 103 शाळांत मागील वर्षीच्याच प्रश्नपत्रिका तारखा बदलून या वर्षीच्या परीक्षे साठी देणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... जीजी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांचे निवेदन (क्र.6) नंतर...)

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, कल्याण तालुक्यातील हा विषय आहे. सहामाही परीक्षेच्या प्रश्नपत्रिका आहेत त्या आधीच्या वर्षीच्याच अगदी जशाच्या तशा, केवळ तारखा बदलून विद्यार्थ्यांना दिलेल्या आहेत. या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे की, 97 शाळांवर या संदर्भात कारवाई केलेली आहे, त्यांना नोटीसा पाठविल्या आहेतक. परंतु या निवेदनात असेही म्हटले आहे की, "... पुरवठादाराने नव्या प्रश्नपत्रिका न छापता मागील वर्षीच्याच प्रश्नपत्रिका छापून तारीख व वर्ष बदलून प्रश्नपत्रिकांचा पुरवठा केला असल्याचे निदर्शनास आले आहे." तेव्हा हे पुरवठादार कोण आहेत आणि त्यांच्यावर कोणत्या प्रकारची कारवाई आपण केली आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, कल्याण तालुक्यात 103 शाळांपैकी 97 शाळांमध्ये या परीक्षा घेण्याची कारवाई झालेली नाही. त्यांनी गेल्या वर्षीच्याच प्रश्नपत्रिका त्यांची तारीख व वर्ष बदलून घेऊन छापून घेऊन त्यांचा पुरवठा या शाळांना केलेला आहे. या प्रकरणी 97 मुख्याध्यापक, 7 केंद्र प्रमुख आणि 7 विस्तार अधिकारी यांची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे, त्यांच्यावर याबाबतची कारवाई सुरू आहे. त्याशिवाय या प्रश्नपत्रिकांची छपाई करणारा खाजगी छपाईकार श्री.देविदास भोंबे, रा.उल्हासनगर यांची एक वेतनवाढ रोखण्याचा निर्णय घेतला आहे.

***

( यानंतर श्री. सरफरे ....एचएच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान मंजूर करण्यास शासनाने दिलेला नकार

मु.शी. : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांना वेतन व वेतनतर अनुदान मंजूर करण्यास शासनाने दिलेला नकार याबाबत श्री व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी.टी. देशमुख, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे, प्रा. बी. टी. देशमुख, यांनी "आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांना वेतन व वेतनतर अनुदान मंजूर करण्यास शासनाने दिलेला नकार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, 26 मार्च 2008 रोजी एक प्रश्न विचारण्यात आला होता त्यावेळी आदिवासी भागातील, दुर्गम भागातील, नक्षलग्रस्त भागातील 29 शाळांच्या अनुदानाच्या प्रश्नाबाबत माननीय मुख्य मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले. ते असे की, "मूळ जी.आर. काढला आहे त्यावर आधारीत राहून या संदर्भातील कारवाई ताबडतोब केली जाईल." तेव्हा माझा असा प्रश्न आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तराला अधीन राहून आपण कारवाई करणार काय? त्यावेळी तुकडयांचा प्रश्न यामध्ये अंतर्भूत नव्हता. आदिवासी भागामधील काही तुकडया निकषपात्र ठरल्या आहेत. परंतु उपसंचालक यांचेकडून प्रस्ताव आलेला नाही. आपण तो प्रस्ताव मागवून त्या आधारे त्या तुकडयांना अनुदान देणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये उत्तर देतांना आदिवासी शाळांचे अनुदान देण्याचा निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येईल असे सांगितले होते. माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे तुकडयांबाबतची माहिती घेऊन निश्चितपणे त्या तुकडयांना अनुदान देण्याबाबत विचार करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने विविध मागण्यांसाठी केलेले आंदोलन

मु.शी. : विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने विविध मागण्यांसाठी केलेले आंदोलन याबाबत श्री व्ही. यू. डायगव्हाणे, वि.प.स. यां□ी दिलेली □ियम 93 अ□्वये सूच□ा

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे यां□ी "विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने विविध मागण्यांसाठी केलेले आंदोलन" या विषयावर □ियम 93 अ□्वये जी सूच□ा दिली होती, तिला अ□ुज्ञे□ू□ा आप□ □िदेश दिल्याप्रमा□े मला □िवेद□ □रावयाचे आहे. □िवेद□ाच्या प्रती सदस्यां□ा अ□ोदरच वितरीत □ेलेल्या असल्या□े मी हे □िवेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : □िवेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□्यात आले आहे.

□िवेद□

( प्रेस : येथे सोबतचे □िवेद□ छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, नागपूर विभागात आणि अमरावती विभागातील शिक्षकांना वर्षभर वेतन मिळण्यास विलंब झाला. त्याबाबत अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यामुळे हा वेतनाचा प्रश्न आणखी किती वेळा विचारावा हा प्रश्न आहे? याठिकाणी बी.डी.एस. ची पध्दत अस्तित्वात असल्यामुळे शिक्षकांना अनियमित वेतन मिळत आहे. ट्रेझरी ऑफिसर, शिक्षणाधिकारी आणि त्यांच्या कार्यालयाला ही पध्दत अजून समजलेली नाही. आतापर्यंत जे काही झाले असेल ते सर्व गंगेला मिळाले. आता आपण 11 महिन्यांचे एकदम अनुदान मंजूर करीत आहात. त्याबद्दल शालेय शिक्षण विभागाचे मला अभिनंदन केले पाहिजे. वर्षभराच्या पगाराची व्यवस्था आपण एका महिन्यात करणार आहात. परंतु यापुढे सुध्दा शिक्षकांना नियमितपणे पगार मिळणार नाही. ही बाब लक्षात घेऊन एप्रिल महिन्यापासून ही बी.डी.एस. ची पध्दत आपण दुरुस्त करणार काय? कारण ही बिमारी दुरुस्त होणार नसेल तर आपली जुनीच पध्दत चालू ठेवावी. या संदर्भात यापुढे मिळणारे सुधारीत वेतन मिळण्यास विलंब होणार नाही यासाठी आपण काय दक्षता घेणार आहात?

दुसरा प्रश्न असा आहे की, श्रीमती सुनिता दशरथ बारई या विशाल हायस्कूल, तुमसर, जिल्हा भंडारा या शाळेमध्ये शारीरिक शिक्षिका म्हणून दिनांक 1.7.1999 पासून कार्यरत आहेत. त्यांना शिक्षण उपसंचालकांकडून 1.7.99 पासून मान्यता मिळाली आहे. व त्यांचे वेतन काढण्याचे निदेश देण्यात आले. परंतु 1.7.1999 पासून त्यांचे वेतन शाळेमधून काढण्यात येत नाही. त्यामुळे या महिला शिक्षिकेच्या कुटुंबियांवर उपासमारीची पाळी आली आहे. त्याकरिता दिनांक 7 एप्रिल 2008 पासून त्या आमरण उपोषणाला बसणार आहेत. माझी याबाबत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की. येत्या आठ दिवसात आपण त्यांचे वेतन सुरु करण्याची व्यवस्था करणार काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शिक्षकांना नियमितपणे वेतन मिळण्याची व्यवस्था एप्रिल महिन्यापासून केली जाईल. कोणत्याही प्रकारे एक महिन्याच्या पुढे वेतन गेले असे यापुढे पुन्हा होणार नाही. तसेच, माननीय सदस्यांनी एक महिला शिक्षिका उपोषणाला बसणार आहेत, त्याबाबत प्रश्न विचारला...

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय,...

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी एप्रिल महिन्यापासून नियमितपणे वेतन मिळेल अशी व्यवस्था करु असे सांगितले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.व्ही.यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, श्रीमती सुनिता बारई या महिला शिक्षिकेविषयी मी प्रश्न विचारला आहे. या महिला शिक्षिकेला शारीरिक शिक्षिका म्हणून दिनांक 1.7.1999 पासून मान्यता मिळाली आहे...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, महिला शिक्षिकेच्या बाबतीत माहिती घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल. तसेच, वेतन विलंबाने होण्याचे प्रकार यावर्षी होणार नाहीत. महिन्याच्या महिन्याला वेतन मिळण्याची व्यवस्था केली जाईल.

श्रीमती नितीन गडकरी : सभापती महोदय, आता काळ बदलला आहे. सर्व ठिकाणी इलेक्ट्रॉनिक सिस्टीमचा वापर सुरु झालेला आहे. याठिकाणी सुध्दा इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर सिस्टीमव्दारे डायरेक्ट बँकेच्या अकाऊंटव्दारे पगार देण्याची व्यवस्था आपण कां करीत नाही? आज शिक्षण विभागामध्ये वेळेवर पगार मिळण्यासाठी ट्रेझरी विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना नमस्कार करावे लागतात. एखादे बिल मंजूर करुन घ्यावयाचे असेल तर ट्रेझरी कार्यालयामध्ये जाऊन सर्वांचीच पूजा करावी लागते. तेव्हा नवीन संगणकीकरणाची पध्दत यामध्ये अंमलात आणून नियमित वेतन देण्याची व्यवस्था कां करण्यात येत नाही?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे यापुढे महिन्याच्या महिन्याला वेतन दिले जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

पृ.शी. : लोणारी समाजाचा भटक्या जमातीमध्ये समावेश करणे

मु.शी. : लोणारी समाजाचा भटक्या जमातीमध्ये समावेश करणे याबाबत श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. धर्मरावबाबा आत्रम ( भटके विमुक्त कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "लोणारी समाजाचा भटक्या जमातीमध्ये समावेश करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना आगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, लोणारी हा समाज ब्रिटीश साम्राज्याचा बळी ठरला आहे. ब्रिटीश येण्यापूर्वी हा समाज आपला परंपरागत व्यवसाय गाढव व खेचरे यावरुन मीठ, चुना, कोळसा, लाकूड या वस्तू वाहून नेण्याचे काम करीत असे. परंतु ब्रिटीशांनी त्यांच्या धंद्याला विरोध करीत मीठ, चुना व कोळश्यावर कर लावून त्यांच्या या धंध्यावर बंदी आणली. तेव्हापासून हा समाज दारिद्रयामध्ये पिचला गेला आहे. हा समाज वर्षभर भटकंती करीत नाही असे तांत्रिक कारण देऊन राज्य मागासवर्ग आयोगाने या समाजाचा भटक्या जमातीमध्ये समावेश करण्यास नकार देऊन त्यांच्यावर अन्याय केला आहे. तेव्हा या समाजाची मागणी किंवा त्यांचा इतिहास पुन्हा एकदा नीट तपासून त्यांचा समावेश भटक्या जमातीमध्ये करणार काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:05

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, लोणारी समाज हा भटक्या जमातीमध्ये येत नाही अशा प्रकारचा अहवाल मागासवर्गीय आयोगाकडून दोन वेळा प्राप्त झालेला आहे. यासंदर्भात आपण विधाते समिती सुध्दा स्थापन केली होती. त्या समितीने देखील असा अहवाल दिलेला आहे की, हा समाज भटक्या जमातीमध्ये बसत नाही. म्हणून आपण त्यांचा इतर मागासवर्गीय समाजामध्ये समाविष्ट केलेले आहे. परंतु सन्माननीय सदस्यांची सूचना आहे की, याबाबतीत पुन्हा एकदा अभ्यास झाला पाहिजे. तर त्यादृष्टीकोनातून ही बाब परत एकदा मागासवर्गीय आयोगाकडे पाठविण्यात येईल आणि त्यांच्याकडून अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर निर्णय घेऊ.

-----

. . . .2आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विडी कामगार वसाहत काबरा नगर येथील रहिवाशांना थकबाकी भरण्यासाठी मुदतवाढ मिळणे

मु.शी. : विडी कामगार वसाहत काबरा नगर येथील रहिवाशांना थकबाकी भरण्यासाठी मुदतवाढ मिळणे याबाबत सर्वश्री श्रीकांत जोशी,पांडुरंग फुंडकर,पाशा पटेल,नितीन गडकरी वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पांडुरंग फुंडकर,पाशा पटेल,नितीन गडकरी यांनी "विडी कामगार वसाहत काबरा नगर येथील रहिवाशांना थकबाकी भरण्यासाठी मुदतवाढ मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ SBT/ KTG/ 16:05

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुळामध्ये ही नियम 93 अन्वये सूचना यासाठी देण्यात आली होती की, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाअंतर्गत विडी कामगार वसाहत काबरा नगर येथील रहिवाशांना थकबाकी भरण्यासाठी दि.31-3-2007 पर्यंत मुदत वाढ मिळावी. अशा प्रकारची मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय शासनाने 2007 मध्ये घेतला. परंतु त्या विडी कामगारांना हा निर्णय दि.26-3-2008 रोजी कळविलेला आहे. म्हणजे हा निर्णय एक वर्षापूर्वीच घेतला, परंतु तो आता कळविला आणि असे सांगण्यात आले की, तीन दिवसाच्या आत पैसे भरण्यात यावेत. परंतु हा विडी कामगार तीन दिवसाच्या आत पैसे कसा भरणार आहे ? म्हणून माझी शासनाकडे मागणी आहे. शासनाने त्यांना हा निर्णय उशिरा कळविल्यामुळे ते पैशाची व्यवस्था करु शकलेले नाहीत. त्यामुळे शासन त्यांना पैसे भरण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देणार आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, एकंदर आतापर्यंत 242 कामगारांनी पैसे भरलेले आहेत आणि अजून 58 कामगारांनी पैसे भरलेले नाहीत. त्यांना पैसे भरण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल.

-----

. . . .2 आय-4



पृ. शी. : राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागांतर्गत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रिक्त असलेली विविध पदे.

मु. शी. : राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागांतर्गत रिक्त असलेली विविध पदे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते,संजय केळकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते,संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी यांनी "राज्याच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागांतर्गत रिक्त असलेली विविध पदे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 आय-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागामध्ये अधिकाऱ्यांची जी रिक्त पदे आहेत, त्या संदर्भातील हा विषय आहे. खरेच ही पदे रिक्त आहेत किंवा नाही याबाबतीत शासनाने

जे उत्तर दिलेले आहे, त्यातून असे स्पष्ट होते की, संचालक स्तरावरील 5 पदे रिक्त आहेत. सह संचालक स्तरावरील 10 पदे रिक्त आहेत, उप संचालक स्तरावरील 4 पदे रिक्त आहेत, शिक्षणाधिकाऱ्यांच्या बाबतीत जवळजवळ 49 पदांची मागणी करण्यात आलेली आहे. अन्य जवळजवळ 306 पदे रिक्त आहेत. त्यामुळे शासनाच्या शिक्षण क्षेत्रातील ज्या चांगल्या योजना आहेत, त्या योजना राबविणारी यंत्रणा, अधिकारी उपलब्ध नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने या योजनांची अंमलबजावणी होऊ शकत नाही. म्हणून ही सर्व रिक्त असलेली पदे लवकरात लवकर भरण्याच्या अनुषंगाने शासनाने तातडीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी अनुभव प्राप्त अधिकारी नसल्यामुळे पदोन्नती देऊ शकत नाही असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. कारण आपल्याकडे केडरमध्ये अनुभव असलेला एकही अधिकारी नाही. त्यामुळे आपण अनुभवाच्या संबंधातील अट शिथिल करुन त्यांना पदोन्नती देणार आहात काय ? हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, इतर जी रिक्त पदे आहेत, ज्या पदांबाबतीत आपल्याला एम.पी.एस.सी.कडून संमती घेण्याची आवश्यकता नाही अशी पदे लवकरात लवकर, कारण "लवकरात लवकर" असे म्हटले तरी वर्षानुवर्षे आपले निर्णय होत नाही. त्यामुळे एक महिन्याच्या आत ही सर्व पदोन्नतीची पदे भरली जातील काय ? याबाबतीत शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, शिक्षण संचालकापासून विधी अधिकाऱ्यापर्यंत 572 पदे रिक्त आहेत. शिक्षण संचालक, शिक्षण सह संचालक आणि शिक्षण उप संचालक ही पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. शिक्षणाधिकारी आणि त्याखालील प्राचार्य, प्रशासन अधिकारी इ.पदे 50 टक्के सरळसेवेने आणि 50 टक्के पदोन्नतीव्दारे भरावयाची आहेत. यामध्ये आपण पदोन्नतीने 188 पदे भरत आहोत आणि पदोन्नतीने जी पदे भरावयाची आहेत, त्याबाबतीत आपल्याकडे 223 जणांची यादी तयार आहे आणि बाकीची 50 टक्के जी पदे भरावयाची आहेत, ती एम.पी.एस.सी.च्या संमतीने भरावयाची आहेत आणि त्यासंदर्भात आपण त्यांना पत्र लिहून कळविलेले आहे.म्हणून लवकरात लवकर ही पदे भरण्यात येतील. तसेच उप संचालकापासून .....

. . . .2 आय-6



श्री.हसन मुश्रीफ . . . .

शिक्षण संचालक या पदासाठी पाच वर्षाचा अनुभव असावा अशी जी अट आहे, ती तीन वर्षाची करण्यात यावी यासंबंधीचा प्रस्ताव आमच्या विचाराधीन आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याबाबतीत एक महिन्याच्या आत निर्णय होईल काय?

(उत्तर नाही)

-----

. . . .2 आय-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ. शी. : दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरही डी.एड. विद्यार्थ्यांना पुन्हा इंटर्नशिप करण्याची केलेली सक्ती

मु. शी. : दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरही डी.एड. विद्यार्थ्यांना पुन्हा इंटर्नशिप करण्याची केलेली सक्ती

याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे वि.प.स.
यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे यांनी "दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतरही डी.एड. विद्यार्थ्यांना पुन्हा इंटर्नशिप करण्याची केलेली सक्ती" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .2 आय-8

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पूर्वी डी.एड.चा अभ्यासक्रम एक वर्षाचा होता. नंतर तो दोन वर्षाचा करण्यात आला. परंतु देशातील इतर सर्व राज्यांमध्ये डी.एड.झाल्यानंतर दहा दिवस ते तीन महिने इतक्या कालावधीसाठी इंटर्नशीप करावी लागते. असे असताना महाराष्ट्रामध्ये आता दोन वर्षे त्यांनी ट्रेनिंग घेतल्यानंतरही सहा महिन्याची इंटर्नशिप करण्याबाबत सक्ती करण्याचा निर्णय 1 फेब्रुवारी 2008 पासून शासनाने घेतलेला आहे.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.........

हा निर्णय शासनाने 1 फेब्रुवारी,2008 पासून घेतलेला आहे. शासनाच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करुन आता हे विद्यार्थी स्थायिक होऊ पाहत आहेत. त्यांना आता नोकरी करावयाची आहे. अशा वेळी त्यांच्यावर इंटर्नशीपचे बंधन शासनाने लादलेले आहे. तसेच या इंटर्नशीपचा कालावधी सहा महिने ठेवून त्यांना एक हजार गुणांची अट देखील घातलेली आहे. विद्यार्थ्यांचे हे सर्व मार्क्स तेथील अध्यापक, मुख्याध्यापक व केंद्र प्रमुख यांच्या हातात आहेत. दोन वर्षाचे शिक्षण घेतल्यानंतर सहा महिने इंटर्नशीप पूर्ण करुन देखील एक हजार गुण न मिळाल्यास त्यांचे संपूर्ण वर्षच वाया जाणार आहे .त्यांनी घेतलेल्या डी.एडच्या अभ्यासक्रमाचा त्यांना काहीही उपयोग होणार नाही. यासंबंधी विद्यार्थी परिषदेचे एक शिष्टमंडळ माननीय मंत्री महोदयांकडे गेले होते. त्यांच्याकडून माननीय मंत्री महोदयांच्या भेटीमध्ये कोणती मागणी करण्यात आली आहे व त्यावर शासनाने काय निर्णय घेतलेला आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या सभागृहामध्ये या पूर्वी देखील डी.एडच्या इंटर्नशीप बाबत बरीच चर्चा झाली होती. दोन वर्षाचा डी.एडचा अभ्यासक्रम झाल्यानंतर सहा महिन्याची इंटर्नशीप शासनाने लागू केलेली आहे. या संदर्भात मी पूर्वी देखील सांगितले होते की, आज शिक्षणाचा दर्जा घसरलेला आहे. त्यामुळे सहा महिन्यामध्ये इंटर्नशीप पूर्ण करुन राज्यामध्ये चांगले शिक्षक तयार होतील. ही सर्व जबाबदारी आमची आहे. एखाद्या रस्त्याला खड्डा पडला तर आपल्याला तो बुजवता येतो, किंवा पाण्याची सोय नसल्यास ते देखील लांबून आणता येते. मात्र विद्यार्थ्यांच्या आयुष्यात पडलेला खड्डा आपल्याला बुजवता येणार नाही. या साठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने लागू केलेली इंटर्नशीप आता रद्द होणार नाही. यामध्ये ज्याकाही त्रुटया आहेत त्या दूर करण्यासाठी, विधानसभेमधील सन्माननीय सदस्यांची एक संयुक्त समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. या संयुक्त समितीमध्ये, इंटर्नशीप लागू करण्यासंदर्भात ज्या काही त्रुटया असतील त्या सर्व त्रुटया दूर करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय,हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. या विषयाला इतके लाइटली घेऊ नये अशी माझी विनंती आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी आता जे निवेदन केले आहे, त्यामुळे माझ्या ह्दयाला देखील आता खड्डे पडले आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, संपूर्ण देशामध्ये, कोठल्याही राज्यामध्ये डी.एडनंतर सहा महिन्याची इंटर्नशीप लागू केलेली नाही. अशा प्रकारची इंटर्नशीप असावी की नसावी याबाबत राज्यामध्ये सध्या चर्चा सुरु आहे. आपण खड्डे बुजवित आहात. शिक्षण क्षेत्राचे कल्याण करण्याकरिता नवीन योजना राबवित आहात. मी आपणास सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्री महोदय, प्रा. वसंत पुरके यांचे नाव इतिहासामध्ये लिहिले जाणार आहे. आपल्यावर राज्यामधील शिक्षक त्यांच्यावर खूष आहेत. ते माननीय मंत्री महोदयांचा फोटो लावून त्याची पूजा करतात. माननीय मुख्यमंत्री महोदय हे देखील त्यांच्यावर अत्यंत खूष आहेत. आपण जो निर्णय घेत आहात तो लोकांपर्यंत योग्य रीतीने पोहचत नाही. आपले सहकारी देखील आपली बदनामी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छिता की, डी.एडच्या विद्यार्थ्यांवर सहा महिन्याची इंटर्नशीप लादणे अन्यायकारक होणार आहे. भारतामधील एकाही राज्यामध्ये अशा प्रकारची इंटर्नशीप लागू नाही.

सभापती महोदय, आपण मला माफ करावे पण मी आपणास सांगू इच्छितो की, इंटर्नशीप लागू केल्यामुळे, राज्यामध्ये अतिशय वाईट चित्र निर्माण झालेले आहे. इंटर्नशीपचे गुण मॅनेजमेंट व शिक्षकांच्या हातात असल्यामुळे,विशेषत: डी.एड कॉलेजमधील विद्यार्थीनींच्या शोषणाच्या अनेक कहाण्या आम्ही ऐकलेल्या आहेत. हे योग्य नाही. शिक्षण संस्था चालवणारे अनेक संस्थाचालक हे व्यावसायिक किंवा धंदेवाईक आहेत हे आपल्याला माहीत आहे. या लोकांच्या हाती आपण कोलीत दिले तर महिलांचे शोषण होण्याची शक्यता आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्यामुळे माझी आपणास विनंती आहे की, या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांना व काही सन्माननीय सदस्यांना बोलावून आमच्या भावना आपण ऐकून घ्याव्यात व यामधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा.

यानंतर श्री. बरवड........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

ही फारच डेलीकेट मॅटर आहे. आमचे शोषण करण्याचा कसा प्रयत्न करीत आहेत यासंदर्भात माझ्याकडे काही मुलींनी तक्रार केली. ही बाब चांगली नाही असे मला वाटते. यासंदर्भात आपण एक बैठक बोलवून त्यातून काही तरी मार्ग काढावा अशी माझी विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, इंटर्नशीप महाराष्ट्रात आणि अन्य एका राज्यामध्ये सुरु झाली. हा निर्णय 2004 चा आहे परंतु अंमलबजावणी यावेळी करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेब नेहमीच विद्यार्थ्यांच्या वतीने भूमिका घेतात. मुलींना दुसरीकडे देणार नाही. त्या तिथेच राहणार. तसेच त्यांना एस.टी.चा पास मिळेल याची दक्षता घेत आहोत. येत्या शैक्षणिक वर्षात त्यांचा भरती प्रक्रियेमध्ये सहभाग राहील. 15 एप्रिलपर्यंत ज्यांचे अर्ज आलेले असतील त्यांचा समावेश होणार आहे. कोणावरही अन्याय होणार नाही. 1000 पैकी 50 टक्केच गुण मिळवावयाचे आहेत. त्यांना हमखास 50 टक्के गुण मिळतील याची काळजी शासन घेईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, डी.एड.चा कोर्स सुरु झाला त्याच्या माहितीपत्रकामध्ये दोन वर्षाचा कोर्स असा उल्लेख केलेला आहे. नोव्हेंबर, 2007 ते एप्रिल, 2008 या दरम्यान ही इंटर्नशीप करावी असे म्हटले आहे. या दरम्यान आपल्या शाळा किती चालतात, काय चालतात आणि त्यामध्ये 6 महिने शाळा चालू शकते काय हे आपल्याला चांगले माहीत आहे. विधानसभा सभागृहामध्ये असे स्पष्ट आश्वासन देण्यात आले की, सभागृहाच्या सदस्यांची समिती नेमून याबाबतचा विचार केला जाईल. हा दोन वर्षाचा कोर्स आहे. जूनमध्ये परीक्षा होते. निकाल येऊन सहा महिने झालेले आहेत. म्हणजे हा डी.एड.चा कोर्स साडेतीन वर्षाचा होतो. हा कोर्स साडेतीन वर्षाचा करण्याची गरज आहे काय ? जो कोर्स दोन वर्षात संपावयास पाहिजे तो साडेतीन वर्षेपर्यंत लांबत आहे. ज्यांनी दोन वर्षापूर्वी ॲडमिशन घेतलेली आहे त्यांना नवीन समितीमध्ये चर्चा होईल त्याप्रमाणे ते लागू राहील. परंतु ज्यांचे निकाल लागून सहा महिने झालेले आहेत त्यांना हे कशाला लागू करीत आहात ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या एन.सी.टी.ईच्या नॉर्म्सप्रमाणे हे केलेले आहे. यामध्ये किमान 6 महिने आणि अधिकाधिक 12 महिने इंटर्नशीप करावी अशा गाईडलाईन्स

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

आहेत. यामध्ये फक्त अडीच वर्षे होतात. परीक्षेपासून आणि निवड प्रक्रियेपासून कोणालाही वंचित ठेवले जाणार नाही अशा पध्दतीने निर्णय घेतला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : देशाच्या किती राज्यांमध्ये सहा महिन्यांची इंटर्नशीप लागू आहे ?

प्रा. वसंत पुरके : एका राज्यामध्ये इंटर्नशीप सुरु झालेली आहे. आपण किमान 6 महिन्यांचा कालावधी स्वीकारलेला आहे. कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. कर्नाटक राज्यामध्ये इंटर्नशीप सुरु आाहे. इतर राज्यांमध्ये सुरु करण्याचा प्रयत्न आहे.

श्री. रामनाथ मोते : डी.एड. झालेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा, त्यांना प्रशासकीय बाबी समजाव्यात यादृष्टीकोनातून इंटर्नशीपचा हा उपक्रम सुरु केलेला आहे. परंतु आज अनेक शिक्षक चार ते पाच वर्षे नोकरी करीत आहेत. जे मागावर्गीय आहेत आणि केवळ आरक्षणाच्या बिंदुनुसार ज्यांच्या नेमणुका झालेल्या आहेत त्यांनी पत्राव्दारे डी.एड. पूर्ण केलेले आहे आणि चार-पाच वर्षाचा अनुभव असून सुध्दा त्यांना आंतरवासितेचा उपक्रम लागू केलेला आहे. त्यांचा पगार बंद झाला आणि त्यांना आंतरवासिता लागू केलेली आहे. ज्यांना पाच सहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आहे त्यांना हे कशासाठी लागू करीत आहात ? माननीय मंत्रिमहोदयांनी असे विधान केले की, ज्या शिक्षकांनी अन्य ठिकाणी नोकरीसाठी अर्ज केलेले आहेत त्यांच्या अर्जाचा विचार करण्यात येईल. फक्त त्यांनी आंतरवासितेचा कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना नेमणुका देता येऊ शकतील. अनेक जिल्हा परिषदांनी अनेक जिल्ह्यामध्ये चेकलिस्ट लावलेल्या आहेत. त्या ठिकाणी 700 ते 800 पदे भरत आहेत. ज्यांचा आंतरवासितेचा कालावधी चालू आहे त्यांना वगळलेले आहे. यासंदर्भात सर्व जिल्हा परिषदांमध्ये आंतरवासितेचा कालावधी पूर्ण करण्याच्या अटीवर त्यांना नेमणुका देणार आहात काय ?

यानंतर श्री. खंदारे ...

प्रा.वसंत पुरके : सध्या ज्यांचे डी.एड.पूर्ण व्हावयाचे आहे, आता ज्यांचे पत्राद्वारे प्रशिक्षण सुरु आहे त्यांना हा निर्णय लागू राहील. याबाबतचा कंसेप्ट अद्याप क्लीअर व्हायचा आहे. सभापती महोदय, यासंदर्भात माननीय सदस्यांबरोबर बसून चर्चा करुन यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/

**पृ. शी.** : नागपूर महानगरपालिकेच्या नगरसेवकांना स्वेच्छा निधीतून अविकसित भागामध्ये विकासाची कामे करण्यास केलेली मनाई

**मु. शी.** : नागपूर महानगरपालिकेच्या नगरसेवकांना स्वेच्छा निधीतून अविकसित भागामध्ये विकासाची कामे करण्यास केलेली मनाई याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि.प.स. यांनी "नागपूर महानगरपालिकेच्या नगरसेवकांना स्वेच्छा निधीतून अविकसित भागामध्ये विकासाची कामे करण्यास केलेली मनाई" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय. नागपूर शहरातील अनधिकृत लेआऊटमध्ये खासदारांना, आमदारांना स्थानिक विकास निधीची कामे करता येतात. परंतु नगरसेवकांना काम करता येत नाही. महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांमध्ये अशाप्रकारच्या लेआऊटमध्ये आमदारांना, खासदारांना, नगरसेवकांना अशा तिन्ही लोकप्रतिनिधींना विकासाची कामे करता येतात. केवळ नागपूर महापालिकेसंबंधी तत्कालीन पालकमंत्री श्री.रणजित देशमुख यांनी आदेश लागू केले होते. त्या भागातील इमारतींवर महानगरपालिका कर घेते, भाडयाच्या बिलाचे पैसे घेते, पण नगरसेवकांना पाण्याच्या हापशाचे काम करता येत नाही. खासदारांना, आमदारांना तेथे काम करण्याची अनुमती असेल तर नगरसेवकांना तशी अनुमती सरकार देईल काय ? माननीय मुख्यमंत्र्यांची महापालिकेच्या महापौरांबरोबर चर्चा झाली त्यावेळी खासदारांना व आमदारांना परवानगी असेल तर तशी परवानगी नगरसेवकांना द्यावी व तसे आदेश काढावेत असे माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री.बेंजामिन, श्री.संगीतराव या अधिका-यांसमोर सांगितले आहे. पण या विभागाचे कक्ष अधिकारी खूप हुशार आहेत. प्रत्येक वेळी नागपूर महानगरपालिकेचे फाईल इकडे तिकडे फिरवितात. ते या आदेशाच्या विरुध्द नोट तयार करतात. त्या महानगरपालिकेला त्रास देण्याचे त्यांनी ठरविले आहे. म्हणून त्यांना त्या पदावरुन काढून टाकावे. महाराष्ट्रात कोणत्याही महानगरपालिकेत अशी बंदी नाही. सांगली, पुणे, नाशिक या महानगरपालिकेच्या क्षेत्रात अशी कामे करण्याला बंदी नाही. राज्यातील इतर महानगरपालिकांना एक न्याय आणि नागपूर महानगरपालिकेला दुसरा न्याय असा भेदभाव का केला जात आहे ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अनधिकृत भागात नगरसेवकांना स्थानिक विकास निधीतून विकासाची कामे करण्यासाठी खर्च करण्याची परवानगी मिळण्याचा मुद्दा मांडलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. त्या अनुषंगाने नस्ती तयार करुन माननीय मुख्यमंत्र्यांच्या परवानगीने यामध्ये दुरुस्ती करीत आहोत. त्यांनी अर्धा तास चर्चा व लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय उपस्थित केला होता त्यावेळी सुध्दा मी असे उत्तर दिले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले असेल तर निश्चित प्रकारे....

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : आपण माननीय मुख्यमंत्र्यांच्यावतीने सभागृहात उत्तर देत आहात. महाराष्ट्रातील एकाही महानगरपालिकेसाठी हा कायदा नाही. केवळ नागपूर महानगरपालिकेला छळण्याचा हा प्रकार आहे. एकाच महानगरपालिकेच्या हात धुवून मागे का लागला आहात ?

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांच्या म्हणण्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील. अनधिकृत भागामध्ये सुध्दा कामे करण्यास हरकत नाही. परंतु ही कामे करीत असताना टाऊन प्लॅनिंगचे उल्लंघन होऊ नये हा त्यात महत्वाचा भाग आहे.

श्री.नितीन गडकरी : पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत टाऊन प्लॅनिंगचे उल्लंघन होत नाही ? सांगली, ठाणे, मुंबई याठिकाणी उल्लंघन होत नाही काय ? तेथे का चौकशी करीत नाही ? सर्व महानगरपालिका क्षेत्रात अशी कामे करण्यास बंदी करण्याचा निर्णय घ्यावा मी आपले अभिनंदन करतो.

श्री.राजेश टोपे : खासदार व आमदार यांच्याप्रमाणे नगरसेवकांना सुध्दा स्थानिक विकास निधीतून कामे करण्यास परवानगी दिली जाईल. माननीय सदस्यांचे म्हणणे योग्य आहे. खासदार, आमदार स्थानिक विकास निधीतून विकासाची कामे करीत असतील तर नगरसेवकांना तशी परवानगी का दिली जात नाही ? तशी परवानगी देण्याच्या दृष्टीने शासनाकडून महानगरपालिकेला सूचना दिल्या जातील. पण कधी कधी रस्त्यावर सुध्दा अनधिकृत बांधकामे केली जातात.

श्री.नितीन गडकरी : मला वाटते की, मंत्रिमहोदयांना अधिका-यांनी चुकीची माहिती दिली आहे. मी कोणत्याही लेआऊटमधील अनधिकृत बांधकाम नियमित करावे असे म्हणत नाही. पण आज त्या भागात पिण्यासाठी पाणी नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



(श्री. नितीन गडकरी....

नळाला पाणी नसल्यामुळे तेथील जनता पाण्यासाठी वणवण फिरत आहे. नगरसेवकांना तेथे हापसे करता येत नाहीत. नगरसेवकाला तेथे काम करता येत नसल्यामुळे लोकांच्या त्याला शिव्या खाव्या

लागतात. इतर सर्व महानगरपालिकांमध्ये नगरसेवकांना अशा प्रकारे काम करण्याची अनुमती असेल तर नागपूर महानगरपालिकेवरच अन्याय का ? राज्यातील इतर सर्व महानगरपालिकांमध्ये खासदार, आमदार आणि नगरसेवक काम करीत असतील तर तोच नियम नागपूर महानगरपालिकेलाही लावा. टाऊन प्लॅनिंगमध्ये कशासाठी आणता ? नाही तर महाराश्ट्रातील सर्व महानगरपालिकांना टाऊन प्लॅनिंगची योजना लागू करा. महाराष्ट्रातील सर्व खासदार, आमदार आणि नगरसेवक एकच आहेत ना ? मग नागपूर महानगरपालिकेवर कशासाठी अन्याय करता ? तेव्हा जो न्याय इतर महानगरपालिकांना आहे तोच न्याय नागपूर महानगरपालिकेला लागू कराल काय ?

श्री. राजेश टोपे : होय.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुढे ढकललेल्या नियम 93च्या निवेदनासंबंधी**

श्री. पांडुरंग फुंडकर : उपसभापती महोदय, शुक्रवार, दिनांक 28 मार्च 2008 रोजीच्या 93च्या सूचनांवरील काही निवेदने पुढे ढकलून ती सोमवारी घेतली जातील असे माननीय सभापतींनी सांगितले होते.

**उपसभापती** : याबाबतीत मी माननीय सभापतींशी बोलून घेतो.

श्री. परशुराम उपरकर : पोलिसांच्या संदर्भातील एक 93चे निवेदन राखून ठेवलेले आहे.

**उपसभापती** : सदरहू निवेदनाच्या वेळी आपण उपस्थित नव्हता. ते निवेदन उद्या घेण्यात येईल. तसेच दुसरी एक केस मी सांगितली होती. त्याचा सी.आय.डी. रिपोर्ट डी.जी. कार्यालयात आलेला आहे. ती दोन्ही निवेदने उद्या सभागृहामध्ये घ्यावीत.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : होय.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मिटर लावण्यासंबंधातील निवेदन व्हावयाचे आहे.

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भात अनेक सूचना आलेल्या आहेत. मी आपणाशी या विषयाबाबत बोलतो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:250

**पृ. शी.** : मुंबईतील जसलोक, बॉम्बे हॉस्पिटल इत्यादी पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये अल्प उत्पन्न गटातील रुग्णांना उपचार न मिळणे

**मु. शी.** : मुंबईतील जसलोक, बॉम्बे हॉस्पिटल इत्यादी पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये अल्प उत्पन्न गटातील रुग्णांना उपचार न मिळणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत,सर्वश्री मधुकर चवहाण व संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई महानगरपालिका राज्य शासन यांच्याकडून काही एकर जमीन नाममात्र शुल्काने घेऊन व इतर सवलती घेऊन जसलोक, बॉम्बे हॉस्पिटल, लिलावती, हिंदुजा, ब्रिचकँडी, इत्यादी पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये दारिद्र्य रेषेखालील व अल्प उत्पन्न गटातून आलेल्या रुग्णांना उपचार न मिळणे, विधीमंडळ समितीच्या सदस्यांनी या संबंधात जसलोक रुग्णालयाच्या मेडिकल डायरेक्टर यांची भेट घेऊनही त्यांना कोणतेही सहकार्य न मिळणे, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय डावलून अल्प उत्पन्न गटाचे किंवा दारिद्र्य रेषेखालील असण्याचे सर्टिफिकेट नसतानाही अनेकांना 2 % रकमेतून फायदा देणे, इतर हॉस्पिटलमध्येही तशीच परिस्थिती आढळणे, ज्यामुळे 2% निधीचा वापर न होणे, तसेच 10% जागा निर्धन व अल्प उत्पन्न गटासाठी कायदेशीररित्या राखून न ठेवणे, त्याबद्दल गरीब, गरजू रुग्णांना या सेवेपासून वंचित ठेवणे, त्यामुळे सर्वसामान्यात होणारा उद्रेक व पसरलेला तीव्र असंतोष, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ..4..

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या सभागृहामध्ये पंचतारांकित हॉस्पिटलमध्ये अल्प उत्पन्न गटातील रुग्णांना उपचार न मिळण्यासंबंधीचा प्रश्न तारांकित प्रश्न, अर्धा-तास चर्चा अशा विविध माध्यमातून चर्चिला गेलेला आहे. तरी देखील हा प्रश्न सुटलेला नाही. हा प्रश्न सोडविण्यासाठी विधिमंडळाची माननीय विधि व न्याय राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीच्या अनेक बैठकला झाल्या. समितीने प्रत्यक्ष हॉस्पिटला भेट देऊन पाहाणी देखील केली. या भेटीच्या वेळी समितीला जसलोक हॉस्पिटच्या बाबतीत अतिशय वाईट अनुभव आला आणि इतर हॉस्पिटलच्या बाबतीत देखील तो आला. समितीच्या जसलोक हॉस्पिटलच्या भेटीच्या वेळी तेथील मेडिकल ऑफिसरने समिती प्रमुख, माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ तसेच समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांचा अवमान करण्याचे धारिष्ट्य दाखवले. या मेडिकल ऑफिसरने चक्क "तुमचा स्कोप काय, तुम्ही असे प्रश्न विचारताच कसे ?" असे समितीला विचारले. सन्माननीय सदस्यांनी अशी विचारणा केली होती की, ज्या अल्प उत्पन्न गटातील लोकांना सुविधा दिलेल्या आहेत आणि सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार ज्यांच्यावर आयपीएफमधून खर्च केलेला आहे त्यांच्याकडील आवश्यक ती कागदपत्रे तपासलेली आहेत काय ? त्यावेळी त्या मेडिकल ऑफिसरने सांगितले की, "It is my discretionary power to help the people. माझ्याकडे जो रुग्ण येईल त्याच्यावर मी उपचार करणार, तो अल्प उत्पन्न गटातील आहे की नाही हे मी पाहाणार नाही." सभापती महोदय, थोड्याफार फरकाने अन्य हॉस्पिटलमध्ये देखील आम्हाला हाच अनुभव आला. या संबंधातील प्रकरण हायकोर्टामध्ये असून असोसिएट ॲडव्होकेट जनरल श्री. कुंभकोणी यांचे एक असे स्टेटमेंट इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये छापून आले होते की, हॉस्पिटलला भेट देणे तसेच कामाचा आढावा घेणे हे समितीच्या टर्म्स ॲण्ड रेफरन्समध्ये बसत नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 16:30

डॉ.दीपक सावंत......

ही फक्त 7/11च्या बॉम्बस्फोटाच्या चौकशीसाठीची कमिटी आहे अशा प्रकारचे स्टेटमेंट राज्य सरकारचे असोसिएट ॲडव्होकेट जनलर यांनी प्रतिपादन केलेले आहे. ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे की, या कमिटीचे समिती प्रमुख माननीय राज्यमंत्री तसेच कमिटी सदस्य यांचा पूर्णपणे अवमान करण्यात आलेला आहे. धर्मादाय आयुक्तांनी अनेक वेळेला कोर्टाला सांगितले जाते की, धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाकडून वेळोवेळी निरीक्षणे घेण्यात येतात. धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे कर्मचा-यांची कमतरता आहे ही गोष्ट खरी आहे काय ? धर्मादाय आयुक्तांकडून सदरहू रुग्णालयांची निरीक्षणे व्यवस्थिपणे होत नाहीत ही देखील गोष्ट खरी आहे काय ? जसलोक रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कॅ. मसंत यांनी कमिटी समवेत गैरवर्तन केलेले आहे त्यांचेविरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव आणण्याचे प्रयोजन आहे, त्यास माननीय मंत्री महोदय सहमती दर्शवतील काय ? ऑन रेकॉर्ड बॉम्बे हॉस्पीटल,ब्रीचकॅन्डी हॉस्पीटल, यांनी या प्रवर्गासाठी खाटा राखीव दाखविल्या आहेत. परंतु सन्माननीय कोर्टाच्या आदेशानुसार निकष लावण्यात आलेले आहेत, तसे निकष लावण्यात आले आहेत काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, धर्मादाय दवाखाने आहेत, त्यांच्याकडून कायद्यातील कलम 41 (ए) याचे पालन केले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. दारिद्ररेषेखालील रुग्णांना 10 टक्के रुग्णांना मोफत औषधोपचार करावा, त्यांच्याखाली खाटा आरक्षित ठेवाव्यात अशी या कलमात तरतूद आहे. त्या तरतुदींचे पालन धर्मादाय रुग्णालयांकडून केले जात नाही म्हणून विधान परिषद सदस्यांची माझ्या अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली आहे. ही चर्चा या सभागृहामध्ये अनेक वेळा झाली. दरम्यानच्या काळात एक जनहित याचिका कोर्टामध्ये दाखल झाली. त्यामध्ये धर्मादाय रुग्णालयांचे एक फेडरेशन आहे ते देखील सामील झाले. त्या याचिकेसंदर्भात या प्रवर्गातील रुग्णांवर कशा पध्दतीने औषधोपचार करावा यासंबंधी काही निर्देश दिले. 2 टक्के पी.टी.ए.फंड आहे, त्या फंडातून गरिबांवर उपचार करावेत अशा सूचना कोर्टाने दिल्या आहेत. यासंदर्भात सह धर्मादाय आयुक्तालयांच्या अध्यक्षतेखाली एक मॉनेटरींग कमिटी नेमली. या रुग्णालयांमध्ये गरिबांना मोफत औषधोपचार दिला जात नाही, त्यांच्यासाठी खाटा राखीव ठेवल्या जात नाहीत, या संदर्भात सभागृहात चर्चा झाली, तदनंतर विधिमंडळाची समिती माझ्या अध्यक्षतेखाली स्थापन केली गेली. आमच्या समितीच्या तीन-चार बैठका झाल्या. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी या ठिकाणी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ.....

जो विषय उपस्थित केला तो बरोबर आहे. जसलोक रुग्णालयात कॅ.मसंत हे फेडरेशनचे अध्यक्ष आहेत. त्या व्यक्तीला फार मोठा गर्व आहे. त्यांनी विधिमंडळाच्या कमिटी बरोबर गैरवर्तन केले. अतिशय उद्दटपण बोलले, त्या गोष्टीचा आम्ही लगेच निषेध केला. आम्ही त्यांना सांगण्याच्या प्रयत्न केला की, विधान परिषदेच्या कमिटीला आणि सदस्यांना जे हक्क देण्यात आले आहेत ते वेगळे आहेत. हायकोर्टाने सूचना दिल्याप्रमाणे या विषयाच्या संदर्भात मॉनेटरींग कमिटी निर्माण केली आहे ती काम करील. विधिमंडळ कमिटीत आणि मॉनेटरिंग कमिटीमध्ये काहीही मतभेद नाहीत. या दोघा समित्यांचा उद्देश एकच आहे की, या धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरिबांना मोफत औषधोपचार केले गेले पाहिजेत. या रुग्णालयांमध्ये दोन प्रकारच्या रुग्णांवर औषधोपचार केले जातात. ज्या रुग्णाचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 25 हजार रुपयांच्या आत आहे त्या रुग्णावर मोफत औषधोपचार, ऑपरेशन्स केली पाहिजेत. तसेच 25 ते 50 हजार रुपयांचे ज्या रुग्णाच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न असेल त्यास 50 टक्के सवलत देऊन औषधोपचार करण्यात यावे अशी या कायद्यात तरतूद करण्यात आली आहे. जसलोक रुग्णालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कॅ.मसंत यांचे असे म्हणणे होते की, रुग्ण गरीब आहे किंवा नाही हे मी ठरविणार ? तहसीलदार पैसे देऊन उत्पन्नाचे दाखले देतात अशी अनेक वक्तव्ये त्यांनी कमिटीच्या बैठकीत केली. आम्ही त्यांना समजावून सांगत होतो की, जे तहसीलदार खोटे उत्पन्नाचे प्रमाणपत्र देत असतील तर त्यांचे विरुध्द आम्ही कारवाई करु. परंतु त्यांनी आमचे म्हणणे ऐकून घेतले नाही. परवा ते हायकोर्टात गेले आणि त्यांनी त्या ठिकाणी सांगितले की, या समितीला काय अधिकार आहेत ? ही समिती कोण ? ही समिती आमच्या रुग्णालयांची तपासणी कशी काय करु शकते ? आपले असोसिएट ॲडव्होकेट जनरल श्री. आशूतोष कुंभकोणी यांना या संबंधी फारशी माहिती नव्हती, त्यांनी थोडयाशा गैरसमजुतीच्या आधारावर ही बॉम्बस्फोटाच्या संदर्भातील कमिटी आहे असे निवेदन केले. सन्माननीय सदस्यांनी कदाचित "मिरर" या वृत्तपत्रात ही बातमी वाचली असेल. मी स्वत: असोसिएट ॲडव्होकेट जनरल यांचेशी यासंदर्भात बोललो आहे. ॲडव्होकेट जनरल यांचेशी चर्चा करणार आहोत. मुंबईतील हिरानंदानी हॉस्पीटलने या कायद्याचे परिपूर्ण पालन केलेले आहे. परंतु बॉम्बे हॉस्पीटल, जसलोक ही धर्मादाय रुग्णालये अजिबात गरीब रुग्णांना मोफत उपचार करीत नाहीत. ही रुग्णालये अजिबात दाद देत नाहीत. या धर्मादाय रुग्णांलयांवर ॅ निश्चितपणे कडक कारवाइ केली जाईल.

यानंतर श्री. कानडे...

लक्षवेधी सूचना पुढे सुरु....

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने दोन टक्के उत्पन्न मिळते त्याच्यातून रुग्णालयांनी रुग्णसेवा करावी असे आदेश दिले. ही 2 टक्के रक्कम धर्मादाय आयुक्तांकडे जमा करावयाची असते त्याच्यातूनच हे उपचार करावयाचे आहेत ही गोष्ट खरी आहे काय ? कायद्याच्या कलम 41(अे) प्रमाणे रुग्णालयांनी 10 टक्के खाटा गरीबांसाठी राखून ठेवायच्या आहेत. म्हणजे 2 टक्के रक्कमेतून मोफत उपचार आणि 10 टक्के राखीव खाटा हे दोन विषय वेगळे आहेत काय ? जसलोक रुग्णालय शासनाचे आदेश पाळत नाही म्हणून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कायद्याच्या कलम 41(अे) प्रमाणे 10 टक्के खाटा गरिबांसाठी राखून ठेवणे आवश्यक आहे. त्या तशा राखून ठेवल्या जात नाहीत म्हणूनच न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. उत्पन्नाच्या 2 टक्के रक्कम जी पीटीएफ फंडामध्ये जमा करतो त्याच्यातून रुग्णांना उपचार द्यावयाचे आहेत. 10 टक्के जागा या राखीव ठेवल्याच पाहिजेत. उच्च न्यायालयाने सूचना केली आहे की 10 टक्के जागांचे मॉनिटरींग करा. शासनाचे आदेश जी रुग्णालये पाळत नाहीत त्यांना जास्तीत जास्त शिक्षा केली जाईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, शासनाच्या काही जमिनी क्लबना जसे वेलींग्टन क्लब एमआयजी क्लब आणि हॉस्पीटल्सना दिल्या जातात. जमिनी देताना अटी व शर्ती घातलेल्या असतात. कॅ. मसंद महाशयांना हे माहीत नसेल. जसलोक, हिंदुजा, लिलावती या रुग्णालयांना धडा शिकविण्यासाठी त्यांच्याकडे असलेल्या जमिनी ताब्यात घ्याव्यात. हायकोर्टाप्रमाणे सार्वभौम सभागृहाचे निर्णय बंधनकारक आहेत. हायकोर्टापुढे एक पाऊल पुढे टाकून अटी व शर्तीच्या अधीन राहून या रुग्णालयांची जी अरेरावी आहे त्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? त्याचप्रमाणे या रुग्णालयांकडून माहिती मागवावी की गेल्या 2 वर्षात किती गरिबांवर आणि अल्प उत्पन्नधारकांवर कोणते कोणते उपचार केले आणि या रुग्णांसाठी किती खाटा राखीव ठेवल्या ? सभापती महोदय, ठाण्यामध्ये कौशल्य मेडीकल फाऊंडेशन आहे त्यांनी किती खाटा राखून ठेवल्या आहेत ? वारंवार या हॉस्पीटलविषयी बोलल्यानंतरही दखल घेतली जात नाही. चौकशी करण्याची मागणी केली होती. या रुग्णालयाला 10 टक्के खाटा राखीव ठेवण्यासाठी भाग पाडले जाणार आहे काय ? याबाबत शासन किती दिवसात निर्णय घेणार आहे ?

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, समितीचे काम सुरु आहे. समितीला मुदतवाढ दिलेली आहे. ठाण्याच्या रुग्णालयाच्या बाबतीत.....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी दिलेली माहिती शासनाने तपासून घ्यावी. लोकप्रतिनिधी शिफारस करतात त्यानुसार या हॉस्पीटलने त्या मंजूर केलेल्या आहेत. चुकीची माहिती रेकॉर्डवर राहू नये. एखाद्या सेवाभावी संस्थेवर आकसाने कारवाई करणे लोकांच्या हिताच्या दृष्टीने योग्य नाही. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती शासनाने तपासून पहावी.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अनेक रुग्णालयांना शासनाने एफएसआय वाढवून दिलेला आहे. नाममात्र भाडयाने किंवा किंमतीने जमिनी दिलेल्या आहेत. अनेक सवलती महानगरपालिकेकडून दिल्या जातात.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1.......... श्री.हसन मुश्रीफ.......

या सगळ्याचा विचार करुन अशी रुग्णालये जर गरीब रुग्णांना उपचार देत नसतील, गरीब लोकांना दाद देत नसतील तर त्यांना शासनाने दिलेल्या जमिनी काढून घेण्याची सुध्दा कारवाई शासन निश्चितपणे करेल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, जी पंचतारांकित रुग्णालये आहेत त्यांच्याकडून असे सांगितले गेले की, विधानपरिषदेच्या समितीला स्कोप नाही. हे शासनाला मंजूर आहे का? सभागृहाची जी समिती आहे त्या समितीला कोणत्याही प्रकारची दाद न देता मग्रुरीने, मुजोरपणाने समितीसमोर उत्तरे देण्यात आली. अशा अधिकाऱ्यांवर काय कारवाई करणार आहात? शासनाच्या सवलती घेऊन शासनाने नियुक्त केलेल्या समितीचा जर हक्कभंग केला जात असेल, अवमान केला जात असेल तर संबंधितांविरुध्द स्पेसिफिक कोणती कारवाई करणार आहात?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी संबंधितांविरुध्द हक्कभंगाची सूचना आणलेली आहे, ती मांडण्यास परवानगी द्यावी व मंजूर करावी. याशिवाय कायद्यात नव्याने दुरुस्ती करण्यात येणार आहे. कलम 41 अअ मधील तरतुदींचे पालन केले नाही तर संबंधित रुग्णालयाच्या विश्वस्तांविरुध्द फौजदारी खटला दाखल करता येतो. दोन हजार रुपये दंड करता येतो. ही दंडाची रक्कम 10 हजार रुपये इतकी वाढविण्यात येणार आहे.

**उपसभापती** : या संदर्भात हक्कभंगाची सूचना प्राप्त झालेली आहे. त्यावरील कार्यवाही सुरु करु. ही लक्षवेधी सूचना याठिकाणी थांबवू.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, प्रत्येक धर्मादाय रुग्णालयामध्ये रुग्णांसाठी प्रत्येक विभागात किती खाटा उपलब्ध आहेत याची माहिती इलेक्ट्रॉनिक बोर्डाद्वारे मेन गेटवर दर्शनी भागात दाखविण्यात येईल काय?

श्री.हसन मुश्रीफ : न्यायालयाच्या आणि शासनाच्या सूचनेप्रमाणे प्रत्येक रुग्णालयाच्या प्रवेशद्वारापाशी फलकावर माहिती नमूद केली जात आहे. परंतु स्वागत कक्षाजवळ इलेक्ट्रॉनिक बोर्ड लावण्याची व्यवस्था धर्मादाय आयुक्त करीत आहेत. सभागृहाच्या समितीने 10 ते 12 धर्मादाय रुग्णालयांना भेटी दिलेल्या आहेत. त्याठिकाणी असे दिसून आले की, माहितीचा बोर्ड छोट्या अक्षरात लावला जातो.असा बोर्ड मोठ्या अक्षरात लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. डिस्प्ले बोर्ड लावल्यास त्याचा खर्च धर्मादाय आयुक्त देण्यास तयार आहेत. ते ताबडतोब केले जाईल.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 16:40

लक्षवेधी सूचना क्र.1..........

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी अल्पदरात संपादित करुन 1 रुपया नाममात्र दराने काही धर्मार्थ रुग्णालयांना जमिनी देण्यात आल्या आहेत. नवी मुंबईत गरीब रुग्णांना सवलतीच्या दराने उपचार देणारे एकही रुग्णालय नाही. ज्या रुग्णालयांना सिडकोमार्फत नाममात्र दराने जमिनी देण्यात आल्या अशा रुग्णालयांकडून किती गरीब रुग्णांना सवलतीच्या दराने उपचार देण्यात आले याची माहिती दिली जाईल काय? 50 हजार रुपये भरल्याशिवाय रुग्णांना ॲडमिट करुन घेतले जात नाही असा आम्ही अनुभव घेत आहोत.

श्री.हसन मुश्रीफ : ती माहिती आता उपलब्ध नाही. परंतु महाराष्ट्रामध्ये धर्मादाय ॲक्टनुसार नोंदणी झालेल्या सर्व रुग्णालयांनी किती लोकांना उपचार दिला पाहिजे आणि किती लोकांना उपचार दिले याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.प्रकाश शेंडगे : मंत्रीमहोदयांनी जी कारवाई करतो असे सांगितले, ही कारवाई किती दिवसात केली जाणार आहे?

श्री.हसन मुश्रीफ : जे कायद्याचे पालन करीत नाहीत त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत. दोन हजार रुपये दंड करण्याची तरतूद आहे, ती दंडाची रक्कम वाढविण्यासाठी कायद्यात दुरुस्ती करावी लागेल. जी रुग्णालये कायद्याचे पालन करीत नाहीत त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी कायद्यात जे अधिकार आहेत त्या अधिकाराप्रमाणे कारवाई करु.

-----------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : कारागृहाच्या सभोवतालच्या 182.88 मीटरच्या परिसरात बांधकाम करण्यास केलेली बंदी

**मु. शी.** : कारागृहाच्या सभोवतालच्या 182.88 मीटरच्या परिसरात बांधकाम करण्यास केलेली बंदी यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कारागृहाच्या सभोवतालच्या 182.88 मीटर परिघात 22 फूटांपेक्षा अधिक उंच बांधकाम करण्यास मनाई करणारे आदेश गृहखात्याने 1964 मध्ये काढले असताना आर्थर रोड कारागृहाच्या परिसरात गेल्या काही वर्षात अनेक उंच इमारती उभ्या रहाणे, त्यातील काही राज्य सरकारच्या व महापालिकेच्या असणे, तसेच याच परिसरातील जे.आर. बोरीचा मार्गावर अनेक एसआरए योजने अंतर्गत बांधकामे सुरु असून त्यांना महापालिका, म्हाडा, राज्य शासन यांनी आवश्यक ते सर्व बांधकामाचे परवाने देणे, परंतु आता गृह खात्याने या बांधकामांना स्थगिती आदेश दिल्यामुळे सध्या संक्रमण शिबीरात असलेल्या पाच हजार झोपडपट्टीवासियांची कुचंबना होणे, त्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण होणे, यामुळे सदरहू झोपडपट्टीवासियांच्या मनामध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : महोदय, मुंबई शहरात ऑर्थर रोड जेलच्या परिसरात स्वातंत्र्यानंतर कधीही निर्णय घेतला नव्हता असानिर्णय आता घेतलेला आहे. ऑर्थर रोड जेलच्या परिसरात जे बांधकाम करण्यात येत होते पण अचानक अधीक्षकाच्या मनात आले की, त्यांनी सगळ्या कामाला कायद्यातील विशिष्ट तरतुदीनुसार स्टे द्यावा, असे सांगितले. त्याचा परिणाम असा झाला की, या भागात एसआरएच्या ज्या स्कीम्स आहेत त्यांना विकासकाने बाजुला ठेवले आणि त्या कामाला स्टे दिला. वास्तविक यामध्ये आपल्याला स्टे देण्याचा अधिकार नाही. कारण प्रिझन बिल्डिंग ॲण्ड सॅनिटोरिअम, ज्याचा आधार घेतला त्या नियम 3 मध्ये असा कोठेही उल्लेख दिसत नाही. कारण त्यात असे म्हटले आहे की, जेलच्या बाजूला 182.88 मीटर अंतरावर कोणतेही बांधकाम करावयाचे नाही. वास्तविक यामध्ये असे म्हटले आहे की " Use of land in the vicinity of the Prison (Unless the State Government for reason to be recorded in writting directs otherwise) within 182.88 meters of the main wall of Prison shall be leased for non-agricultural purpose provided that the Collector may lease such land for agricultural purpose for a short period." महोदय, यात जेलच्या बाजूला कुठेही बांधकाम करु नये असा उल्लेख नाही. तसेच मुंबईत हे शक्यही नाही. 182.88 मीटर म्हणजे जवळपास 500 ते 550 मीटरपर्यंत कुठलेही बांधकाम करावयाचे नाही. वास्तविक पाहता साने गुरुजी मार्गावर 400 फुटावर मुंबई महानगरपालिकेली तळमजला अधिक चार अशी इमारत आहे. त्यानंतर स्वत: महानगरपालिकेचे गॅरेजेस व त्याची इमारत सुध्दा आहे. वास्तविक ब्रिटिशांच्या काळात जो कायदा होता त्याचे कारण असे आहे की, एखाद्या तुरुंगाच्या बाजूला भिंत असेल तर सुरुंग लावून कैदी पळून जाऊ नये म्हणून बांधकामासाठी परवानगी दिली जात नव्हती. परंतु येथे अशा प्रकारे "स्टे" दिल्यामुळे त्या भागातील गरिबांचे जीवन उद्ध्वस्त होईल. कारण यासाठी सर्व प्रपोझल्सना मंजुरी घेतलेली आहे, महानगरपालिकेच्या डी.सी. रुलप्रमाणे ॲडिशनल एफएसआय सुध्दा दिलेला आहे. जवळपास 750 झोपडपट्टीधारक संक्रमण शिबीरात रहायला गेले. अशा परिस्थितीत या रहिवाशांचे जीवन उद्ध्वस्त होऊ नये म्हणून शासन काय करणार आहे ? या ठिकाणी असलेल्या 7 इमारतींपैकी एका विकासकाने भिंत बांधून देण्याचे ठरविलेले आहे ती बांधण्याची परवानगी शासन देणार आहे काय ?

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी 750 लोकांच्या पुनर्वसनात येणाऱ्या अडचणींबाबत येथे लक्षवेधीच्या रुपाने प्रश्न उपस्थित केला आहे. मला असे सांगावयाचे आहे की, ट्रान्झिट कॅम्पमध्ये या लोकांचे पुनर्वसन करण्यात येईल. दुसरे म्हणजे सन 1964 च्या नियमाप्रमाणे 182.88 मीटरपर्यंत बांधकाम करण्यास जेल मॅन्युअलमधील रुलनुसार "स्टे" देण्यात आलेला आहे. या ठिकाणी इमारत होणार आहे त्यामुळे जेलच्या सिक्युरिटीमध्ये काही अडचण निर्माण होणार नाही. कारण ऑर्थर रोड जेलमध्ये टाडा, गँगस्टर्स व अतिरेकीसारखे कैदी आहेत. आणि जेलच्या बाजूला इमारत असेल तर सहज अशा अतिरेक्यांचे लक्ष जाणार आहे. त्याचा परिणाम म्हणून आजकाल उपलब्ध असलेल्या नवनवीन शस्त्रास्त्रांच्या आधारे ते हल्ले करु शकतात आणि भविष्यात आणखी पेचप्रसंग निर्माण होऊ शकतो. म्हणून याबाबत मी एवढेच सांगणार आहे की, यासंबंधी अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करुन त्यात मुंबई महापालिका, नगरविकास विभाग आणि जेलचे अधिकारी यांचा समावेश असेल.

यानंतरश्री. गायकवाड .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ...

म्हणून ही समिती नेमण्यात येईल आणि संबंधित स्थानिक आमदारांना आणि विकासकाना त्या समितीच्या बैठकीच्या वेळी बोलाविण्यात येईल तसेच त्याच्याशी चर्चा करुन या प्रश्नाच्या बाबतीत मार्ग काढण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वन जमिनीच्या प्रश्नासबंधी सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्या वन जमिनीच्या बाबतीत कोर्टाने आदेश् दिला होता त्यानंतर सोसायटयांना आणि शासनाला जाग आली. डी.सी.रुल्सप्रमाणे, सरकारची परवानगी, महानगरपालिकेची परवानगी घेऊन त्या आधारे सगळी योजना मान्य करण्यात आली होती. गरीब व्यक्ती आपल्या घराचे स्वप्न पाहत असते. बदललेल्या काळात सुरक्षिततेसंबंधीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्या संदर्भात काही मुद्दे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे त्या बाबतीत आग्रह धरण्यास हरकत नाही परंतु त्याला कायद्याचा काही अधिकार नाही. या संदर्भात समिती नेमण्यात येणार असल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे . मला त्यांना असे विचारावयाचे आहे की, या प्रश्नाच्या बाबतीत खरोखर निर्णय घेण्यासाठी ही समिती नेमण्यात येणार आहे की टोलवाटोलवी करण्याकरिता ही समिती नेमण्यात येणार आहे ? या प्रश्नाच्या संदर्भात ही समिती एक महिन्यात निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले आहे की गरीब लोकांचे घराचे स्वप्न भंग पावणार नाही. ते स्वप्न सत्यात उतरल्याशिवाय राहणार नाही. त्यांचे घराचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणूनच एस.आर.ए.ची योजना राबविण्यास सुरुवात केली. त्या वेळी ज्या काही परवानग्या घ्यावयाच्या होत्या त्यामध्ये तुरुंगाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परवानगी घेण्याची सक्ती नव्हती त्यामुळे ही परवानगी घेण्यात आली नव्हती. सुरक्षिततेच्या बाबीकडे प्राधान्याने लक्ष द्यावे . असा मुद्दा आता उपस्थित करण्यात आला आहे. मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की,शक्य असेल तर एक महिन्याच्या आत समिती निर्णय घेईन. अन्यथा शक्य तितक्या लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल .

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मघाशी मी जे नियम वाचून दाखविले आहेत त्यामध्ये तुरुंगाच्या बाजूला उंच इमारती बांधू नयेत असे कोठेही लिहिलेले नव्हते.त्यामुळे जो स्टे देण्यात आलेला आहे तो कायद्याला धरुन आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सुरक्षिततेच्या कारणासाठी हा स्टे देण्यात आलेला आहे. कायद्यात जरी तसे नसले तरी सुध्दा 1964 साली गृह खात्याने जे आदेश काढले होते त्या दृष्टीने स्टे देण्यात आला आहे.

श्री.मधुकर चव्हाण : आपण कायद्यात सुधारणा केली पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, भायखळा येथील तुरुंगाच्या आजूबाजूला उंच इमारती आहेत त्याचप्रमाणे ठाणे येथील तुरुंगाच्या आजूबाजूला देखील उंच इमारती आहेत.

**उपसभापती** : ठाण्याच्या तुरुंगाच्या आजूबाजूला उंच इमारती नाहीत.

श्री.विनोद तावडे : ठीक आहे. परंतु भायखळा येथील तुरुंगाच्या आजुबाजूला उंच इमारती आहेत. त्यामुळे सात रस्त्याच्या चौकापर्यंत इमारती बांधता येणार नाहीत. मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की जी समिती नेमण्यात येणार आहे ती समिती एक महिन्याच्या आत निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : मी सुरुवातीलाच सांगितले आहे की ही समिती स्थापन करण्यात आलेली आहे ती लवकरात लवकर एक महिन्यात निर्णय घेईल परंतु तसे जर शक्य झाले नाही तर तीन महिन्याच्या आत 100 टक्के निर्णय घेईल.

----

**<u>तिसरी लक्षवेधी पुढे ढकलण्याबाबत</u>**

**उपसभापती** : तिसरी लक्षवेधी पुढे ढकलण्यात येत असून आता चौथी लक्षवेधी सूचना घेण्यात येईल .


VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.सुंबरे 16.50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. ठाणे येथील मनोरुग्णालय स्थलांतरीत करुन त्या जागेवर रेल्वे टर्मिनस बांधणे

मु.शी :ठाणे येथील मनोरुग्णालय स्थलांतरित करुन त्या जागेवर रेल्वे टर्मिनस बांधण्यासंबंधी सर्वश्री जितेद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप,राजेंद्र जैन,सदाशिवराव पोळ, भास्कर जाधव, डॉ.वसंत पवार, प्रा.फौजिया खान, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) :सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो

" ठाणे येथे 72 एकर जागेत कार्यरत असलेले मनोरुग्णालय स्थलांतरीत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच सेवाभावी संस्थांची असलेली मागणी, यासाठी आलीमघर (ता.भिवंडी) या परिसरामध्ये सुमारे 85 एकर जागा राखून ठेवलेली असणे, सदरचे रुग्णालय स्थलांतरीत करुन त्या ठिकाणी ठाणे शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या सोयीच्या दृष्टीने सदर जागेवर रेल्वे टर्मिनस तयार करणे, शहर वाहतूक तसेच आय.टी.पार्क स्थापन करण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात येणार असणे, परंतु आरोग्य विभागाकडून प्रतिसाद दिला जात नसून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नसणे, त्यामुळे लाखो नागरिकांना होत असलेला प्रचंड त्रास,सदर प्रकरणी शासनाने हस्तक्षेप करुन उपाययोजना करण्यास होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील लाखो नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष तसेच आगामी काळात होत आसलेल्या प्रचंड नागरीकरणाचा विचार करता सदर प्रकरणी त्वरित कार्यवाही करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया "

श्री.रणजित कांबळे( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ):सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

(प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, " प्रादेशिक मनोरुग्णालयाची जागा रेल्वे प्रशासनास टर्मिनस बांधण्यासाठी, शहर वाहतूक तसेच आय.टी.पार्क स्थापन करण्यासाठी देण्याबाबत कोणताही प्रस्ताव, मागणी अथवा पत्र्व्यवहार करण्यात आलेला नाही." सभापती महोदय, मी स्वत: अशा प्रकारचा पत्रव्यवहार केलेला होता त्याचबरोबर माजी खासदार कै.प्रकाश परांजपे यांनी सुध्दा अशी मागणी केलेली होती तरी सुध्दा या ठिकाणी जे उत्तर देण्यात आलेले आहे ते माझ्या दृष्टीने चुकीचे आहे. निवेदनात दुसऱ्या परिच्छेदात असे म्हटलेले आहे की, " ठाणे मनोरुग्णालयाची जागा शेठ नरोत्तमदास माधवदास यांनी 1885मध्ये देणगी दाखल दिलेली आहे. त्यात बदल झाल्यास देणगीदाराकडून सदर जागा पुन्हा मागितली जाईल अशी शक्यता नाकारता येत नाही." शेतक-यांच्या जमिनी जेव्हा एम.आय.डी.सी.साठी ताब्यात घेतल्या जातात तेव्हा त्या संदर्भात उत्तर देत असतांना असे सांगण्यात येते की, हया जमिनींचा वापर कसा करावयाचा हे ठरविण्याचा अधिकार शासनाला आहे. त्याबाबतीत शेतक-यांना काहीही बोलण्याचा अधिकार नाही. परंतु या ठिकाणी जे सांगण्यात आलेले आहे ते विरोधी आहे. 1885 साली शासनाला ही जागा देणगी म्हणून देण्यात आलेली आहे त्यात कोणताही बदल केला तर शासनाला ही जागा गमवावी लागेल..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

त्यामुळे शेतकऱ्यांना आता काहीही बोलण्याचा अधिकार नाही. सभापती महोदय, ठाण्याच्या औद्योगिक पट्ट्यासंबंधी वारंवार शासनाने हे निवेदन केलेले आहे. आता या निवेदनात शासन म्हणते आहे की, ठाणे मनोरूग्णालयाची जागा शेठ नरोत्तमदास माधवदास यांनी 1885 मध्ये देणगी दाखल दिलेली आहे आणि देणगीदाराने ज्या उद्देशाने सदर जागा शासनास देणगीदाखल दिलेली आहे त्यात बदल झाल्यास देणगीदाराकडून सदर जागा पुन्हा मागितली जाईल अशी शक्यता नाकारता येत नाही. म्हणजे ही जागा त्या शेठला परत द्यावी लागेल. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या जमिनीबाबत शासन एक भूमिका घेते आणि या शेठने देणगी दिलेल्या जमिनीच्याबाबतीत मात्र त्याच्या पूर्णपणे विसंगत अशी दुसरीच भूमिका घेत आहे. शेतकरी जेव्हा त्यांची जमीन अशा कारणाने परत मागतात तेव्हा एकदा शासनाकडे आलेल्या जमिनीच्याबाबतीत तिचा वापर कसा आणि कोणत्या कारणासाठी करावयाचा हे शासन ठरवेल म्हणून शासन नेहमी सांगत असते. हे पूर्णतः या भूमिकेशी विसंगत आहे. सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहेच की, ठाण्याच्या मध्यवर्ती भागामध्ये ही 72 एकर जमीन आहे. तेथे मेंटल हॉस्पिटल होते, ज्या काळात हे रूग्णालय तेथे केले गेले तेव्हा ही जागा ठाणे गावाच्या बाहेर होते आणि गावाबाहेरच हे रूग्णालय असावे असा त्यावेळी दृष्टिकोन होता. परंतु आता ठाणे गावाचे शहरात रूपांतर झाल्यानंतर आणि ठाणे शहराचा विस्तारही मोठ्या प्रमाणात झाल्यानंतर ही जागा शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये आली. आता या 72 एकर जमिनीमध्ये सामाजिक दृष्टीकोन ठेवून एक अद्यावत रूग्णालय उभे करावयाचे म्हटले तरी कोणाची हरकत नाही, किंबहुना लोकांची तशी मागणीच आहे. परंतु बदलत्या समीकरणामध्ये औद्योगिकीकरणाचा प्रवाह वाढत असताना तेथे असा एक नवीन प्रकल्प आणण्याची काळजी शासन घेईल काय ? तसेच त्या 72 एकरापैकी 9 एकर जागेवर अतिक्रमण आलेले आहे आणि शासनाचे त्याकडे लक्ष नाही. ती जमीन पुन्हा आपण आरोग्यविषयक नसलेल्या कामांसाठी दिलेली आहे. ती जागा आपण आरोग्य विषयक कामासाठीच देणार आहोत असे म्हटले तर तेथे आज दोन गृहनिर्माण संस्थांना देखील जागा दिली गेली आहे. तेव्हा शासनाने या सर्वच बाबतीत गांभीर्याने भूमिका घेऊन, शासनाची स्वतःची असलेली मालमत्ता, भले ती आरोग्य विभागाची मालमत्ता असली तरी ती शेवटी शासनाचीच मालमत्ता आहे हे लक्षात घेऊन तेथे एक चांगला, आरोग्य विषयक प्रकल्प आणण्याचा विचार करील काय ? त्या 72 एकर पैकी 70 एकर

.... एसएस 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आव्हाड ....

जमीन आज तशीच पडून आहे, तेव्हा त्याबाबत गांभीर्याने विचार करून योग्य न्याय या जमिनीला शासन देईल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे की, तेथील 9 एकर जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. या गोष्टीबद्दल माननीय महसूल मंत्र्यांकडे एक बैठक देखील झालेली होती आणि त्यात कलेक्टरना आदेशही दिले होते की, ही बाब नवीन नियमानुसार आहे किंवा काय हे तपासून घ्यावे. म्हणजे हे अतिक्रमण 1995 अगोदरचे आहे की नंतरचे आहे ते पहावे. 1995 च्या नंतरचे असेल तर ते तेथून काढले जावे आणि 1995 अगोदरचे असल्यास आपण केलेल्या नियमानुसार तेथील लोकांना पर्यायी जागा आपल्याला द्यावी लागणार आहे. सभापती महोदय, आपल्याला हेही माहिती आहे की, तेथे केवळ आमचे मेंटल हॉस्पिटलच आहे असे नाही तर तेथे आमच्या डेप्युटी डायरेक्टरचे कार्यालय आहे, जिल्हा प्रशिक्षण केंद्र आहे, आरोग्य विभागाची लॅब आहे, शिवाय अन्य शासकीय कार्यालय, आगार देखील आहे. त्या शिवाय बाकीचे आमच्या 700 कर्मचाऱ्यांचा जो स्टाफ आहे त्यांच्या स्टाफ क्वार्टर्सदेखील आहेत. तेथील 9 एकर जमिनीवर अतिक्रमण झाले आहे हे सत्य आहे. त्याबद्दल मी आताच सांगितल्याप्रमाणे आम्ही कलेक्टरला सांगितले आहे की, ही महत्त्वाची जागा असल्याने त्यावरील अतिक्रमण लवकर काढून टाकण्यात यावे आणि त्या जागेला कंपाऊंड वॉल टाकण्याबद्दलदेखील तातडीने आदेश द्यावेत. सभापती महोदय, ठाणे येथे आज मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि आमच्याकडे लोकप्रतिनिधींकडूनही प्रस्ताव आलेला आहे की, तेथे एक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल केले जावे. किमान तेथे हृदयरोगावर उपचार होईल असे चांगले अत्याधुनिक रूग्णालय केले जावे. कारण आज ठाण्यामध्ये कोणाही नागरिकाला हृदयरोगावरील उपचारासाठी तातडीने मुंबईतील रूग्णालयात जावे लागते आणि ते सगळ्यांच सहज शक्य होत नाही. त्याबाबतही विचार शासनाचा चालू आहे तसेच तेथे वुमन हॉस्पिटल उभारण्याचेही शासनाच्या विचाराधीन आहे. नाही तरी राज्याच्या प्रत्येक डिव्हिजनसाठी एक सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल देण्याचे आपले धोरण आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1 ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

सुरुवातीला नाशिक आणि अमरावतीमध्ये करण्यात येईल. ते पूर्ण झाल्यानंतर ठाणे येथे सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया आजाराच्या रुग्णांची संख्या वाढत आहे, त्याप्रमाणे मनोरुग्णांची संख्या देखील वाढत आहे ही गोष्ट महत्वाची आहे. ठाण्याच्या मनोरुग्णालयाच्या जागेवर अनेक ठिकाणी अतिक्रमण झाले आहे. या मनोरुग्णालयाला माननीय आरोग्य मंत्र्यांनी दोन वेळा भेट दिलेली आहे. आपण दिलेल्या भेटीमध्ये आपणास काय आढळले? दुसरा प्रश्न असा की, त्याठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल निर्माण करण्याचा प्रस्ताव आणणार काय? आणि त्यामध्ये कॅथ लॅब अंतर्भूत असेल काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सध्या नाशिक आणि अमरावतीमध्ये हॉस्पिटल बांधण्यात येत आहे. अमरावतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ठाणे येथे बांधकाम चालू करु. एकाच वेळी सर्व ठिकाणी बांधकाम चालू करणे शक्य होणार नाही.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड म्हणाल्याप्रमाणे दिवंगत खासदार कै. प्रकाश परांजपे यांनी पाठपुरावा केला आहे. त्याप्रमाणे मी देखील पाठपुरावा करुन पत्र पाठविले होते, परंतु ते मान्य करण्यात आले नाही. आपण म्हटले की, रेल्वे प्रशासनाने कोणताही प्रस्ताव दिलेला नाही. शहराची वाढती लोकसंख्या आणि वाढते नागरीकरण याचा विचार करुन जर रेल्वे प्रशासनाने रेल्वे टर्मिनस बांधण्याबाबतचा प्रस्ताव दिला तर शासन यासंबंधी विचार करणार आहे काय? दुसरा प्रश्न असा की, मनोरुग्णालयामध्ये अनेक पदे रिक्त आहेत, ही सर्व रिक्त पदे आपण किती दिवसात भरणार आहात?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. त्यामध्ये आरोग्य विभागाने स्पष्टपणे सांगितले आहे की, ही जागा आरोग्य विभागाची असून ती आरोग्य विभागाला हवी आहे. त्यामुळे ही जागा आरोग्य विभाग रेल्वेला देऊ शकत नाही. आणि पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, ठाणे शहरामध्ये आरोग्य विभागाच्या भविष्यकालीन विस्तारासाठी एवढी मोठी जागा मिळणे शक्य नाही. तसेच, मनोरुग्णालयामध्ये एकूण 722 मंजूर पदे असून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे....

त्यापैकी 633 पदे भरली आहेत आणि 89 पदे रिक्त आहेत. ही पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे येथील मनोरुग्णालयाच्या 72 एकर जागेसंबंधी प्रश्न उपस्थित केला. त्या जागेपैकी 9 एकर जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे. माझा याबाबत प्रश्न असा आहे की, लातूर, अकोला आणि कोल्हापूर येथे तीन सुसज्ज हॉस्पिटल सुरु करण्यात आले आहेत. परंतु कोकणातील कोणत्याही जिल्हयात एकही सुसज्ज असे मोठे शासकीय हॉस्पिटल नाही. आज ठाणे जिल्हयामध्ये लोकसंख्या वाढली आहे. उद्याच्या निवडणुकीमध्ये ठाणे आणि मुंबई येथून 75 विधानसभेचे सदस्य या विधीमंडळामध्ये निवडून येणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे राजकारण हे मुंबई, ठाणे आणि कोकणातील आमदारांमध्ये केंद्रीत होणार आहे. अशा परिस्थितीत या ठाणे जिल्हयामध्ये एखादा हार्ट पेशंट झाला असेल तर त्याला मुंबईमध्ये किंवा नवी मुंबईमध्ये हलवावे लागते. त्यामुळे लोकांची मागणी विचारात घेऊन ठाणे येथे सुसज्ज हॉस्पिटल हे शासन उभे करणार आहे काय? तशाप्रकारचा शासनाचा मनोदय असेल तर त्यासाठी निश्चित कालमर्यादा घालण्यात येणार आहे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे सांगितले, ती नीटपणे स्पष्ट झालेले नाही. त्यांनी असे सांगितले की, मतदार संघाच्या नवीन फेररचनेमुळे ठाण्यातील आमदारांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे तेथील लोक जास्तीतजास्त हार्ट पेशंट होण्याची शक्यता असल्याने तेथे हॉस्पिटल असण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे ते मला कळलेले नाही.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी 1/3 लोकसंख्या मुंबई आणि ठाणे शहरामध्ये आहे. मुंबई, ठाणे येथील लोकसंख्या जवळजवळ साडेतीन कोटी इतकी आहे. त्यामुळे वाढती लोकसंख्या लक्षात धेता तेथे हॉस्पिटल व्हावयास पाहिजे.

**उपसभापती** : याठिकाणी ठाणे शहराच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झालेला असल्यामुळे मी थोडासा खुलासा करु इच्छितो. याठिकाणी एका प्रश्नाच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. आज ठाणे शहराची झपाटयाने वाढ झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्या प्रमाणात ठाणे येथे आरोग्यविषयक सुविधा अत्यंत अल्प आहेत ही देखील तेवढीच वस्तुस्थिती आहे. याठिकाणी प्रस्ताव असा आला आहे की, येथील जागा रेल्वेला देण्यात यावी किंवा आय.टी.पार्कसाठी जागा देण्यात यावी. परंतु ठाणे येथे आय.टी.पार्कसाठी एम.आय.डी.सी.ची भरपूर जागा उपलब्ध आहे. आज जवळजवळ एम.आय.डी.सी. येथील सर्व जागा रिकामी झालेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी एक बाब स्पष्ट केलेली आहे की, सार्वजनिक आरोग्य विभाग ही जागा इतर कोणत्याही प्रपोजलसाठी देण्यास तयार नाही. याठिकाणी रेकॉर्डवर एक गोष्ट चुकीची जाऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, आपल्याला ही जागा देणगी दाखल मिळालेली आहे आणि हा महत्वाचा मुद्दा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी सदनाला माहिती देताना सांगितले की, जेव्हा ठाण्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांनी कारखान्यांना विकल्या. वास्तविक पाहता त्यावेळी शासनाने जमिनी संपादित केल्यानंतर त्याचा मोबदला त्यांना दिला आहे. याचा अर्थ या जमिनी देणगी दाखल दिलेल्या नव्हत्या. त्यामुळे त्या परत द्यावयाच्या की नाही ? कारण केरळ हाय कोर्टाचा निकाल आहे. तसेच मी विधान परिषदेच्या विनंती अर्ज समितीचा समिती प्रमुख असल्यामुळे ही केस माझ्यापुढेच चालली आहे. शेतकरी हे आताचे जे बाजारमुल्य आहे, ते शासनाला भरुन द्यावयास तयार आहेत. अर्थात ती जमीन शेतीच्या प्रयोजनासाठी निश्चितपणे वापरली जाणार नाही हा भाग वेगळा आहे. परंतु आपण शेतकऱ्यांच्या जमिनी आज शेतकऱ्यांना परत करु शकलो नाही.

. . . .2 यु-2

**उपसभापती . . . .**

याचे कारण एकच आहे की, यापूर्वी त्यांनी त्याचा मोबदला घेतला होता. मी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाडसाहेब, यांना सांगू इच्छितो की, येथील केस वेगळी आहे. त्यांनी ही जागा एका विशिष्ट प्रयोजनासाठी शासनाला देणगी दाखल दिली होती. त्यामुळे उत्तराच्या वेळी त्यांनी जो उल्लेख केलेला आहे, तो कदाचित बरोबर केला असेल, मी याबद्दल येथे काही बोलू इच्छित नाही. पण देणगी दाखल दिलेली जमीन ही तुम्हाला इतर प्रयोजनासाठी निश्चितपणे देता येणार नाही हे सत्य आहे असे मानले तर माझी या सदनामार्फत आपल्याला विनंती आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, आज ठाणे शहर झपाट्याने वाढत आहे आणि ठाणे येथे एकच सिव्हील हॉस्पिटल आहे. यासाठी ताबडतोब मोठया हॉस्पिटलचे प्रयोजन केले. ज्याच्या माध्यमातून या चांगल्या जागेचा सुयोग्य वापर होईल असे सुसज्ज हॉस्पिटल आपण तेथे तयार करावे आणि त्यांना आय.टी.पार्कसाठी जागा पाहिजे असेल तर उद्योग विभागाच्या माननीय मंत्री महोदयांकडे जरुर प्रयत्न करावेत. एम.आय.डी.सी.सारखा मोठा पट्टा ओसाड पडलेला आहे. आज तेथील बरेच कारखाने बंद पडलेले आहेत. तेथे आय.टी.पार्क होऊ शकते. तशी ठाणे येथे आय.टी.पार्क आलेले आहे आणि तेथे कामही सुरु आहे. तसेच रेल्वेला ही जागा देण्याचे कारण नाही. कारण वस्तुस्थिती अशी आहे की, रेल्वेला आतापर्यंत ठाण्याच्या बाबतीत महानगरपालिकेने किंवा बाकीच्यांनी बऱ्याच गोष्टींच्या बाबतीत सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत आणि आम्ही देखील त्यामध्ये काही फंडस् दिलेले आहेत. परंतु रेल्वेने तसा काही योग्य प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे राज्य शासनाची जागा रेल्वेला देण्याचे काहीही कारण नाही असे माझे स्पष्ट मत आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण याठिकाणी अतिशय विस्तृत स्वरुपाचे आणि दूरगामी परिणाम करणारे वक्तव्य केले आहे, त्याबद्दल मी आपले स्वागत करतो. मी स्वत: तेथे समितीच्या माध्यमातून दोन वेळा भेट दिलेली आहे. या जागेचा वापर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसाठी करण्याबरोबरच, तेथे मेडिकल फॅसिलिटी क्लस्टर झाले पाहिजे आणि तेवढी जागा तेथे उपलब्ध आहे. तशा प्रकारे शासनाने विचार करावा अशी मी आपल्यामार्फत विनंती करतो.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी आय.टी.पार्कसाठी एवढयासाठी मागणी केली होती की, ठाण्याची एम.आय.डी.सी.स्थापन झाल्यानंतर तेथे प्लॉटींग सिस्टीम आली. प्लॉट विकत घेण्यात आले.ठाणे येथे एम.आय.डी.सी. कडे फक्त 9 हजार स्वे.मी.चा एकच प्लॉट उपलब्ध आहे.

. . . .2 यु-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

बाकीचे सर्व प्लॉटस् विकले गेले आहेत. ते एम.आय.डी.सी.ला घेता येत नाहीत. कारण त्याचा व्यवहार झालेला आहे, त्यांची विक्री झालेली आहे. त्यामुळे याबाबतीत एम.आय.डी.सी.काहीही करु शकत नाही. आमची फक्त एवढीच मागणी होती की, ज्यागतीने आय.टी.इंडस्ट्री पुढे जात आहे. अशा वेळी ठाणे येथील एम.आय.डी.सी. ही आय.टी.पार्कमध्ये रुपांतरीत करीत असताना तेथे प्रायव्हेट आय.टी.प्लेअर्स् येत आहेत. ज्याप्रमाणे पुणे येथे शासनाने पुढाकार घेऊन इन्फोसिस कंपनीला आणले, बी.टेल.कंपनीला आणले.

यानंतर कु.गायकवाड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्रीमती रणदिवे........ 17:10

श्री.जितेंद्र आव्हाड.......

अंधेरी, मरोळ या भागातील आयटी पार्ककरीता आता जागा संपलेली आहे. त्यामुळे ठाणे येथे असे नवीन आयटी पार्क सुरु करण्यात आले तर या भागाची औद्योगिक प्रगती होऊ शकेल. तसेच ज्या ठिकाणी आय टी पार्क असतात अशा ठिकाणी नवीन तरुणांना नोकऱ्या मिळू शकतात. त्यामुळे, असा एखादा आयटी पार्क ठाणे येथे सुरु झाल्यास येथील हजारो तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध होऊ शकेल म्हणून मी तसे निवेदन केले होते.

**उपसभापती** : याचा शासनाने विचार करावा.

श्री. रणजित कांबळे : . सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी या संबंधी वारंवार पाठपुरावा केलेला आहे. त्यांना मी सांगू इच्छितो की, या संबंधी लवकरात लवकर प्रस्ताव तयार करुन मान्यता देण्यात येणार आहे.

............

**लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 5 सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांच्या विनंतीवरुन पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आताच सांगितले आहे, की लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्यात येत आहे. परंतु सर्वश्री. मोहिते पाटील, संजय दत्त यांनी ही लक्षवेधीची सूचना दिलेली होती. ते आताच एक सेकंदापूर्वी सभागृहामध्ये उपस्थित होते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. प्रतापसिंह मोहिते पाटील व श्री संजय दत्त या दोघांनी माननीय सभापती यांच्याकडे विनंती केली त्यामुळे ही लक्षवेधीची सूचना पुढे ढकलण्यात येत आहे. मी आपणाला कशाकरिता असत्य सांगू ?

........................

.......2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( विशेष उल्लेख )**

**पृ. शी.** : मर्यादित गावठाण जमिनीमुळे कसारा गावाच्या विस्तारावर निर्बंध येणे

**मु. शी.** : मर्यादित गावठाण जमिनीमुळे कसारा गावाच्या विस्तारावर निर्बंध येणे याबाबत श्री.संजय केळकर वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. संजय केळकर यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, कसारा गाव हे लोकल सेवेचे एक शेवटचे टोक असून तेथील लोकसंख्या 25 ते 30 हजारापर्यंत आहे. कसारा गावाच्या मर्यादित गावठाण जमिनींमुळे गावाच्या विस्तारावर अंकुश आलेला आहे. कसारा शहराच्या आसपासचा परिसर वन खात्याच्या मालकीचा असल्याने गावालगतच्या भागामध्ये पाणी पुरविण्यास अडथळे निर्माण होत आहेत. तसेच पर्यायाने कसारा ग्रामपंचायतीच्या विकास कामावरही निर्बंध आले आहेत. ग्रामपंचायतीनेही अतिक्रमित जमीन ग्रामपंचायतीला मिळावी व त्या बदल्यात ग्रामपंचायत जवळील पडीक जमीन वर्ग करणेबाबत शासन दरबारी प्रयत्न केले. परंतु कसारा वासियांच्या राहत्या घरांचा प्रश्न अतिसंवेदशनशील असून सुध्दा शासनाच्या उदासीन व दुर्लक्ष करण्याच्या धोरणामुळे कसारावासिय शासनाबद्दल तीव्र संताप व्यक्त करीत आहेत. मोठया शहरात शासन सन 2000 पर्यंतच्या अतिक्रमिक झोपडपट्टया नियमित करते आहे. मग 20 ते 30 वर्षापासून कसारा गावठाणालगत रहात असलेल्या घरांना अतिक्रमित म्हणण्याचा शासनास अधिकारच नाही. गावकऱ्यांचा राहत्या जागेचा प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडविण्यास शासनाने प्रयत्न केल्यास तीव्र आंदोलनास तोंड द्यावे लागेल, म्हणून सदर बाब ही विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून दिली जात आहे.

................

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : रिलायनस,टाटा व बेस्ट कंपनीने दरवाढीचे संकेत दिल्याने लाखो नागरिकांना बसणारा आर्थिक बोजा.

**मु. शी.** : रिलायनस,टाटा व बेस्ट कंपनीने दरवाढीचे संकेत दिल्याने लाखो नागरिकांना बसणारा आर्थिक बोजा याबाबत डॉ.दीपक सावंत वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□ि□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ि ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ा दिली आहे. त्यां□ि ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, मुंबई उपनगरामध्ये, रिलायन्स व टाटा कंपनी व बेस्ट कंपनी विजेचा पुरवठा करीत असून मुंबई व उपनगरास सुमारे 2,600 मेगावॅट विजेची मागणी आहे.मार्च, एप्रिल, मे, 2008 मध्ये 2900 मेगावॅट पर्यंत गेली असून ही मागणी पूर्ण करण्यास महाराष्ट्र वीज वितरण कंपनीकडे वीज नसणे, त्यामुळे मुंबई व उपनगरात वाढत्या विजेची मागणी पुरी करण्यासाठी महाराष्ट्र हे वीज निर्मितीत त्रुटीचे राज्य असल्याने मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश आदि राज्याकडून ती मुंबईच्या नागरिकांना प्रती युनिट 80 पैसे जास्त दराने महागडी वीज पुरविण्यात येण्याचे रिलायन्स, बेस्ट व टाटा कंपन्यांनी दिलेले स्पष्ट संकेत, त्यामुळे मुंबई व उपनगरामधील लाखो नागरिकांना वीज दरवाढीचा बसणारा आर्थिक बोजा, महाराष्ट्रात निर्माण झालेला विजेचा दुष्काळ व तीव्र टंचाईवर मार्ग काढण्यासाठी राज्य शासनाने तातडीने कोणती उपाययोजना केली याबाबत तात्काळ निवेदन करावे.

यानंतर श्री. बरवड........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय ,रिलायंस कंपनी, बेस्ट आणि टाटा वीज कंपनीने दरवाढ करण्याबाबतचे स्पष्ट संकेत दिलेले आहेत. एक तर महागाईमुळे मुंबईकर त्रस्त झाले असताना हा विजेचा लोड वाढणार आहे. 80 पैशाने वीज महाग होणार आहे. महाराष्ट्रातील विजेचा दुष्काळ आणि तीव्र टंचाईवर मार्ग काढण्यासाठी आणि 80 पैशाचा बोजा प्रत्येक वीज ग्राहकावर पडू नये यासाठी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी ताबडतोब हस्तक्षेप करुन सदर कंपन्यांशी बोलून याबाबतीत सन्माननीय तोडगा काढावा आणि विजेचे दर आहेत तेच ठेवावेत अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

----

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : बीड जिल्ह्यातील मौजे घोसापुरी गायरान जमिनीवरील परिवहन कार्यालयाचे काम प्रलंबित असणे.

**मु. शी.** : बीड जिल्ह्यातील मौजे घोसापुरी गायरान जमिनीवरील परिवहन कार्यालयाचे काम प्रलंबित असणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

" मौजे घोसापुरी ता. बीड, जि.बीड या शिवारातील गट नं. 92, एकूण क्षेत्र 12 हेक्टर गायरान जमीन उप प्रादेशिक कार्यालयास, परिवहन कार्यालयास 2005-06 मध्ये मिळाली. सातबाराच्या उताऱ्यावर "उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बीड" अशी नोंद आहे. राज्यातील इतर जिल्ह्यात (रत्नागिरी, सातारा, सोलापूर, लातूर) अशाच पध्दतीने जमिनी घेऊन कार्यालये उभी होणे, सर्व कार्यालयाच्या बांधकामाचा नकाशा सारखाच असणे, महिन्याला दीड ते दोन लाख रुपये भूर्दंड शासनाला किरायाच्या स्वरुपात सोसावा लागणे, सध्या अस्तित्वात असलेल्या कार्यालयात पार्किन्गला जागा कमी असणे, त्यामुळे वाहतुकीस वारंवार अडथळा निर्माण होणे, अपघात वारंवार होणे, याबाबतचा सविस्तर अहवाल शासन व बांधकाम विभागाकडे प्रलंबित असणे, यामुळे निर्माण झालेली अशांतता व असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना याबाबत शासनाने कामात केलेला विलंब."

सभापती महोदय, तेथील परिवहन कार्यालय शहराच्या मध्यभागी आहे आणि तेथे प्रचंड गर्दी असते. त्यामुळे अपघातांची संख्या वाढलेली आहे. बायपास रोडचे काम होत असताना हा मुद्दा समोर आला. त्या ठिकाणी पार्कीन्गसाठी जागा नाही. कार्यालयासाठी जागा उपलब्ध असताना निधीची उपलब्धता का करुन दिली जात नाही आणि हा प्रश्न का सोडविला जात नाही ? हा प्रश्न महत्वाचा झालेला आहे. इतर जिल्ह्यामध्ये जशी कार्यालये उभी केली आहेत तशाच पध्दतीने हे परिवहन कार्यालय उभे करावे अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : प्राथमिक शाळांचे संनियंत्रण करणे व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ग्रामशिक्षण समित्या/वॉर्ड/प्रभाग समित्या सबळ व सक्रीय करणे

**मु. शी.** : प्राथमिक शाळांचे संनियंत्रण करणे व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ग्रामशिक्षण समित्या/वॉर्ड/प्रभाग समित्या सबळ व सक्रीय करणे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" प्राथमिक शाळांचे संनियंत्रण करणे व शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ग्राम शिक्षण समित्या / वॉर्ड/ प्रभाग समित्या सबळ व सक्रीय करणे याबाबत मी विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे."

सभापती महोदय, प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता व दर्जा टिकविण्यासाठी व उंचावण्यासाठी प्राथमिक शाळांचे बाह्य संनियंत्रण करण्यासाठी महसूल विभागाच्या सहकार्याने कोअर ग्रुपच्या स्वरुपात एक त्रयस्थ यंत्रणा निर्माण करण्याचे आदेश 18.6.2001 रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. सर्व शिक्षा अभियांनातर्गत प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी ग्राम स्तरावर ग्राम शिक्षण समित्यांची पुनर्रचना करण्याचा निर्णय 16.4.2001 रोजी घेण्यात आला आहे. शहरी भागामध्ये वॉर्ड समित्या निर्माण करण्याचा निर्णय 4.1.2005 रोजी घेण्यात आला आहे. सर्व शिक्षण मोहिमेचा कालबध्द कार्यक्रम वेळीच व परिणामकारक कार्यान्वित करण्याकरिता व प्राथमिक शाळांचे दैनंदिन कामाचे/अध्यापनाचे विविध स्तरावरुन परिणामकारक संनियंत्रण होण्यासाठी पंचायत समिती स्तरावर आणि जिल्हा स्तरावर समित्या गठीत करण्याचा निर्णय 23 डिसेंबर, 2005 रोजी घेतला. पंचायत समिती स्तरावर तालुक्याचे विधानसभा सदस्य हे या समितीचे अध्यक्ष आहेत. जिल्हा

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ........

स्तरावरील समितीचे अध्यक्ष पालकमंत्री आहेत. गट विकास अधिकारी व शिक्षण अधिकारी हे सदस्य सचिव आहेत. मात्र अद्यापही बहुतेंक ठिकाणी या समित्या गठीत झालेल्या नसून याची माहिती संबंधितांना नाही. सर्वजण अनभिज्ञ आहेत. या समित्या तातडीने गठीत होण्यासाठी व कार्यवाही होण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : वरळी येथील सुमारे 16,689 चौ.मी.चा भुखंड ग्लॅक्सो स्मिथक्लाईन कंपनीकडून महापालिकेची परवानगी न घेता आयवेन रिॲलिटी कंपनीला विकण्यात येणे.

**मु. शी.** : वरळी येथील सुमारे 16,689 चौ.मी.चा भुखंड ग्लॅक्सो स्मिथक्लाईन कंपनीकडून महापालिकेची परवानगी न घेता आयवेन रिॲलिटी कंपनीला विकण्यात येणे याबाबत श्री. मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. मधुकर चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" मुंबईतील वरळी येथील सुमारे 16 हजार 689 चौरस मीटर भूखंड ग्लॅक्सो स्मिथक्लाईन या कंपनीने या भूखंडाचे मूळ मालक असलेल्या महानगरपालिकेची परवानगी न घेता परस्पर करारपत्रकरुन आयवेन रिॲलिटी या कंपनीला विकला. या भूखंडाची मूळ मालकी महानगरपालिकेकडे असून पालिकेने ग्लॅक्सो स्मिथक्लाईन या कंपनीला नाममात्र भाडेपट्टयावर दिलेला होता. परंतु या कंपनीने महानगरपालिकेला जाणीवपूर्वक अंधारात ठेवून परस्पर व्यवहार करुन महानगरपालिकेची फसवणूक केली आहे. महानगरपालिकेने सदर कंपनीला कारणे दाखवा नोटिसही बजावली आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे ग्लॅक्सोने पालिकेला अंधारात ठेवून चार महिन्यांपूर्वी कोट्यवधी रुपयांचा व्यवहार केला. त्यानंतर पालिकेचा हा भूखंड बँकेकडे तारण ठेवण्याचा प्रस्ताव सादर केला. सर्वात विशेष म्हणजे या भूखंडावर कोट्यवधीचे कर्ज घेताना ग्लॅस्को कंपनीने पालिकेला जामीनदार ठेवलेले आहे. या कंपनी विरुध्द फसवणुकीचा गुन्हा त्वरित दाखल होणे आवश्यक आहे आणि अशा अनेक कंपन्या आहेत, ज्यांना महानगरपालिकेचे भूखंड नाममात्र भाडेपट्टयावर देण्यात आले असून त्यांनी मुंबई महानगरपालिकेला अंधारात ठेवून परस्पर बेकायदेशीर व्यवहार केले आहेत का ? याचा तपास तातडीने घेणे गरजेचे आहे. जेणेकरुन

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. मधुकर चव्हाण .....

पालिकेचे होणारे नुकसान टळेल व मुंबई महानगरपालिकेचे भूखंड सुरक्षित राहतील. अशा कंपन्यांच्या गैरव्यवहाराचा गांभीर्याने विचार करुन त्वरित कारवाई होणे गरजेचे असून, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे. शासनाने यासंबंधी त्वरित कार्यवाही करुन त्याबाबतची योग्य ती माहिती एक महिन्याच्या आत सभागृहासमोर ठेवावी अशी मी विनंती करतो."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात अनेक ठिकाणी अवेळी पडलेल्या पावसामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान

**मु. शी.** : राज्यात अनेक ठिकाणी अवेळी पडलेल्या पावसामुळे शेतक-यांचे झालेले नुकसान याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात अनेक ठिकाणी दिनांक 14.3.2008 रोजी वा त्या सुमारास अवेळी पडलेल्या पावसामुळे झालेले शेतक-यांचे नुकसान, सदर पावसामुळे द्राक्ष, डाळिंब, आंबा, काजू, फणस, बेदाण या पिकांचे अतोनात नुकसान होणे, ज्वारी, भुईमूग, हरभरा व गहू यांची काढणीला आलेली पिके नष्ट होणे, ज्वारी काळी पडण्याची निर्माण झालेली शक्यता, निसर्गाच्या अवकृपेमुळे पिकांची झालेली प्रचंड हानी पाहून शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळणे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळून देऊन त्यांच्या कुटुंबियांना दिलासा देण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्वाचा व शेतक-यांच्यादृष्टीने हिताचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करु इच्छितो. धन्यवाद.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : श्रीमती संध्या हनुमंतराव दौंड या सहशिक्षिकेशी गेवराईचे गटशिक्षणाधिकारी श्री.गाढे यांनी गैरवर्तणूक करणे

**मु. शी.** : श्रीमती संध्या हनुमंतराव दौंड या सहशिक्षिकेशी गेवराईचे गटशिक्षणाधिकारी श्री.गाढे यांनी गैरवर्तणूक करणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"श्रीमती संध्या हनुमंतराव दौंड, सहशिक्षिका, जिल्हा परिषद, के.प्रा.शाळा, जायकवाडी वसाहत, गेवराई, ता.गेवराई येथे कार्यरत आहेत. दिनांक 15.3.2008 रोजी गेवराईचे गटशिक्षणाधिकारी श्री.गाढे यांनी श्रीमती संध्या यांना जाणीवपूर्वक शाळेच्या कार्यालयात थांबवून ठेवणे, श्री.गाढे यांनी श्रीमती दौंड यांचेकडे बघून विकृत स्वरुपाचे हावभाव करणे व जवळ येण्यास सांगणे, श्रीमती दौंड यांनी कार्यालयात पळून जाणे, इतर शिक्षिकांना हा प्रकार श्रीमती दौंड यांनी सांगणे, श्री.गाढे यांचेकडे सर्वांनी विचारणा करताच श्री.गाढे यांनी श्रीमती दौंड यांना शिव्या देणे, श्रीमती संध्या बेशुध्द होणे, व वैद्यकीय इलाज घ्यावा लागणे, श्रीमती दौंड यांना पैशाची मागणी करुन निलंबित करीन अशी धमकी देणे, शिक्षिकेने भीतीपोटी दीर्घ रजेवर जाणे, याबाबत शिक्षिकेने जि.प.सि.इ.ओ.कडे लेखी तक्रार देणे, कास्ट्राईब संघटनेने याबाबत दिलेले निवेदन, महिला शिक्षिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर व शासनाने करावयाच्या तातडीच्या कार्यवाहीबाबत"

सभापती महोदय, श्रीमती संध्या हनुमंतराव दौंड, सहशिक्षिका, जायकवाडी, ता.गेवराई हया दिनांक 15.3.2008 रोजी नेहमीप्रमाणे शाळेत उपस्थित असताना सकाळी 9 वाजता कार्यालयासमोर गटशिक्षणाधिकारी श्री.गाढे यांना नमस्कार केल्यानंतर त्यांनी पिण्याच्या पाण्यासाठी

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती उषा दराडे....

श्रीमती दौंड यांना बोलवून घेतले आणि त्यांच्यासमोर अश्लील चाळे करुन थांबवून घेतले. याबाबत श्रीमती दौंड यांनी तक्रार केल्यानंतर श्रीमती काळे, श्रीमती दौंड यांनी त्यांना जाब विचारला असता ही बाई नालायक आहे अशाप्रकारचा घाणेरडा शब्दप्रयोग केला. त्यानंतर श्री.गाढे यांच्या अशा वक्तव्यामुळे श्रीमती दौंड हया बेशुध्द पडल्यावर त्यांना दवाखान्यामध्ये घेऊन जावे लागले. त्यानंतर दिनांक 16 मार्च रोजी तुम्ही तक्रार मागे घ्यावी आणि मला 5 हजार रुपये द्यावेत नाही तर तुम्हाला निलंबित करण्यात येईल असे श्री.गाढे यांनी सांगितले. या सर्व प्रकारामुळे श्रीमती दौंड हया दिनांक 24.3.2008 पासून दीर्घ रजेवर गेल्या आहेत. या शिक्षिकेवर झालेला अन्याय दूर करावा आणि गटशिक्षणाधिकारी श्री.गाढे यांच्यावर कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

-------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे येवता, ता.केज, जि.अमरावती या गावात पशुधन मोठया प्रमाणात असूनही पशुवैद्यकीय दवाखाना नसणे

**मु. शी.** : मौजे येवता, ता.केज, जि.अमरावती या गावात पशुधन मोठया प्रमाणात असूनही पशुवैद्यकीय दवाखाना नसणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" मौजे येवता, ता.केज, जिल्हा बीड या गावाची लोकसंख्या सुमारे पाच हजारावर असून या गावात जनावरांची संख्या मोठया प्रमाणात असणे, पशुधन मोठया प्रमाणात असूनही गावात पशुवैद्यकीय दवाखाना नसणे, गावात पशुवैद्यकीय दवाखाना नसल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी जाऊन औषधोपचार करावा लागणे, यामुळे वेळ वाया जाऊन शेतीचे तसेच ग्रामस्थांचे होणारे नुकसान, याबाबत शासनाने वेळोवेळी मागणी करुनही केलेले दुर्लक्ष, या सार्वजनिक हिताच्या व तातडीच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. "

सभापती महोदय, मौजे येवता हे मोठे गाव आहे. या गावामध्ये पशुधन मोठया प्रमाणात असल्यामुळे तेथे पशुवैद्यकीय दवाखान्याची व्यवस्था नाही. पशुधनासाठी पशुवैद्यकीय दवाखाना असणे महत्वाचे आहे. तेथील गावक-यांची अनेक दिवसांची ही मागणी आहे. गावामध्ये पशुवैद्यकीय दवाखान्याची सोय नसल्यामुळे केज या तालुक्याच्या ठिकाणी जनावरांना न्यावे लागते. बालाघाटच्या परिसरामध्ये अनेक वाडया आहेत, त्यामुळे या मागणीसाठी शासनाने अधिक विलंब न लावता येवता येथे तातडीने पशुवैद्यकीय दवाखाना मंजूर करावा अशी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करते.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील सर्व शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची पदे भरणे

**मु. शी.** : राज्यातील सर्व शाळांमध्ये क्रीडा शिक्षकांची पदे भरणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" राज्यातील सर्व शाळांमध्ये क्रीडा विषयाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार क्रीडा शिक्षकांची पदे भरण्याबाबत व जिल्हा क्रीडा अधिका-यांनी क्रीडा स्पर्धेसाठी निधी उपलब्ध करुन देणे "

सभापती महोदय, राज्य शासनाने जोसेफ कमिटीच्या शिफारशीनंतर 250 विद्यार्थ्यांमागे एक शारीरिक शिक्षक नेमण्याचे आदेश निर्गमित केले होते. मात्र त्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते....)

यासंबंधी शासनाने वेळोवेळी निर्देश देऊनही शिक्षण संच मान्य करताना जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्याकडून ही बाब तपासून पाहिली जात नाही. प्रत्येक माध्यमिक शाळेमध्ये किमान एक तरी क्रीडा विषयाचा शिक्षक नेमावा असे शासनाचे आदेश असूनही अनेक शाळामध्ये क्रीडा विषयासाठी बीपीएड शिक्षकाची नियुक्ती केलेली नाही. काही शाळामध्ये विद्यार्थी संख्येअभावी तुकडी बंद झाल्यास व शिक्षक अतिरिक्त होत असल्यास एकमेव क्रीडा शिक्षकालाही अतिरिक्त ठरविले जाते. विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण होण्यासाठी तालुका आणि जिल्हास्तरावर क्रीडा स्पर्धाचे आयोजन शासनाच्या वतीने केले जाते. मात्र या क्रीडा स्पर्धेत सहभागी होणा-या शिक्षकांचा व विद्यार्थ्यांच्या प्रवास खर्चाचा कोणताही निधी मिळत नाही. ज्या ठिकाणी स्पर्धा आयोजित केल्या जातात त्या शाळांनाही जिल्हा क्रीडा समितीकडून आवश्यक निधी उपलब्ध होत नसल्याने शिक्षकांना व यजमान शाळानाच हा खर्च करावा लागतो. तेव्हा प्रत्येक शाळेमध्ये 250 विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा विषयाचा शिक्षक नेमावा व क्रीडास्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत उपाययोजना करावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला मी विनंती करतो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्रपृ. शी.** : मंत्रालयातील महिला कर्मचा-यांना चर्चगेट व ओव्हल मैदानाच्या आसपास रोडरोमिओंचा होणारा त्रास

**मु. शी.** : मंत्रालयातील महिला कर्मचा-यांना चर्चगेट व ओव्हल मैदानाच्या आसपास रोडरोमिओंचा होणारा त्रास याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

मुंबईतील मंत्रालयात काम करणा-या महिला कर्मचा-यांना महत्वाच्या कामानिमित्त उशिरापर्यन्त कार्यालयात थांबावे लागणे, मंत्रालय ते चर्चगेट आणि ओव्हल मैदानाच्या आसपास रोडरोमिओंचा वाढलेला सुळसुळाट, त्यांच्याकडून महिलांना होणारा त्रास व त्याचा महिला कर्मचा-यांनी घेतलेला धसका व त्यांच्यात पसरलेले भीतीचे वातावरण, त्यामुळे त्यांनी उशिरापर्यन्त कार्यालयात थांबण्यास दिलेला नकार, याबाबत युनियनच्या वतीने माननीय मुख्यमंत्र्यांना दिनांक 12 जानेवारी 2008 रोजी व तत्पूर्वी अनेक वेळा निवेदने देऊन महिला कर्मचा-यांना कार्यालयात उशिरापर्यन्त थांबवू नये म्हणून मागणी करण्यात आलेली आहे. या मागणीचा विचार करावा अशी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी शासनाला विनंती करीत आहे.

----

...3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## सभागृहाच्या कामकाजासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दोन विधेयके दाखविलेली आहेत. त्यामधील वि.स.वि.क्र. 9 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक हे आज संमत होणे आवश्यक आहे. त्यामुळे ते विधेयक प्रथम घ्यावे. वि.स.वि. क्रमांक 2 महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक 2008 यावर खूप चर्चा होईल. त्यामुळे हे विधेयक उद्या घ्यावे अशी माझी आपणास सूचना आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. IX**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002)**

डॉ. सुनील देशमुख ( वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्र. 9 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि. स. वि. क्रमांक 9 महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, 2002 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 यात सुधारणा करण्याकरिता आपण हे विधेयक क्रमांक 9 आणलेले आहे. आपणास माहीत आहे की, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 च्या कलम 29(2)च्या नुसार व्यापारी हे मासिक, त्रैमासिक आणि वार्षिक अशी विवरणपत्रे भरत असतात. ही विवरणपत्रे त्यांना 21 दिवसाच्या आत भरावी लागतात. या कालावधीत त्यांनी विवरणपत्रे भरली नाहीत तर त्याबाबतीत शास्ती लावण्याची तरतूद आहे. नोटीस येण्यापूर्वी शास्तीची रक्कम एक हजार रु. भरावी लागत होती आणि ती भरली नाही तर 1000 रु. ऐवजी 2000 रु. भरावे लागत होते. याबाबतीत आपण फक्त बृहन्मुंबईचे क्षेत्र पाहिले तर दिसून येईल की, सनर 2005-2006मध्ये 1,89,280 एवढे व्यापारी मूल्यवर्धित कर अधिनियम 2002 खाली नोंदणीकृत आहेत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख....

त्यापैकी जवळ जवळ 75 हजार व्यापा-यांनी विवरणपत्रे वेळवर भरली नाहीत. त्यांना डिसेंबरपर्यंतचे विवरणपत्रे भरावयाचे असतील तर त्यासाठी शासनाकडून 21 दिवसांचा कालावधी दिला जातो. म्हणजे 21 जानेवारी पर्यंत त्यांनी विवरणपत्रे भरणे आवश्यक आहे. त्यांनी सदरहू कालावधीत विविरणपत्रे भरली नाहीत, तर त्यासाठी शास्ती लावण्यात येते. शास्तीची रक्कम अतिशय कमी आहे. शास्तीची रक्कम 1 हजार आणि 2 हजार रुपये एवढी आहे. 1 लाख 89 हजारापैकी जवळ जवळ 75 हजार व्यापा-यांनी विवरणपत्रे वेळेवर भरली नाहीत. 2006-07 मध्ये 1लाख 69 हजार 324 एवढया पात्र नोंदणीधारक व्यापा-यांपैकी विवरणपत्रे वेळेवर भरली नाहीत. 2007-08 मध्ये मुंबईतील पात्र नोंदणीधारक व्यापा-यांपैकी 19 हजार 6 एवढया व्यापा-यांनी विवरणपत्रे भरली नाहीत. आपण यासंदर्भातील टक्केवारी पाहिली तर 2005-06 मध्ये जवळ जवळ 39.87 टक्के, 2006-07 मध्ये 29 टक्के आणि 2007-08 मध्ये 57 टक्के एवढया व्यापा-यांनी विवरणपत्रे वेळेवर दाखल केली नाहीत. व्यापा-यांनी विवरणपत्रे दाखल केली नाही तर त्यांचेवर दंडाची आकारणी करतो. 2005-06 या वर्षात किती दंडाची आकारणी केली याचा आढावा बघितला तर 8 कोटी 46 लक्ष रुपयांची दंडाची आकारणी केली आहे. सदर दंडाची आकारणी करताना असे लक्षात आले की, 295 कोटी रुपयांची विवरणपत्रे व्यापा-यांनी वेळेवर भरली नाहीत. त्यावर त्यांना फक्त 8 कोटी रुपये एवढेच व्याज भरावे लागले. व्यापा-यांकडून व्याज कमाविणे हा शासनाचे उद्देश नाही. शासनाचा एवढाच उद्देश आहे की, व्यापा-यांनी विवरणपत्रे वेळेवर भरावीत. ती विवरणपत्रे दरमहा भरावीत. दरमहा विविरणपत्रे भरली तर शासनाच्या तिजोरीमध्ये निधीची आवक वाढेल. आपण आता दरमहा कॅश फ्लोचे स्टेटमेंट देतो. प्रत्येक विभागास दरमहा निधीचा पुरवठा केला जात आहे. व्यापा-यांवर जरब बसली पाहिजे. विवरणपत्रे व्यापा-यांनी वेळेवर भरली पाहिजेत. म्हणून एक हजार रुपयाऐवजी पाच हजार आणि दोन हजारा ऐवजी दहा हजार पर्यंत शास्ती वाढविली आहे. एवढीच सुधारणा या विधेयकात केलेली आहे. व्याजाचा दर 15 टक्के एवढा आहे. 8 कोटी रुपये फक्त व्यापा-यांना व्याज भरावे लागले. व्यापा-यांनी 300 कोटी रुपयांची विवरणपत्रे भरली नाहीत एवढा फरक पडतो आणि ही छोटीशी सुधारणा केली आहे.

सभापती महोदय, विक्रीकर विभागाकडून राबविण्यात येणा-या विविध कर अधिनियमांतर्गत व्यापा-यांच्या कर निर्धारणा सदर वर्ष संपल्यानंतर ठराविक कालावधीत करणे आवश्यक आहे. जर

2...



ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 17:30

डॉ. सुनील देशमुख....

अशा प्रकारे एखाद्या वर्षाची कर निर्धारणा कायद्याने ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये पूर्ण केली नाही तर व्यापा-याने जाहीर केलेली कर देयता व त्यानुसार भरलेला कर शासनाला स्वीकृत करावा लागतो. 2005 नंतर आपण सेल टॅक्स वरुन व्हॅटवर आलो आहोत. व्हॅटचे नवीन काम आणि त्याचवेळेस 2003-04,04-05 या वर्षाचे निर्धारण राहिले होते ते काम विक्रीकर विभागाकडे एकदम आले. व्हॅट ही नवीन सिस्टीम असल्यामुळे ती ॲडॉप्ट करण्यास थोडा वेळ लागला. निर्धारणाचे काम थोडे मागे राहून गेले. निर्धारणाच्या कामासंदर्भात विधानसभेत विधेयक आणून 31.3.2008 पर्यंत मर्यादा वाढवून घेतली होती. अजून ही कालमर्यादा दोन वर्षापर्यंत वाढवावी अशी या विधेयकात एक सुधारणा आहे. कंपन्यांनी विवरणपत्रे भरलेली आहेत, परंतु त्यांचे असेसमेंट झालेले नाही, ते असेसमेंट वाढवून दिलेल्या मुदतीत करण्यात येईल. आपला जो कर आहे तो वसूल करु शकतो. या दोन्ही सुधारणांमुळे शासनाच्या तिजोरीमध्ये भरच पडणार आहे. या सुधारणांमुळे शासनाच्या आर्थिक सुधारण्यास मदत होणार आहे. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सदनातील सर्व सदस्यांना विनंती करतो की, या विधेयकात ज्या सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत त्या मान्य करण्यात याव्यात.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी शास्ती लावण्याच्या संदर्भात याठिकाणी शासनाची भूमिका मांडलेली आहे. व्हॅट सिस्टीम लागू केल्यानंतर त्या सिस्टीमची घडी बसविण्यासाठी वेळ लागेल. अर्थसंकल्पाच्या माध्यमातून शासनाच्या हेही लक्षात आले असेल की, व्हॅटप्रमाणे किती करवसुली झाली आणि करवसुलीमध्ये किती सुधारणा झाली आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे जवळजवळ 1 लाख 75 हजार व्यापाऱ्यांनी रजिस्ट्रेशन केलेले आहे. व्हॅट लागू करताना व्यापाऱ्यांची नक्की उलाढाल किती होते याची मोजदाद व्यवस्थितपणे केली जाते काय ? त्यावर शासनाचे कशाप्रकारे नियंत्रण आहे ? ज्या व्यापाऱ्यांनी वेळेवर विवरणपत्रे भरली नाहीत त्यांच्यावर सध्या असलेली 1000 रुपयांची शास्ती 2000 रुपये करण्यात येणार आहे आणि 2000 रुपयांची शास्ती 10000 रुपये करण्यात येणार आहे. 10 हजार रुपये भरण्यापेक्षा शासनाचा पैसा व्यापारी स्वत: वापरतो. तो त्याचा उद्देश असतो. 24 टक्के व्याजाने पैसे घेण्यापेक्षा शासनाचे पैसे वापरावेत असे त्याला वाटते. 31 दिवसांच्या आत पैसे भरले नाहीत तर दंड करण्यात येणार आहे. त्याने 2/3/4 वर्षे दंड भरला नाही तर काय हा प्रश्न निर्माण होतो. 10000 रुपये भरले तरी तो सुटणार काय ? म्हणजे केवळ पैशाची शास्तीच लावली जाणार आहे काय ? त्याच्या पलिकडे या व्यापाऱ्यांवर कोणते निर्बंध घालण्यात येणार आहेत याचा खुलासा होणे आवश्यक आहे. करवसुली बाकी आहे त्यासाठी 2003-04 या वर्षातील करवसुलीसाठी 31 मार्च 2009 पर्यंत मुदवाढ घेतलेली आहे. त्यानंतर 2004-05 या वर्षातील करवसुलीसाठी 2010 पर्यंत मुदवाढ घेतलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, एकूण करवसुलीची किती रक्कम बाकी आहे ? शासनाने जाणिवपूर्वक सांगितले आहे की, 2004-05 मध्ये 49 टक्के वसूली राहिली आहे. 2005-06 मध्ये 29 टक्के आणि 2006-07 मध्ये 27 टक्के बाकी आहे. म्हणजे आता शासनाची करवसुलीवर पकड बसलेली आहे असे दिसते. सुरुवातीचे थकबाकीचे प्रमाण आता कमीकमी होत आहे. 27 टक्क्यांवर हे प्रमाण आलेले आहे. 31 मार्च 2009 आणि 31 मार्च 2010 पर्यंत कर भरणार नाहीत त्यांना 10000 रुपये दंड करण्यात येणार आहे. एखाद्या व्यापाऱ्याने ठरविले की 2:3/4 वर्षे दंड भरावयाचा नाही तर त्याच्यावर अन्य कोणते निर्बंध घालण्यात येणार आहेत ? याबाबतचा स्पष्ट खुलासा शासनाकडून होणे आवश्यक आहे.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. जे व्यापारी शास्तीची रक्कम भरत नाहीत त्यांच्यावर फौजदारी प्रक्रिया सुरु केलेली आहे. 2007-08 मध्ये 200 व्यापाऱ्यांवर फौजदारी कारवाई सुरु केलेली आहे. फौजदारी कारवाईची नोटीस आली की व्यापारी पैसे भरतो. गुन्हेगारी स्वरुपाचे व्यापाऱ्यांवर आरोप झाले की ते ताबडतोब पैसे भरतात. कर भरला आहे परंतु त्याचे ॲसेसमेंट करु शकलो नाही. 4/5 मोठया ऑईल कंपन्या आहेत ज्यांची मोठी उलाढाल आहे त्यांच्याकडे कराची रक्कम प्रलंबित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख.........

त्यांची निर्धारणा झालेली नाही, असेसमेंट झालेले नाही. 2002-03 मध्ये एकूण निर्धारणा 1343 होत्या, त्यापैकी प्रलंबित 1269 आहेत. 2003-04 मध्ये 1449 निर्धारणा होत्या. यामध्ये एकूण रक्कम 1849 कोटी रुपये गुंतलेली आहे. निर्धारणा करण्यासाठी कालावधी वाढवून दिला नाही तर ते कायद्याच्या कचाट्यातून सुटण्याची शक्यता आहे. पूर्वीचा कालावधी 31.3.2008 पर्यंत होता, तो कालावधी आपण वाढवून घेतला आहे. एवढी मोठी महाराष्ट्र शासनाची रक्कम त्यामध्ये गुंतलेली आहे. म्हणून मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, विधानसभेने संमत केलेले हे विधेयक सभागृहाने संमत करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक-9 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक-9 संमत झाले आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विधेयकावरील चर्चा पुढे घेण्यासंबंधी**

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेमधील सन 2008 चे वि.स.वि.क्रमांक- 2, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, 2008 हे उद्या चर्चेला घेण्यात येईल. या विधेयकावरील चर्चेसाठी विशेष बैठक घ्यावयाची काय?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विशेष बैठक घेण्याऐवजी उद्याच्या बैठकीत नियमित कामकाजाच्या वेळेत हे विधेयक चर्चेला घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता मी अर्धातास चर्चा विचारात घेत आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी अर्धातास चर्चा उपस्थित करतील.

----------

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पाचव्या वेतन आयोगानुसार मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे

**मु. शी.** : पाचव्या वेतन आयोगानुसार मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करणे यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"दिनांक १३ मे १९९९ च्या शासन निर्णयानुसार ५ व्या वेतन आयोगांतर्गत त्रिस्तरीय वेतन श्रेण्या मंजूर करण्याचे आदेश निघणे, दिनांक ३ जून, २००० च्या शासन निर्णयानुसार मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व अन्य काही पदांच्या वेतनश्रेण्या सुधारीत करण्याचा निर्णय होणे, पदोन्नती मिळूनही निम्न वेतनश्रेणी लागू होणे व त्यामुळे आर्थिक नुकसान होणे, पदोन्नती नंतर मूळ वेतनश्रेणी संरक्षित करण्याचा निर्णय दिनांक १७ जून, २००५ रोजी होणे, दिनांक १७ जून, २००७ पूर्वी पदोन्नती झालेल्यांना या निर्णयाचा फायदा न होणे, पदोन्नती मिळूनही निम्न वेतनश्रेणीत वेतन लागू होणे अन्यायकारक असणे, दिनांक १७ जून, २००५ चा निर्णय हा स्पष्टीकरणात्मक असल्याने पूर्वलक्षी प्रभावाने म्हणजे दिनांक ३ जून, २००० पासून लागू होणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही"

सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागामध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य शासनाने लागू केलेल्या आहेत. या वेतनश्रेण्या लागू करताना त्या 1 जानेवारी, 1996 पासून लागू केलेल्या आहेत आणि प्रत्यक्ष जी.आर. मात्र 13 मे, 1999 ला काढण्यात आला. या वेतनश्रेण्यांमध्ये उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक आणि उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक यांना दिलेल्या वेतनश्रेण्यांमध्ये काही त्रुटी होत्या. इतर वेतनश्रेण्यांमध्ये ज्या काही त्रुटी होत्या त्या वेतन असमानता समितीकडे सोपविण्यात आल्या. वेतन असमानता समितीने त्या त्रुटी दूर करुन शासनाला सुधारित वेतनश्रेण्या सुचविल्या आणि शासनाने सुधारित वेतनश्रेण्या लागू केल्या. त्याच पध्दतीने मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक यांना, विशेषत: उच्च माध्यमिक विभागातील 11 वी व 12 वीमध्ये अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनश्रेणीमध्ये त्रुटी निर्माण झाल्या होत्या.

(नंतर श्री.खर्चे....

31-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3C-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी श्रीमती उषाताई दराडे )**

श्री. रामनाथ मोते ......

ही त्रुटी दूर करण्याच्या संदर्भात शासन स्तरावर प्रयत्न सुरु होते. शासनाच्या हे लक्षात आले की, पाचव्या वेतन आयोगानुसार मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांची जी वेतनश्रेणी दिली आहे त्यामध्ये गडबड झालेली आहे म्हणून यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार शासनाने 3 जून, 2000 ला निर्णय घेतला आणि या संवर्गातील वेतनश्रेण्या पूर्णपणे बदलल्या. उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांसाठी 6500-10500 या मूळ वेतनश्रेणीऐवजी 7225-11050 ही सुधारित वेतनश्रेणी आणि 7500-12000 या वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी 8000-13500 ही वेतनश्रेणी देण्यात आली आहे. उप मुख्याध्यापकांना सुध्दा 6500-9000 ऐवजी जी वेतनश्रेणी दिलेली आहे त्याऐवजी 1 मार्च, 2000 पासून 7225-11050 ही वेतनश्रेणी शासनाने मंजूर केली. उच्च माध्यमिक वर्ग असलेल्या म्हणजे माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना 7500-12000 ही नवीन वेतनश्रेणी त्याचबरोबर त्यांना 9075-14025 ही वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यासंबंधीचा निर्णय 3 जून 2000 रोजी निघाला पण त्याची अंमलबजावणी मात्र 1 मार्च, 2000 पासून करण्यात आली. यानंतर प्रश्न निर्माण झाला आहे की, या सुधारित वेतनश्रेणी लागू झाल्यानंतर खऱ्या अर्थाने या पदांवर काम करणाया शिक्षकांच्या बाबतीत ॲनामोली निर्माण झाली आहे. राज्यशासनाच्या धोरणाप्रमाणे 1981 च्या नियमावलीमध्ये ज्या तरतुदी आहेत, ज्याला कायदेशीर आधार आहे, त्यातील तरतुदीनुसार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकाला एकत्रित सेवा ज्येष्ठता यादी ठेवावयाची आहे, त्यानुसार ज्या शिक्षकांना सेवा ज्येष्ठतेनुसार किंवा आरक्षणानुसार माध्यमिक शाळेत काम करतात की उच्च माध्यमिक शाळेत काम करतात याचा विचार न करता जो शिक्षक रिझर्वेशन कॅटेगरीमध्ये असेल, आरक्षण बिंदूप्रमाणे असेल आणि सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नत होत असेल तर त्यांना पदोन्नतीची संधी मिळते. परंतु यामध्ये उप मुख्याध्यापक आणि मुख्याध्यापक या पदांच्या बाबतीत ही ॲनामोली निर्माण झाली आहे. एकत्रित सेवाज्येष्ठता यादीनुसार पूर्वी मुख्याध्यापक आणि उप मुख्याध्यापक या पदांवर पदोन्नती देताना उच्च माध्यमिक आणि माध्यमिक शाळातील एकत्रित सेवाज्येष्ठता यादीचा विचार होऊ लागला. परिणामत: निवड श्रेणीत काम करणारे जे शिक्षक आहेत, त्याला सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती मिळाली परंतु मुख्याध्यापक 7500

.....2

श्री. रामनाथ मोते ......

ही वेतनश्रेणी मिळत होती आणि उच्च माध्यमिक शिक्षकांना नियमाप्रमाणे आणि सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक होत असेल तर त्याला मात्र 7225 ही वेतनश्रेणी मिळते. या वेतनश्रेणीमध्ये त्या शिक्षकाला 12 वर्षे पूर्ण झाली असतील तर त्यांना 8000-13500 ही वेतनश्रेणी दिली जाते आणि ज्या शिक्षकाला सेवाज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळाली तो ज्या 8000-13500 या वेतनश्रेणीत काम करतो त्याला मुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळते परंतु तो 7225 या वेतनश्रेणीत येतो. म्हणजेच पद वरचे मिळते आणि ज्या पदावर काम करतो त्या पदापेक्षा वेतनश्रेणी मात्र निम्न दर्जाची आहे.

यानंतर श्री. गायकवाड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदया, याचा अर्थ असा आहे की, उप मुख्याध्यापक या पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर किंवा मुख्याध्यापक या पदावर पदोन्नती मिळाल्यानंतर तो शिक्षक अगोदर ज्या वेतनश्रेणीमध्ये काम करीत होता त्या पेक्षा पदोन्नती मिळाल्यानंतर त्यांना निम्न वेतनश्रेणी मिळावयास लागली. त्यामुळे अनेक शिक्षकांनी ही पदोन्नती नाकारली होती. ज्या शिक्षकांनी ही पदोन्नती स्वीकारली होती त्यांना कमी वेतन मिळावयास लागले. त्यामुळे या शिक्षकांकडून काही ठिकाणी पैसे वसूल करण्यात आले होते. पदोन्नती मिळाल्यानंतरसुध्दा कमी दर्जाची वेतनश्रेणी मिळते अशी जी अनॉमली निर्माण झाली होती ती शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती. त्याबाबत शासनाने सहानुभूतिपूर्वक विचार केला होता आणि पदोन्नती मिळाल्यानंतर पूर्वीची जी वेतनश्रेणी होती आणि जी पदोन्नती मिळालेल्या वेतनश्रेणी पेक्षा उच्च दर्जाची आहे त्या वेतनश्रेणीला संरक्षण देणारा शासन निर्णय दिनांक 17 जून 2005 रोजी शासनाने काढला होता. शासनाने हा आदेश निर्गमित केल्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो व शासनाला धन्यवाद देतो. शिक्षकांना पदोन्नती मिळाल्यानंतरसुध्दा जी अनॉमली निर्माण झाली होती ती शासनाने दूर केली होती. शासनाने 17 जून 2005 रोजी त्यासबंधीचा निर्णय घेतला होता. आता या शिक्षकांना पदोन्नती मिळाल्यानंतर त्या शिक्षकांना जी वेतनश्रेणी मिळाली होती तिला संरक्षण मिळते त्यामुळे आता त्यांच्या बाबतीत अडचण निर्माण झाली नाही.दिनांक 3 जून 2005च्या निर्णयानुसार या सर्व वेतनश्रेणी बदलण्यात आल्या त्यामध्ये निर्माण झालेली अनॉमली 2005 साली दूर केली होती. यामध्ये जी काही त्रृटी निर्माण झाली होती ती दूर केली आणि या सर्व शिक्षकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये प्रश्न असा आहे की 2000 ते 2005 या कालावधीमध्ये म्हणजे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंबंधीचा आदेश आपण 3 जून 2000 ला काढला होता तो आदेश आणि हा सुधारित आदेश वेतनश्रेणीला संरक्षण देणारा 17 जून 2005 चा आदेष काढला होता या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये ज्या शिक्षकांना पदोन्नती मिळाली होती ते शिक्षक आजही निम्न वेतन श्रेणीत काम करतात त्यामुळे त्यांच्या पगाराची काही ठिकाणी वसुली करण्यात आलेली आहे. या संदर्भात शिक्षण उपसंचालक, लेखा अधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रारी करण्यात आल्या होती की . एखाद्या व्यक्तीला पदोन्नती मिळाल्यानंतर त्याच वेतनश्रेणीत काम करणे हे योग्य होणार नाही व आता त्या संबंधी शासनाने जी.आर.काढला आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

संबंधित क्षेत्रीय अधिकारी , जिल्हा शिक्षण अधिकारी, लेखा अधिकारी यांचे असे म्हणो आहे की ज्या दिवशी हा जी.आर. निघाला होता त्याच्या नंतर ज्यांना पदोन्नती मिळाली आहेत्यांच्या वेतनश्रेणीला आम्ही संरक्षण देऊ . मात्र त्या पूर्वी ज्यांना पदोन्नती मिळालेली आहे त्यांच्या वेतनश्रेणीला संरक्षण आम्ही देणार नाही कारण त्याबाबतीत शासनाकडून तशा प्रकारचा कोणताही आदेश देण्यात आलेला नाही. याचा अर्थ असा आहे की, 2000 साली ज्यांना पदोन्नती मिळाली आहे त्यांना कमी वेतनश्रेणी काम करावे लागते. त्याचप्रमाणे ज्या शिक्षकांना 2006 ला पदोन्नती मिळूनही त्या शिक्षकापेक्षा एखादा शिक्षक जास्त वेतन घेत आहे. एखाद्याला पदोन्नती अगोदर मिळाली असेल तर तो तुमचा दोष नाही आणि एखाद्या व्यक्तीला नंतर पदोन्नती मिळाली असेल तर तो त्याचाही दोष नाही म्हणून 2000 ते 2005 या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये म्हणजे त्रृटी दूर होई पर्यत ज्या शिक्षकांना अशा प्रकारे मुख्याध्यापक किंवा उपमुख्याध्यापक पदावर पदोन्नती मिळाली किंवा ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षकाचा तो मुख्याध्यापक किंवा उपमुख्याध्यापक झालेला असेल तर या सर्व शिक्षकाना त्यांच्या मूळ वेतनश्रेणीला संरक्षण् देण्याचा निर्णय घेणे आवश्यक अन्यथा या वर्गावर मोठया प्रामाणात अन्याय होईल. यानंतर मला दुसरे म्हणणे असे मांडावयाचे आहे की, या शिक्षकांना किंवा कर्मचा-यांना त्यांच्या वेतनश्रेणीनुसार पेन्शन मिळत असते मूळ वेतनश्रेणीवर त्यांचे पेन्शन अवलंबून असते त्यामुळे या शिक्षकांना पदोन्नती मिळूनही त्यांच्या पेन्शनलासुध्दा नुकसान होणार आहे ही गोष्ट बरोबर होणार नाही. म्हणून मला सन्माननीय शिक्षण मंत्र्याना एक विनंती करावयाची आहे . पदोन्नती मिळाल्यानंतर या वेतनश्रेणीला संरक्षण मिळाले नाही म्हणून ज्या शिक्षकांना निम्न वेतनश्रेणीत काम करावे लागले आहे त्यामुळे त्यांच्या पेन्शनचासुध्दा लॉस होणार आहे. तेव्हा याबाबतीत मला माननीय मंत्री महोदयांना एक विनंती करावयाची आहे पदोन्नती मिळाल्यानंतर सुध्दा शिक्षकाला निम्न वेतनश्रेणीत काम करावे लागते तेव्हा त्यांच्यावर अन्याय दूर केला पाहिजे. हे माननीय शिक्षण मंत्र्यांनाही मान्य होईल . 2000 ते 2005 या कालावधीतील पदोन्नती मिळालेल्या शिक्षकांना संरक्षण न देणे ाबरोबर होणार नाही ते अन्यायकारक होईल म्हणून या निर्णयामध्ये जो काही थोडासा बदल करावयाचा आहे तो शासनाने करावा यासाठी मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.धन्यवाद.

---- नंतर श्री.सुंबरे

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदया, खरे म्हणजे शिक्षक हा असा एक संवर्ग आहे की, त्याला बढतीला तसा फारसा वाव नाही म्हणून या बाबतीत जी मागणी होती ती लक्षात घेऊन याबाबत जी काही त्रुटी होती ती दूर करण्याचा आपण 17 जून 2005 चा जी.आर. काढून प्रयत्न केला. आता सन्माननीय सदस्य श्री.मोते यांचा एकच मुद्दा आहे की, ज्या क्षणापासून हा शासन निर्णय निर्गमित झालातेव्हा पासून त्यात सगळ्यांना सामावून घ्यावे आणि त्या अगोदरच्यांना पूर्वलक्षी प्रभावाने फायदा द्यावा. सभापती महोदया, यामध्ये कोणालाही डावलण्याचा आमचा हेतू नव्हता. पण पूर्वलक्षी प्रभावाने आपण कोणालाही तसा फरक देत नाही तरीही या बाबतीत जी काही विसंगती निर्माण झालेली आहे ती लक्षात घेऊन ही विसंगती दूर करावयाची झाल्यास फरकाची रक्कम किती होते याचा हिशोब करून आम्ही ते वित्त विभागाला सादर करू आणि याबाबत सकारात्मक भूमिका घेऊन प्रयत्न करू एवढेच मी या निमित्ताने आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, आपण या लोकांच्या वेतनालाही संरक्षणा देणार आहात का ? कारण त्यातील काही शिक्षक हे आता सेवानिवृत्त झालेले आहेत तर काही निवृत्तीच्या मार्गावर आहेत आणि त्यांना पदोन्नतीची जी श्रेणी दिली जाते आहे ती त्यांना पदोन्नती मिळण्यापूर्वीच्या वेतनश्रेणीपेक्षाही कमी आहे. त्यांची अशीच 20-20, 30-30 वर्षे सेवा झालेली आहे. तेव्हा त्यांना पदोन्नती मिळूनही त्यांच्या वेतनश्रेणीत बदल वा वाढ झाली नाही तर त्यांना पेन्शन कमी बसणार आहे. त्यामुळे आपण या बाबत लवकरात लवकर निर्णय घ्याल काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, या लोकांना पदोन्नतीला कोठेही वाव नव्हता म्हणून हा मधला मार्ग काढला. परंतु 17 जून 2005 पासून त्याची अमलबजावणी आहे ती करताना सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे की, 17 जून, 2005 पूर्वीच्या लोकांनादेखील त्याचा लाभ मिळावा. तूर्तास हे मान्य करता येत नाही. परंतु मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, मी विभागाच्या वतीने हा प्रस्ताव कॅबिनेटपुढे सादर करतो आणि या लोकांनाही याचा लाभ देण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेऊ.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, माझा मुद्दा आपल्याही लक्षात आला असेल, मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. यामध्ये त्रुटी ही अशी आहे की, मुख्याध्यापकाचे प्रमोशन मिळालेल्यापैकी एक जण हायर ग्रेड घेतो आहे कारण हा शासन निर्णय निघाल्यानंतर त्याला हे

..... 3इ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रमोशन मिळालेले आहे. 17 जून 2005 च्या जीआर मध्ये केवळ असलेली त्रुटी त्यांनी दूर केलेली आहे. मात्र त्यापूर्वीच्या लोकांना त्याचा लाभ मिळत नाही, नंतरच्यांना मात्र तो लाभ मिळतो आहे. आता 17 जून 2005 च्या शासन निर्णयाचा लाभ सर्वांना दिल्याने शासनावर फार मोठा आर्थिक बोजा पडेल असेही नाही. तर पूर्वीची वेतनश्रेणी जी आहे, जी प्रमोशनच्या पदाच्या वेतनश्रेणीपेक्षा जास्त आहे, त्या वेतनश्रेणीला यामुळे संरक्षण मिळत नाही, ते मिळवून देण्याचा एक धोरणात्मक निर्णय जाहीर केला पाहिजे. त्यासाठी त्या शासन निर्णयात '17 जून 2005 पासून' या ऐवजी ती त्रुटी जी निर्माण झाली आहे, तेव्हा पासून देण्याची बाब आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, शेवटी ही आर्थिक बाब आहे. वाटल्यास मी या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.मोते यांच्याबरोबर बसून, आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांसह चर्चा करून याबाबत निर्णय घेऊ.

श्री. रामनाथ मोते : धन्यवाद.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदया, मंत्री जी ने अभी कहा है कि वे मा. सदस्य श्री. रामनाथ मोते द्वारा की गई मांग के ऊपर विचार करेंगे. लेकिन दो बातें रिकॉर्ड पर आनी चाहिए. पहली बात यह है कि अगर जूनियर का प्रमोशन हो रहा है तो वह सीनियर से आगे निकल जाएगा. दूसरी बात यह है कि जो शिक्षक बाद में प्रमोट होगा उसका वेतन पहले प्रमोट हुए शिक्षक से ज्यादा हो जाएगा. यह "प्रिन्सिपल ऑफ नॅचरल जस्टिस" के खिलाफ है और "फंडामेंटल राइट्स" का वायोलेशन है. इसलिए इन दोनों मुद्दों का समाधान शासन को निकालना चाहिए, ताकि यह विसंगति दूर हो जाए.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदया, आपण लोकशाही स्विकारलेली आहे. त्यामुळेच कोणावरही अन्याय करू नये असेच आपले धोरण आहे व त्याप्रमाणे आमचाही प्रयत्न राहील. पण ज्या ज्या शिक्षकांना पदोन्नती मिळते ते पदोन्नती घेतात मात्र ते बदलीच्या गावी जात नाहीत. तेव्हा पदोन्नती घेणाऱ्या, वरची वेतनश्रेणी मागणाऱ्या सर्वांनीच ही गोष्ट लक्षात ठेवावी की, पदोन्नती घेतल्यानंतर त्यांनी बदलीच्या गावी जावे. अन्यथा आम्हालाही याबाबत पुनर्विचार करणे गरजेचे होईल.

...... 3इ 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : मी आपल्याला सांगू इच्छिते की, यामध्ये सामाजिक न्यायाचा प्रश्न देखील उपस्थित झालेला आहे. याबाबत मंत्री महोदयांनी देखील तत्त्वत: तो स्वीकारलेला आहे, पण प्रॅक्टिकल करणे गरजेचे आहे. त्यामुळे येथे जे शिक्षक आमदार आहेत त्यांनी आणि मंत्री महोदयांनी याबाबत एकत्र बसून चर्चा करून यातून मार्ग काढावा. तसेच याबाबत किमान एक महिन्यात निर्णय करणे गरजेचे आहे हेही लक्षात घ्यावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, मंगळवार, दिनांक 1 एप्रिल, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 1 एप्रिल 2008 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही